# कृष्ण परमात्मा



श्रीपरमानंदस्वामी

" ज्याप्रमाणे सर्व अंगांना शुद्ध रक्ताचा पुरवठा करणाऱ्या खुद्द हृदयालाही कार्यरत रहाण्यासाठी त्या शुद्ध रक्ताची आवश्यकता असतेच आणि त्यासाठी त्या हृदयातीलच शुद्ध रक्त हृदयाला पुरविण्याची व्यवस्था जशी परमेश्वराच्या नियतीत निसर्गानेच करुन ठेवलेली आहे, त्याचप्रमाणे सर्वांना खऱ्या व शुद्ध प्रेमाचा अनुभव देणाऱ्या कृष्णालाही त्या प्रेमाची आवश्यकता होतीच. अशा खऱ्या प्रेमाचा अनुभव त्याला कोणी आणून दिला की नाही? कृष्णाचेच शुद्ध प्रेम घेऊन कोणीतरी तेच प्रेम भक्तिभावाने कृष्णाला अर्पण केले की नाही ? "

कोमल प्रकाशन

नारद व लक्ष्मी यांच्या संवादातून

उलगडलेले कृष्णाच्या अंतरंगातील गुज

# कृष्ण परमात्मा

**भाग-१**

**श्री. अविनाश मोरेश्वर लिमये**

**एम्. एस्सी.**

**उर्फ**

**श्रीपरमानंदस्वामी**



- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे  सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

सर्व हक्क : **©सौ. अनुपमा अविनाश लिमये**



**१३, नावलकर बिल्डिंग, न. चिं. केळकर रोड,**
**दादर, मुंबई ४०० ०२८.**
**दूरध्वनी** : ०२२-२४३६ १५१४
**मोबाईल** : ९९६९८ ७६८५०



ई प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane (w) 400604.
7710980841
https://play. google. com/store/apps/details? id=com. esahity. www. esahitybooks
प्रकाशन  :२८ मार्च २०१७ (गुढीपाडवा)


©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे,

**।।श्री।।**

साहित्यसिन्धोः बहुनि सन्ति

रत्नानि दिव्यानि सुभाषितानि ।

कृष्णस्य हृद्यं गुणगानवाक्यं

सुभाषितं मंगलमेव पुण्यम् ।।

श्रीअवधूतस्वामी

**अर्थ**

साहित्यरूपी सिंधुमध्ये

सुभाषितरूपी असंख्य दिव्य रत्ने आहेत.

परंतु

कृष्णाच्या हृदयाचे गुणगान करणारे वाक्य

हेच मंगलदायी आणि

पुण्यकारी सुभाषित आहे.

## अनुक्रमणिका


१. कृष्णस्य हृद्यं गुणगानवाक्यं (प्रस्तावना)

२. नारद-लक्ष्मी संवाद

३. कंसवध- कृष्णाची माता-पिता भेट

४. गुरूभक्तीचे महत्त्व

५. कृष्ण-सांदिपनी भेट

६. कृष्णाची सद्गुरूभक्ती

## ।।कृष्णस्य हृद्यं गुणगानवाक्यं।।

**‘कृष्ण सखा माझा’** हा ग्रंथ २००४ साली श्रीगुरूपौर्णिमेच्या शुभदिनी प्रकाशित झाला. त्यामध्ये कृष्णाच्या गोकुळातील जीवनापर्यंतचेच वर्णन करून झाले होते. त्याच वेळी तो ग्रंथ म्हणजे ‘कृष्णचरित्राच्या गायनातील एक ‘थांबा’ किंवा ‘विराम’ आहे’ असे म्हटले होते आणि ते खरेच होते. कारण कृष्णचरित्राला अंतच नाही आणि म्हणूनच त्याला पारही नाही. कृष्णावताराची समाप्ती झाली तरी कृष्णचरित्र मात्र संपत नाही आणि संपणारही नाही. ते संपूच शकत नाही.

सगुण प्रेमभक्तीचे प्रतीक असलेली अशी ही कृष्णमूर्ती अनेक भगवद्‌भक्तांच्या हृदयामध्ये सद्‌गुरूकृपेमुळे स्थापित झाली. **‘सगुण सद्‌गुरू तोची तो श्रीहरी’** या भावाने त्यांच्याकडून घडलेल्या सद्‌गुरूभक्तीचेच ते अमृतफळ होते. त्या रसाळ अमृतफळातून नित्य स्त्रवणाऱ्या मधुर प्रेमरसाच्या सेवनाने अंतःकरणाला तृप्ती व समाधान लाभूनही, त्याच्या सेवनाची गोडी त्या भक्तांच्याठायी वाढतच राहिली. स्वतःच्याच ठायीच्या त्या प्रेमरसाचे सेवन करून त्याचा आनंद घेता यावा, या एकमेव आंतरिक आर्ततेतूनच त्या भगवद्‌भक्तांकडून नारायणाच्या सगुण प्रेमभक्तीचे गायन उत्स्फूर्तपणे घडू लागले. त्यासाठी नारायणाचा पूर्णावतार म्हणून संबोधिलेल्या कृष्णाचे अवतारचरित्र हाच सर्व भक्तांच्या भक्तिगायनाचा एकमेव विषय झाला.

कृष्णचरित्र हा केवळ इतिहास नाही. त्यामुळे एक इतिहास म्हणून सुसूत्रपणे त्याचे वर्णन करता येणे जसे शक्य नाही, तसे ते आवश्यकही नाही. कृष्णचरित्र हे एक अत्यंत अद्‌भुत असे रसायन आहे, ज्यामध्ये प्रेमरस, भक्तिरस व ज्ञानरस यांचा मिलाफ होऊन झालेला एकीएक आनंदरसच पूर्णपणे भरलेला आहे. हा आनंदरस प्राशन करण्याच्या हेतूने भगवद्‌भक्तांनी कृष्णाच्या जीवनातून प्रगटलेले त्याचे अंतःकरण हेच प्रमाण मानून, त्याचेच व्यवधान घेतले आणि तेच लक्ष्य मनःचक्षूंसमोर ठेवून त्याचाच ध्यास चित्ताठायी धरला. अंतःकरणाच्या या आर्त अवस्थेतूनच त्या भक्तांकडून कृष्णाचे भक्तिगायन घडले असता, कृष्णाच्या अंतरीचे गुज त्यांच्यासाठी उलगडत राहिले आणि त्यांच्या अंतरात कृष्णप्रेम अधिकाधिक रंगत राहिले. त्यामुळे त्या भक्तांचेही अंतःकरण कृष्णाच्या अंतःकरणासारखेच झाले. म्हणजेच कृष्ण हाच त्यांचे अंतःकरण होऊन राहिला. सर्वांच्याठायी आत्मरूपाने असलेला हा **कृष्ण परमात्मा** त्याच्या भक्तांच्याठायी त्यांचा **प्रेमात्मा** होऊन राहिला. त्या भक्तांनाच कृष्ण खऱ्या अर्थाने पावला आणि त्यांच्यावर तो सदासर्वकाळ प्रसन्न होऊन राहिला.

गोकुळामध्ये असताना बालपणापासूनच कृष्णाची प्रेमस्वरूप अवस्था प्रगट होत राहिली. त्या अवस्थेतूनच कृष्णाकडून शुद्ध प्रेमाची देवाणघेवाण घडत राहिली खरी, परंतु कृष्णाला त्याचा योग्य व खरा प्रतिसाद मात्र पेंद्याच्या निरागस प्रेमाच्या रूपाने अंशतः आणि राधेच्या भक्तिभावाच्या प्रेमरूपाने पूर्णतः मिळाला. राधेच्या भक्तिभावाचीच पूर्ती, ती राधा कृष्णस्वरूप होऊन राहण्यामध्ये झाली. कृष्णचरित्राची ही सुरुवातच मुळी एवढ्या परमोच्च बिंदूने झाली, की कृष्ण म्हणजे केवळ गोकूळ असे

समीकरण झाले आणि कृष्णचरित्र म्हणजे फक्त **'राधाकृष्ण ऐक्य'** एवढीच भावना सर्वसाधारणपणे सर्वांचीच होऊन राहिली. परंतु कृष्णाचे गोकुळातील वास्तव्य जरी विशेषत्वाचे होते, तरी ते काही कृष्णाचे संपूर्ण जीवन नव्हतेच. कृष्णाच्या एकूण सव्वाशे वर्षांच्या आयुष्यातील सुरुवातीची केवळ बारा वर्षेच कृष्ण गोकुळामध्ये होता, ही वस्तुस्थिती आहे. त्याचे पुढील सर्व जीवन हे अत्यंत व्यापक व अनेकविध घटनांनी पुरेपूर भरलेले आहे.

कृष्णाच्या पुढील जीवनात अनेक व्यक्ती त्याच्या जवळ आल्या खऱ्या, पण त्यांच्यापैकी कोणाच्या जीवनात कृष्ण आला, कोणाच्या जीवनात कृष्ण येऊन राहिला आणि कृष्ण कोणाचा कायमचा होऊन राहिला? असा विचार केला असता, सुदामा, रुक्मिणी, अर्जुन, द्रौपदी व उद्धव अशी काही नावे लागलीच दृष्टीसमोर येतात. त्यांचा कृष्णाच्या जीवनात व कृष्णाचाही त्यांच्या जीवनात विशेष भावनिक संबंध आला होता. रुक्मिणी ही पत्नी या नात्यापेक्षाही कृष्णाची **'आत्मसखी'** म्हणून, अर्जुन हा अत्यंत प्रेमाचा मित्र म्हणून, तर द्रौपदी ही प्रिय सखी म्हणून कृष्णाच्या अधिक जवळचे होते, हे तर नक्कीच! सुदामाही कृष्णाचा गुरूबंधू या नात्याने थोडा वेळ का होईना, पण कृष्णाच्या अत्यंत जवळचा झाला होता. सुरुवातीला केवळ कृष्णाचा सहकारी व जोडीदार म्हणून असलेला उद्धव हाही कृष्णाच्या जीवनातील अंतिम पर्वात कृष्णाच्या अत्यंत प्रेमाचा झालेला होता. या सर्वांनाच कृष्णाचा सहवास व प्रेम यांचा लाभ झाल्यामुळे कृष्णाचे माहात्म्यही जाणण्याची संधी जास्त होती. कारण या सर्वांच्या प्रत्यक्ष जीवनाशीही कृष्णाचा अत्यंत जवळचा संबंध आलेला होता. या सर्वांनी कृष्णाचे प्रेम तर निश्चितच अनुभवले, पण त्यांच्यापैकी कोणा कोणाकडून कृष्णाला किती किती व कसे कसे प्रेम मिळाले असेल आणि त्यांच्याकडून कृष्णाच्या अंतरातील प्रेमभावाचीही पूर्ती झाली असेल का?

कृष्णाच्या पुढील धावपळीच्या जीवनामध्ये त्याच्या अंतःकरणातील मूळ प्रेमस्वरूप अवस्था प्रगट होण्यासाठी त्याला काही संधी मिळाली की नाही? **ज्याप्रमाणे सर्व अंगांना शुद्ध रक्ताचा पुरवठा करणाऱ्या खुद्द हृदयालाही कार्यरत रहाण्यासाठी त्या शुद्ध रक्ताची आवश्यकता असतेच आणि त्यासाठी त्या हृदयातीलच शुद्ध रक्त हृदयाला पुरविण्याची व्यवस्था जशी परमेश्वराच्या नियतीत निसर्गानेच करून ठेवलेली आहे, त्याचप्रमाणे सर्वांना खऱ्या व शुद्ध प्रेमाचा अनुभव देणाऱ्या कृष्णालाही त्या प्रेमाची आवश्यकता होतीच. त्याच्या पुढील जीवनात अशा खऱ्या प्रेमाचा अनुभव त्याला कोणी आणून दिला की नाही? कृष्णाचेच शुद्ध प्रेम घेऊन कोणीतरी तेच प्रेम भक्तिभावाने कृष्णाला अर्पण केले की नाही? अधर्माचा नाश करून सद्धर्माची स्थापना करण्यासाठी धर्मकार्याचे कंकण हातात बांधून, सर्व जीवन त्याच हेतूने व ध्येयाने जगणाऱ्या कृष्णाला, त्याचेच धर्मकार्य समर्पित भावाने करणारा कोणी वारसदार पुढे भेटला की नाही? मुख्य म्हणजे, खरेच अधर्माचा समूळ व पूर्ण नाश होऊन सत्य धर्माची स्थापना झाली का? आणि तशी झाली असल्यास, ती निश्चितपणे कोठे झाली?**

या सर्व प्रश्नांच्या सविस्तर व सोदाहरण उत्तरांमध्येच कृष्णाच्या पुढील जीवनाचा पूर्णपणे उलगडा होईल आणि त्याच्या अंतरातील गुज स्पष्टपणे प्रगट होईल. या सर्व प्रश्नांची खरी उत्तरे शोधून काढायची, तर त्यासाठी केवढातरी अभ्यास करणे व केवढेतरी संशोधन घडणेच आवश्यक आहे. पण हा अभ्यास व हे संशोधन, बुद्धीने व शब्दज्ञानाने कधीच होणार नाही. अनेक ग्रंथांचा वा

शास्त्रांचा शोधक अभ्यासही यासाठी जराही कामाला येणार नाही. कारण हे संशोधन कृष्णाच्या त्या अंतःकरणाचे आहे, जे मनाच्या सर्व कल्पना व विचार आणि बुद्धीची सर्व जाण व तर्क यांच्या पलिकडचे आहे. त्यासाठी केवळ आत्मसंशोधनाचीच आवश्यकता आहे. पण त्या आधी कृष्णच अंतःकरण झालेला असावा आणि कृष्णाचे प्रेमस्वरूप हे हृदयच होऊन राहिलेले असावे. तरच हे संशोधन शक्य होईल आणि कृष्णाच्या अंतरीचे गुज हे अंतःकरणात प्रगट होईल. तेव्हाच कृष्णाचे सर्व जीवनही खऱ्या अर्थाने जाणता येईल आणि कृष्णरूपाने प्रगटलेला **परमानंद** हा आपल्याही अनुभवाचा होऊन राहील.

या सर्वाचा अंतर्मुख होऊन विचार केला असता, कृष्णाच्या अंतःकरणापर्यंत जाण्याचा मार्ग मोकळा होऊन स्पष्टपणे नजरेसमोर दिसू लागतो. कृष्णचरित्राबाबतीत अनेक कथाप्रसंग प्रगट आहेत. त्यातील काही पौराणिक म्हणजे रचलेले आहेत, काही पारंपारिक म्हणून प्रचलित झालेले आहेत, तर कित्येक केवळ काल्पनिक आख्यायिका म्हणून सुचलेले आहेत. त्यातूनही त्या कथा सांगण्यामागील अंतःस्थ हेतू बहुतेक वेळा पूर्णपणे झाकोळला गेलेला आहे. व्यास महर्षींनी लिहिलेले **'महाभारत'** हे सुद्धा मुलतः काव्यच आहे. त्यामुळे त्यामध्येही वस्तुस्थितीचा व इतिहासाचा भाग किती आहे, हाही काही वेळा चर्चेचा किंवा वादाचाही विषय होऊन राहिलेला आहे. परंतु **'महाभारत'** लिहून पूर्ण झाल्यावरही व्यासांच्या मनामध्ये एक प्रकारची अस्वस्थता व उदासीनता आली आणि त्यावेळेस व्यासांचे परमगुरू श्रीनारद महर्षी यांच्या सांगण्यावरून व्यासांनी **'भागवत'** हा ग्रंथ लिहिला. तेव्हाच व्यासांच्या मनाला शांती व समाधान लाभले. एवढेच नव्हे, तर व्यासांचे अंतःकरण अत्यंत प्रसन्न व आनंदी झाले. यातून एकच भावार्थ अगदी स्पष्टपणे जाणवतो, की जेथे सगुण प्रेम व भक्ती यांचे गायन आहे, तेथेच आनंदाचा अनुभव आहे. कारण त्या ठिकाणी प्रत्यक्ष भगवंतच प्रगट आहे. **महाभारत** हा **'जय नावाचा इतिहास'** आहे, तर **'भागवत'** ही भक्तिभावाची **'यशोगाथा'** आहे.

**'महाभारत'** काव्यातही ज्या ज्या प्रसंगात कृष्णाचा सहभाग आहे आणि जे जे प्रसंग कृष्ण व त्याच्या प्रेमीजनांमध्ये घडलेले आहेत, त्याच ठिकाणी व त्याच वेळी भावपूर्णता आलेली आहे. कृष्णाच्या वागण्या-बोलण्यातून त्याच्या प्रेमीजनांविषयी प्रगट झालेले त्याचे विशेष प्रेम आणि त्यातूनच प्रगटलेले व त्यांना जाणवलेले कृष्णाचे माहात्म्य हेच त्या ठिकाणी आनंदाचे कारण ठरलेले आहे. तेव्हा **'भागवता'**चे मूळ हे **'महाभारता'**तच लपलेले आहे. जसे दुधामध्ये लोणी दडलेले असते, फक्त त्या दुधावरती प्रक्रिया करून व मंथन करून ते लोणी हे दुधातूनच काढून दुधापासून वेगळे केले जाते, तसेच **'महाभारता'**तील **'भागवत'** शोधून काढून जर त्याचे सेवन केले, तर ईश्वराच्या सगुण प्रेमभक्तीचा आनंद हा अत्यंत सहजपणे व सुलभतेने लाभतो. **'महाभारता'**मध्ये कृष्णाचे स्थान हे ध्रुव ताऱ्यासारखेच अढळ आहे. त्याच्याकडे लक्ष ठेवून त्यालाच लक्ष्य केले असता, सर्व प्रश्नांची योग्य उत्तरे मिळून मनाला समाधान प्राप्त होते आणि त्या कृष्णाच्या दिशेनेच मनाचा आनंददायी प्रवास सुरू होतो. हीच महत्त्वाची गोष्ट लक्षात आल्यावरती व त्याचा निश्चय झाल्यावरती तोच ध्यास चित्ताठायी निर्माण होतो आणि सर्व विचारांची व सर्व लिखाणाची दिशा व हेतू हे दोन्हीही निश्चित होतात.

आत्मचिंतनातून घडलेल्या या संवादात्मक लिखाणामध्ये 'सगुण प्रेमभक्तीच्या माहात्म्याचे निरूपण' हेच मुख्य सूत्र आहे. त्यासाठी निरनिराळ्या व्यक्तिरेखा या माध्यम होऊन साकारलेल्या आहेत आणि त्यांच्याद्वारे जीवभाव, श्रद्धाभाव, प्रेमभाव व भक्तिभाव असे नानाविध भाव रूपाला

आलेले आहेत. त्या व्यक्ती व कृष्ण यांच्यात घडलेले प्रसंग व कथा यांचा केवळ आधार घेऊन, वर्णन मात्र त्या भावांचे झालेले आहे. कथा प्रसंगांची मांडणी करताना किंवा काही वेळा त्यांच्या तपशीलातही बाह्यांगाने काही बदल करताना, मूळ प्रतिपाद्य विषयाला पुष्टी मिळावी हाच एकमेव हेतू आहे. त्यामुळेच क्रमाक्रमाने घडलेले कृष्णाचे जीवन किंवा त्याच्या जीवनात अनुक्रमाने आलेल्या व्यक्ती असे या लिखाणाचे स्वरूप नाही. किंबहुना, कृष्णाच्या जीवनात आलेल्या त्याच्या प्रेमाच्या व्यक्ती हा लिखाणामागील हेतू नसून, कृष्णाच्या विशेष प्रेमीजनांच्या जीवनातील कृष्णाचा सहभाग व त्याला त्या ठिकाणी मिळालेले स्थान हे एकमेव मूळ सूत्र आहे आणि तेच या लिखाणातून प्रगट झालेले आहे. या सूत्रामध्ये कृष्णप्रेमाचे प्रसंग गुंफताना मूळ सूत्र झाकोळले न जाता, त्यातून कृष्णभक्तीचा भावच प्रकर्षाने व विशेषत्वाने फुलून यावा याच एकमेव हेतूने प्रसंगांची रचना केलेली आहे असे म्हणण्यापेक्षा, तशी ती सहजपणे झालेली आहे असे म्हणणेच अधिक संयुक्तिक होईल.

अंतःकरणातील स्वानुभवाचे योग्य शब्दांकन होणे हे जेवढे कठीण आहे, तेवढेच त्या शब्दांकनाचे मुद्रांकन करणेही कठीणच आहे. परंतु प्रसाद, स्नेहल, प्रवीण व प्रतिमा या आठवले परिवाराने हे **‘शिवधनुष्य’** संयुक्त प्रयत्नाने व समर्थपणे पेलले, त्याबद्दल त्या सर्वांचे जेवढे कौतुक करावे तेवढे ते कमीच आहे. ईश्वरचरणी सेवा रुजू करण्याची संधी त्यांनी यशस्वीपणे साधली, म्हणून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि त्यांना प्रेमपूर्वक शुभाशीर्वाद!

परमात्म्याचे अंशात्मक कृष्णरूप व कृष्णाचे व्यापक परमात्मस्वरूप याचे अद्‌भूत दर्शन घडविणारे सुरेख मुखपृष्ठ श्री. प्रकाश तारी यांनी रेखाटले आहे. त्या ठिकाणी सर्वव्यापी **‘आकाश’** आणि त्याठायी प्रगटलेले **‘ब्रह्मतेज’**, अथांग **‘क्षीरसागर’**, विश्वरूपाने प्रगट होऊनही उरलेला आणि सर्व सृष्टीला आधार असलेला **शेष**, सर्व विश्वाचे मूळ असलेले **‘कमळ’** आणि ब्रह्मनादाकडे निर्देश करणारी **‘मुरली’** ही परमात्मस्वरूपाची प्रतीके आहेत, तर क्षीरसागरामधील कमळामध्ये शेषासह उभे असलेले कृष्णाचे मुरलीधारी रूप हा त्या परमात्मस्वरूपाचा सर्वांगसुंदर आविष्कार आहे. श्री. तारी यांची ही सेवा प्रभूचरणी रुजू झाली आहे. त्यांना प्रेमपूर्वक शुभाशीर्वाद!

सदर ग्रंथाच्या प्रकाशनाची व वितरणाची जबाबदारी कोमल प्रकाशनचे श्री. गुरूनाथ शेटचे यांनी सांभाळल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. तसेच मुद्रक मे. प्रगति प्रिंटर्स, मुंबई यांनी या ग्रंथाच्या मुद्रणाची बाजू यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल त्यांना देखील मनःपूर्वक धन्यवाद!

**कृष्णचरित्ररूपी महासागरातील ही ग्रंथरूपी ओंजळ**

**सद्‌गुरूनाथ श्रीअवधूतस्वामी यांच्या चरणी**

**कृतज्ञभावाने सादर व सप्रेम समर्पण! !**

**श्रीपरमानंदस्वामी**

**।। हरि ओम् तत् सत् ।।**

# नारद-लक्ष्मी संवाद

**ना**रायणाचे कायम निवासस्थान असलेले 'वैकुंठधाम' म्हणजे खरे तर परमसुखदायी अशा परमानंदाचे परमधामच होय. सर्व षड्गुणैश्वर्याने युक्त असलेल्या वैकुंठाचे वर्णन करताना खरोखरी वैखरी वाणीही कुंठीतच होते. सदा सर्वकाळ स्वानंदात रममाण असलेला नारायण आणि त्याच्या प्रेमभावाने सदैव सुखात रंगलेली त्याची सुप्रिय अर्धांगिनी लक्ष्मी यांच्या वास्तव्याने त्या वैकुंठात प्रेमाचे चैतन्य नेहमीच सळसळत राही आणि आनंद फळून नित्य बहरत राही. नारायण हा सद्‌गृहस्थ व लक्ष्मी ही त्याची सहधर्मचारिणी असा त्या उभयतांचा गृहस्थाश्रम यामुळे ते वैकुंठ म्हणजे खरे तर आनंदाचे जागृत स्थानच झालेले होते. प्रेम व आनंद विनाश्रम नित्य खेळत आहेत असा लक्ष्मी व नारायण यांचा गृहस्थाश्रम म्हणजे खरे तर 'आनंदाश्रमच' होता. परस्परांवरील अपार प्रेम व अलोट श्रद्धा आणि परस्परांमधील योग्य समज व मोकळेपणा या पायाच्या आधारावरील लक्ष्मी व नारायण यांचे सहजीवन म्हणजे तर आनंदाचा कळसच झालेले होते.

अशा या वैकुंठात केवळ एका गोष्टीचीच कमतरता लक्ष्मीलाच काय, खुद्द नारायणालाही जाणवत असे आणि ती म्हणजे सगुण प्रेमभक्तीचे आनंददायी असे गायन करणारा कोणी त्या वैकुंठात नव्हता. स्वतःचे माहात्म्य स्वतःच जाणत नसलेल्या नारायणाकडून तर अशा भक्तिगायनाची अपेक्षाच करता येत नव्हती. लक्ष्मीही नारायणाचे सगुण माहात्म्य यथार्थपणे जाणत नव्हती आणि मुख्य म्हणजे हे ती जाणून होती. त्यामुळे नारायणावरती अतिशय प्रेम असूनही त्याचे माहात्म्य यथार्थपणे, योग्य वर्णन करून सांगणे लक्ष्मीला शक्य होत नसे. लक्ष्मीची मुख्य अडचण अशी होती, की नारायणाच्या प्रेमाचे वर्णन करावे असे जरी तिला वाटले तरी ते ऐकण्यासाठी योग्य श्रोता त्या वैकुंठात नव्हता. नारायण जास्त करून स्वप्रेमात रमत असल्यामुळे त्याच्याच प्रेमाचे वर्णन लक्ष्मीच्या मुखातून ऐकताना त्याचे त्याकडे पूर्ण लक्षच नसे. लक्ष्मीला नारायणाशी बोलताना त्याचे लक्ष तिच्याकडे वारंवार वेधून घ्यावे लागत असे. नारायणाच्या मुखावरील भाव पाहताना त्याचे लक्ष आपल्याकडे पूर्णपणे आहे की नाही याची शंका लक्ष्मीठायी नेहमीच असे. त्यातूनही लक्ष्मीचे प्रेमाचे बोलणे ऐकत असताना नारायण जेव्हा मध्येच हसून दाद देत असे, तेव्हा तर 'तो आपल्याच बोलण्याला हसला असेल' याची लक्ष्मीला मुळीच खात्री नसे. स्वतःच्या तंद्रीत असलेला नारायण मध्येच असा अकारणच हसे, तेव्हा त्याची लक्ष्मीला तर गंमतच वाटे. लक्ष्मी जेव्हा नारायणाला त्याच्या हसण्याचे कारण विचारी, तेव्हा नारायण एकदम देहभानावर येई. मग लक्ष्मी नारायणाला त्याच्या हसण्याचे कारण पुन्हा पुन्हा विचारीत राही. पण अकारणच हसलेल्या नारायणाला योग्य असे काहीच कारण

सांगता येत नसे. मग मात्र लक्ष्मीचीच हसून हसून मुरकुंडी वळत असे आणि नारायणाच्या या स्वभावाची ती भरपूर चेष्टा करी.

लक्ष्मी काही वेळेला नारायणाच्या माहात्म्याविषयी शेषाशी बोलण्याचा प्रयत्न करी. शेषाला लक्ष्मीचे सर्वच बोलणे आवडत असे आणि तशी तो दादही देई. परंतु लक्ष्मीचे बोलणे शेषाला खरेच पूर्णपणे कळले की नाही याचीच लक्ष्मीला शंका येई. लक्ष्मीच्या बोलण्यातील खरा भाव शेषाला कळलेला आहे, असे त्याच्या मुखाकडे पाहिल्यावर तरी वाटत नसे. त्यामुळे शेषाशी बोलण्याचा खरा आनंद लक्ष्मीला होतच नसे अणि त्यामुळे तिच्या मनातील बेचैनी मात्र कायम रहात असे. कारण वक्ता व श्रोता यांचे सूर जुळून, ते उभयता प्रगटणाऱ्या विषयाशी जेव्हा पूर्णपणे तादात्म्य पावतात, तेव्हाच वक्ता व श्रोता या उभयतांना एकीएक व खरा आनंद अनुभवावयास मिळतो, हे सत्य लक्ष्मी स्वानुभवाने जाणून होती. असा अनुभव फक्त नारदाच्याच सहवासात लक्ष्मीने अनेक वेळा घेतलेला होता. म्हणूनच लक्ष्मीचे नेहमीच नारदाच्या आगमनाकडे लक्ष असे. नारदाचे वैकुंठात येणे केव्हा होते हाच ध्यास लक्ष्मीच्या ठिकाणी सदैव असे.

नारदाचे जेव्हा जेव्हा वैकुंठात आगमन होई तेव्हा तेव्हा नारदाच्या अंतःकरणातील नारायणाविषयीचे प्रेम भरभरून वहात राही आणि नारायणाची अवस्थासुद्धा नेमकी तशीच होऊन राही. नारदावरील आपले प्रेम प्रगट करताना नारायण तर अगदी स्वतःलाही विसरून जात असे. देव व भक्त यांच्या प्रेममीलनाचा अत्यंत आनंद लक्ष्मीलाही होत असे. कारण लक्ष्मी जाणून असे, की आता नारायणाच्या अंतःकरणातील काहीतरी गुह्य उत्स्फूर्तपणे प्रगट होणार आहे. त्याचबरोबर नारदाच्या ठिकाणचेही सदैव साठून राहिलेले नारायणाचे माहात्म्य, आता नारदाकडून नारायणाच्या गुणगायनाद्वारे प्रगट होणार आहे याचीही खात्री लक्ष्मीच्या ठिकाणी पक्केपणाने असे.

असेच एकदा नारदाचे आगमन वैकुंठात झालेले असताना, नारदाने लक्ष्मीशी संवाद करून तिला नारायणाच्या रामचरित्राचे रहस्य समजावून सांगितले होते. रामचरित्राचे गायन नारदाने नारायणाच्या प्रेमाने रंगून केले होते. त्याच्या श्रवणाने लक्ष्मीसुद्धा अगदी पूर्णपणे रंगून गेली होती. एवढेच नव्हे, तर त्या प्रेमाचा रंग तिच्या मनाला कायमचा लागून राहिलेला होता. नारदाशी संवाद करून रामचरित्रातील गुह्य जाणून घेताना लक्ष्मीची बुद्धीही शुद्ध झाली होती आणि तिच्या चित्ताच्या ठिकाणीही सगुण भक्तीचा ध्यास निर्माण झाला होता. परंतु या ध्यासाची पूर्ती करून प्रत्यक्ष त्या भक्तीचा आनंद कसा अनुभवावा हे मात्र लक्ष्मीच्या लक्षात येत नसे. अनेक प्रयत्न करूनही लक्ष्मीला ते जमत नसे. तिच्या ठिकाणची बेचैनी व व्याकुळता कायम वाढत राही. पण यावरील उपाय तिला नारदाच्या पुढील भेटीत सापडला.

रामचरित्राचे गायन केल्यानंतर स्वतः तृप्त होऊन, लक्ष्मीलाही तृप्त करून आणि मुख्य म्हणजे नारायणाला आनंदित करून नारद जो वैकुंठातून निघून गेला तो गेलाच. त्यानंतर बऱ्याच काळानंतर नारदाचे असेच अचानकपणे वैकुंठात आगमन झालेले होते. त्या भेटीत लक्ष्मीची व्यथा नारदाच्या लक्षात आली. ‘नारायणाविषयी अत्यंत प्रेम आहे आणि त्याचे माहात्म्यही जाणून आहे, तरीही नारायणापासूनची विभक्तता कायमच आहे. एवढेच नव्हे, तर ती अंतरात नित्य सलत आहे’ हे लक्ष्मीचे दुःख नारदाच्या लक्षात आले. लक्ष्मीने आर्तभावाने त्या दुःखावरील उपाय नारदाला विचारला असता नारदाकडून ‘प्रेमभक्ति’च्या अत्यंत सरळ, स्पष्ट व सुलभ अशा मार्गाचे माहात्म्य प्रगट झाले. त्या मार्गाची थोरवी, सत्यता व शक्यता अधिक सविस्तरपणे व सोदाहरण विशद करून सांगताना, नारदाने लक्ष्मीला नारायणाच्या कृष्णावतारातील चरित्राचेच माहात्म्य गायन करून सांगितले.

कृष्णावताराचे विशेषत्व सांगताना नारदाने एकाच गोष्टीचा उल्लेख वारंवार केला होता आणि तो म्हणजे ‘कृष्णाने अगदी बालपणापासून सर्वांशी आपणहून साधलेली प्रेमाची जवळीकता आणि सर्वांना प्रेमाने देऊ केलेले सख्यत्व’. गोकुळवासीयांना तर ही संधी त्यांच्या परमभाग्यानेच मिळालेली होती. त्या सर्वांमध्ये कृष्णाच्या सख्यत्वाला खऱ्या अर्थाने जागलेला आणि कृष्णाच्या प्रेमानेच जगलेला असा पेंद्या, हा नारदाच्या अत्यंत कौतुकास पात्र झाला होता. पण त्याहीपेक्षा ‘कृष्णप्रेमाने व कृष्णमाहात्म्याच्या जाणिवेने सदासर्वकाळ युक्त झालेली राधा, सख्यभक्तीने कृष्णाशी ऐक्य कशी पावली’ हे सांगताना तर नारदाचे व ऐकताना लक्ष्मीचे देहभानच पूर्णपणे हरपून गेले होते. ‘भक्ताशी असलेल्या ऐक्यत्वाचा अनुभव देव त्याच्या अंतःकरणात नित्यच घेत असतो. देवाच्या सख्यभक्तीने देवाशी ऐक्य पावल्याचा येणारा अनुभव, हा भक्ताला त्याच्याच अंतःकरणात येत असतो आणि तेथेच भक्ताने तो अनुभव घ्यायचा असतो. परंतु त्यासाठी मात्र सख्यभक्तिभावाची पराकोटीच व्हावी लागते’. भक्तिभावाचे हे रहस्य व सत्य नारदाने ‘राधाकृष्ण’ कथेच्या रूपाने लक्ष्मीसाठी उलगडून दाखविले होते.

राधेच्या सर्वश्रेष्ठ सख्यभक्तीने चकित व प्रेरित झालेली लक्ष्मी श्रवणभक्तीने अगदी तृप्त झाली होती. राधेच्या भक्तिभावापेक्षा आणखीन श्रेष्ठ असे काही पुढे कृष्णचरित्रात घडू शकेल वा असू शकेल असे मानायला लक्ष्मीचे मन तयारच होत नव्हते. तेव्हा मात्र नारदाने लक्ष्मीला वेळीच सावध केले आणि तिला समजावून सांगितले की ‘राधा ही तर कृष्णचरित्राचा पाया आहे. कृष्णचरित्राचा कळस हा अजून कितीतरी पुढेच आहे. तो कळस गाठायचा असेल तर त्यासाठी व त्या आधी संपूर्ण कृष्णचरित्राच्या मंदिरात प्रवेश करणे अत्यावश्यक आहे. भक्तीचा कळस हाच खऱ्या व श्रेष्ठ अशा आनंदाचा म्हणजेच परमानंदाचा अनुभव देणारा आहे. ’

नारदाच्या बोलण्याने सावध झालेल्या लक्ष्मीने मग नारदाला पुढील सर्व कृष्णचरित्र विस्तृतपणे सांगण्याची आणि त्या चरित्राच्या मंदिरात तिला प्रवेश करू देण्याची, अत्यंत प्रेमाने व नम्रभावाने विनंती केली. लक्ष्मीच्या भावाने व विनंतीने नारदाचे समाधान झाले आणि त्याने पुढील कथा सांगण्याचे आश्वासन लक्ष्मीला तेथल्या तेथे लागलीच दिले. परंतु नारायण मिश्कीलपणे हसून म्हणाला, ‘‘हे नारदा, तू व लक्ष्मी या दोघांची भूक व तहान कृष्णचरित्राच्या गायनाने अगदी हरपून गेलेली असेलही. पण मला मात्र खरीच भूक लागलेली आहे आणि ती केवळ मिष्टान्न सेवनानेच शमन होऊ शकेल. त्यानंतरच तुझे कथा निरुपण ऐकण्याचा माझा शारीरिक व मानसिक उत्साह मला पूर्णपणे लाभेल.’’ नारायणाच्या या बोलण्याला सर्वांनीच हसून दाद व संमती दिली.

त्यानंतर सर्वांनी मिळून सहभोजन केले. नारायण व नारद यांना अनेक वेगवेगळे उत्तमोत्तम रसयुक्त पदार्थ प्रेमाग्रहपूर्वक वाढणाऱ्या लक्ष्मीलाही, नारायणाने अत्यंत आग्रहाने आपल्याबरोबर पंक्तीला बसवून घेतले. एवढेच नव्हे, तर आपल्या प्रिय अशा शेषालाही नारायणाने आपल्या पंक्तीचा लाभ दिला. नारायण सर्वांना वारंवार आग्रह करून स्वहस्ते पदार्थ वाढीत होता आणि स्वतःही रसिकतेने त्या पदार्थांचा रसास्वाद घेत होता. सर्व पदार्थांचे व लक्ष्मीचेही कौतुक करून नारायण त्याचा आनंद व्यक्त करीत होता. प्रेमभोजनात रंगलेल्या त्या नारायणाला पाहूनच बाकी सर्वांचे पोट भरल्यासारखे झाले होते. परंतु त्याहीपेक्षा नारायणाच्या प्रेमाने व माहात्म्यानेच त्या सर्वांचे अंतःकरण भरून आलेले होते.

भोजनोत्तर जरी सर्वांनी आपापल्या परीने विश्रांती घेतली, तरी लक्ष्मीच्या मनाला मात्र एक प्रकारची अस्वस्थताच जाणवत होती. नारद जरी बाह्यांगाने शांत व स्वस्थ दिसत होता तरी त्याच्या अंतःकरणात मात्र भक्तिभावाची दाटी झालेली आहे हे त्याच्या मुखावरील भाव पाहताच लक्षात येत होते. शेषाच्या ठिकाणची उत्सुकतासुद्धा शिगेला पोहोचली होती. या सर्वांमध्ये प्रत्यक्ष नारायण मात्र खरेच अगदी मोकळा व स्वस्थचित्त आहे हे जाणवतच होते. शेवटी लक्ष्मीलाच राहवले नाही म्हणून ती जेथे नारायण व नारद एकत्र बसलेले होते तेथे आली. प्रथम लक्ष्मीने वैकुंठातील अत्यंत सुकोमल व सुगंधित फुलांची स्वतःच्या हाताने तयार केलेली माळ नारायणाच्या गळ्यात घातली आणि नारायणाच्या चरणांवर आपले मस्तक ठेवून त्याला भक्तिभावाने वंदन केले. त्यानंतर लक्ष्मीने नारदाच्याही गळ्यात घालण्यासाठी फुलांची दुसरी माळ आणली असता, नारदाने नम्रपणाने त्या माळेचा स्वीकार करण्यास नकार दिला. नारदाचा भाव लक्ष्मीच्या लक्षात आला, तरीसुद्धा तिला थोडेसे वाईट वाटलेच. नारायणाच्या हे लक्षात आल्यावर नारायणाने आपल्या गळ्यातील फुलांची माळ काढून नारदाच्या गळ्यात घातली. नारायणाच्या प्रेमकृतीने नारदाला भरून आले. त्याने लागलीच नारायणाच्या चरणांवर आपले मस्तक

ठेवले असता, नारदाला प्रेमाने उठवून नारायणाने आपल्या हृदयाशी धरले. प्रेमाश्रूंनी दाटलेले नारदाचे मुख कुरवाळून नारायणाने त्याच्या मस्तकाचे अवघ्राण केले आणि त्याला पुन्हा आपल्या जवळ शेजारी बसून घेतले. नारायण व नारद यांचे परस्परांवरील प्रेम पाहून भारावलेल्या लक्ष्मीने आपल्या हातात धरलेली माळ मग पुन्हा नारायणाच्या गळ्यात घातली. लक्ष्मीच्या भावाने आनंदित झालेल्या नारायणाने आपल्या गळ्यातील ती माळ कौतुकाने लक्ष्मीच्याच गळ्यात घातली आणि तिलाही प्रेमाने आपल्याजवळ दुसऱ्या बाजूला बसवून घेतले.

नारायणाच्या या प्रेम अनुभवण्याच्या परीने नारद व लक्ष्मी हे दोघेही अत्यंत सुखावले खरे, परंतु तरीही त्या दोघांच्याही मनातील एक प्रकारची हुरहुर कायमच होती. त्यामुळे नारद व लक्ष्मी एकमेकांकडे सहेतुक नजरेने अजूनही पहातच होते. एकमेकांच्या मनातील विचार दोघांनाही जाणवत होते, पण तरी दोघेही काहीच न बोलता स्तब्धच राहिले होते. शेवटी न राहवून लक्ष्मीने या शांततेचा भंग केला आणि दोघांच्याही मनात असलेल्या एकीएक भावाला तिने शब्दरूप दिले. नारायणाच्या शेजारी बसलेली लक्ष्मी आपल्या जागेवरून उठून नारदासमोर येऊन उभी राहिली आणि आपले दोन्ही हात जोडून नम्रभावाने बोलू लागली.

‘‘हे नारायणप्रिय नारदा, आपल्या भक्तिभावाने या नारायणाच्या अंतःकरणाशी ऐक्य पावून, पुन्हा भक्तिभावाचा आनंद अनुभवण्यासाठीच तू वेगळा राहिलेला आहेस. त्यामुळेच तू नारायणाला अत्यंत प्रिय झालेला आहेस याची मला पूर्ण जाणीव आहे. हे माहात्म्य जसे या नारायणाचे आहे, तसेच तुझेही आहे आणि त्याचप्रमाणे या नारायणाच्या सगुण भक्तीचेही आहे. नारायणाशी सख्यभक्तीद्वारे ऐक्य साधून तू या नारायणाचा अत्यंत परमसखा होऊन राहिलेला आहेस. म्हणूनच सगुण प्रेम व माहात्म्य यांच्या संयोगातून निर्माण झालेल्या सख्यभक्तिभावाचे यथार्थ वर्णन, हे नारदा, केवळ तुला आणि तुलाच करता येणे शक्य आहे. सख्यभक्तीचा तुझा स्वानुभवच तुझ्या सगुण गायनातून साकार होत असतो. त्यामुळेच त्यातील शब्द व सूर यांच्याही पलीकडे, म्हणजे मुळाशी असलेला भाव, माझ्या मनाला स्पर्शीत व भारीत करून माझ्या अंतःकरणाचा ठाव घेतो. तुझ्या मुखातून श्रवण केलेल्या नारायणाच्या सगुण कथा या माझ्या मनाला नित्य प्रेरित असतात. तसे म्हटले तर त्या कथा, प्रसंग व त्यातील व्यक्ती आता भूतकाळात जमा झालेल्या आहेत. परंतु त्यातील सगुण प्रेम व भक्तिभाव, जो अजरामर व चिरंतन आहे तो मात्र माझ्याठायी जमा होत रहातो. माझ्या अंतरातील ही जमा झालेली पुंजीच मला या नारायणाची प्रत्यक्ष भक्ती करायला जणू भागच पाडते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ही पुंजी जेवढी उपयोगाला येते तेवढी ती कमी न होता अधिकच वाढत रहाते. म्हणूनच या

नारायणाच्या अंतःकरणाशी नित्य ऐक्य पावून राहणारी ही भक्ती जशी व जेवढी तुला प्रिय आहे, तशीच व तेवढीच ती मलाही प्रिय होऊन राहिलेली आहे.

हे भक्तिप्रिय नारदा, तू अत्यंत कृपावंत होऊन मला या नारायणाच्या कृष्णावतारातील, गोकुळातील चरित्राचे वर्णन रहस्यासहित गायन करून सांगितलेस. माझे तर हे थोर भाग्यच आहे. या नारायणाची अर्धांगिनी होण्याचे परमभाग्य मला विनासायासच प्राप्त झालेले आहे. परंतु त्याच्या सगुण चरित्राचे श्रवण करण्याची संधी मला मिळाली त्याला मात्र कशाचीच तोड नाही. ती केवळ तुझी माझ्यावरील कृपाच आहे हे अगदी सत्य आहे. तरीही आता हे नारदा, गोकूळ सोडून गेल्यानंतरचे कृष्णाचे पुढील सर्व चरित्र मला तू सविस्तरपणे सांगावेस आणि मला पूर्ण तृप्त करावेस एवढीच एक प्रार्थना मी तुझ्यापाशी करते. ती तू मान्य करशील याची मला पूर्ण खात्री आहे. कारण ते वर्णन करण्यासाठीची तुझ्या अंतःकरणातील आतुरताही मला निश्चितपणे माहीत आहे. ''

लक्ष्मीच्या बोलण्याने नारद संतुष्ट झाला आणि त्याच्या मुखावर संतोष व प्रसन्नता हे दोन्ही भाव झळकून, त्याचे मुख विशेष शोभायमान दिसू लागले. क्षणभरच अंतर्मुख होऊन नारदाने आपले नेत्र मिटून घेतले. अंतःकरणातील नारायणाच्या मूर्तीच्या दर्शनाने अधिकच व्याकूळ झालेल्या नारदाने आपले अश्रुपूर्ण नेत्र सहजपणे उघडले आणि नारायणाच्या मुखावर आपली नजर स्थिरावत नारद आपल्या जागेवरून उठून उभा राहिला. नारायणाच्या सन्मुख उभे राहून नारदाने आपले दोन्ही कर जोडून व आपली मान लववून नारायणाला आधी नमस्कार केला. नारायणाच्या चरणांवर आपले मस्तक ठेवून नारदाने त्याला साष्टांग प्रणिपात केला. नारायणाने अत्यंत प्रेमाने व कौतुकाने नारदाला उठवले आणि त्याला आपल्या मिठीत घेऊन त्याची पाठ थोपटली. नारायणाच्या सर्वांगाच्या स्पर्शाने नारद अधिकच उत्तेजित व उत्साहित झाला. नारदाचे सर्वांग तर रोमांचून आलेच, परंतु त्याचे सर्व भावही एकवटून दाटून आले. नारदाने लक्ष्मीला खुणेनेच नारायणाच्या शेजारी बसण्यासाठी निर्देश केला असता लक्ष्मीही नारायणाच्या जवळ स्थानापन्न झाली. लक्ष्मी व नारायण या प्रेमळ दांपत्याला हर्षभरे न्याहाळीत नारदाने बोलण्यास सुरुवात केली मात्र, त्याच्या अंतरातील सगुण प्रेमभक्तिभाव साकार होऊ लागला. सखोल अंतःकरणातून प्रगटणारी नारदाची वाणी वेग घेऊ लागली आणि सुस्पष्ट व समर्पक शब्दांचा प्रवाह वाहू लागला.

''हे नारायणप्रिय लक्ष्मी, मुळातच या नारायणाच्या अवतारलीला या सगुणप्रेमाने भरलेल्या असल्यामुळे अत्यंत गोड आहेतच. परंतु त्यातही कृष्णावतारातील प्रेमलीलांची गोडी काही खासच आहे. कारण या कृष्णचरित्रात जसे अनेकांना कृष्णाचे प्रेम अनुभवावयास मिळाले, तसेच अनेकांच्या ठिकाणी कृष्णाविषयी प्रेम निर्माणही झाले. एकच

प्रेम अनेकांनी त्यांच्या त्यांच्या भावानुसार घेतले आणि त्यांच्या त्यांच्या भावानुसार कृष्णाला दिलेही. परंतु या प्रेमभावामध्ये ज्याचा त्याचा स्वभावही प्रगट होत राहिला. त्यामुळे एकाच प्रेमरंगाच्या अनेकविध छटा सहजपणे प्रगट झाल्या. त्यामध्ये सुद्धा एका छटेसारखी दुसरी छटा नाही आणि एका छटेची तुलना दुसऱ्या छटेशी नाही, तर प्रत्येक छटेचे सौंदर्य हे आगळेवेगळेच राहिले. परंतु कृष्णाच्या स्वभावानुसार या प्रेमाची देवघेव मात्र नित्य होत राहिली. चंदन उगाळल्यावर त्याचा सुगंध जसा अधिकाधिक दरवळतो, तशी त्या प्रेमाची गोडी अधिकाधिक वाढत राहिली आणि अनेकांना ती प्रेमगोडी लागत राहिली.

हे लक्ष्मी, हे कृष्णप्रेम ज्यांच्यासाठी ईश्वराच्या सगुणभक्तिचा पाया ठरले, त्यांनी त्या सखोल व मजबूत पायावर कृष्णाच्या सगुणभक्तीचे मंदिर उभारले आणि आनंदाचा कळस गाठला. परंतु कृष्णाची अशी सगुणभक्ति घडण्यासाठी कृष्णाचे माहात्म्य, म्हणजेच त्याचे ईश्वरस्वरूप आकलन होणे, त्याचाच निश्चय होणे आणि त्याचाच ध्यास लागणे हे अत्यंत आवश्यक होते. त्यासाठी कृष्णाकडून त्याचे जे अतिअद्‌भुत असे चरित्र प्रगट झाले तेच साहाय्यभूत होणे शक्य होते. परंतु त्या कृष्णचरित्राकडे पहाण्याची योग्य अशी शुद्ध दृष्टी असल्याशिवाय कृष्णचरित्रातील त्याचे माहात्म्य जाणवणे शक्यच झाले नसते. तशी दृष्टी केवळ कृष्णाच्या सहवासात राहून त्याच्याशी साधलेल्या संवादातूनच प्राप्त होणे शक्य होते. बरं, कृष्णाचा असा नित्य सहवास व संवाद घडायचा तर कृष्णाशी अत्यंत जवळीकता असणे आवश्यक होते. अशी जवळीकता साधण्याची संधी जरी कृष्णाच्या स्वभावामुळे व त्यानेच घेतलेल्या पुढाकारामुळे गोकुळात अनेकांना मिळत होती, तरी तशी ती संधी बाह्यांगाने साधणे हे कृष्णाच्या पुढील चरित्रामध्ये अधिकाधिक कठीण होऊ लागले. कारण गोकूळ सोडून मथुरेला गेल्यावर कृष्णाच्या बाह्य जीवनात एकदम आमूलाग्र बदल झाला. त्याचे बाह्य जीवन वेगळे व अधिक वरच्या स्तरावर गेले. त्यामुळे अगदी सामान्यजनांपासूनचे, कृष्णाचे बाह्यांगाचे अंतर अधिक वाढल्यासारखे दिसू लागले आणि तसे म्हटले तर तेही खरेच होते. त्यामध्ये दोष कोणाचाही नव्हता, तर तो बदललेल्या बाह्य परिस्थितीचा परिणाम होता. नित्य पुढे पुढे धावणाऱ्या कालप्रवाहानुसार कृष्णाचेही जीवन वेगाने पुढे पुढे जात होते आणि कृष्णाचे अंगभूत असलेले अनेक दैवीगुण प्रकर्षाने प्रगट होत होते. त्यामुळे खरे तर कृष्णाचे माहात्म्यच अधिकाधिक प्रगट होत होते. परंतु कृष्णाकडे पहाण्याची तशी दृष्टी नसलेल्यांसाठी ते माहात्म्य अप्रगटच रहात होते. ''

नारदाचे बोलणे ऐकता ऐकता थोडीशी गंभीर झालेली लक्ष्मी त्याच गंभीरतेने बोलू लागली. ''हे नारदा, तुझ्या बोलण्याचा सूर मला तरी थोडासा वेगळाच जाणवत आहे. तुझ्या बोलण्यात उत्साहकता थोडीशी कमीच वाटत आहे. बाह्यांगाने परिस्थितीची अनुकूलता ही काळाच्या ओघात कमी झाली असेल तर ते अत्यंत साहजिकच आहे.

कारण निसर्गाचा तसा नियमच आहे. व्यक्ती जशा जशा लहानाच्या मोठ्या होत जातात, तसे तसे व्यक्ती-व्यक्तीमधील बाह्य अंतर वाढतच रहाते. पण अशाच वेळी मनाची जवळीकता किती आहे हे लक्षात येते आणि तीच उपयोगाला येते. मनातील प्रेमाचा ओघ कायम असेल तरच ही जवळीकता शक्य होते. हे नारदा, तुझ्या बोलण्यावरून एक गोष्ट माझ्या ध्यानात आली आहे, की गोकुळासारखे वातावरण व गोकुळासारखी संधी मथुरेमध्ये नव्हती आणि ती तशी असणेही शक्य नाही. कारण परिस्थितीत बदल होणे हे जसे अपेक्षित होते तसेच अनुकूलता कमी होणे हेही साहजिकच होते. पण मग या बदललेल्या परिस्थितीत कृष्णाचे चरित्र कसे कसे घडत राहिले? त्यामधून इतरांना कृष्णाशी जवळीकता साधण्याची काहीतरी संधी उपलब्ध झाली की नाही? आणि ती कोणी व कशी साधली असेल बरे? हे सर्व जाणून घेण्याची आतुरता माझ्या ठिकाणी फारच वाढून राहिलेली आहे. तेव्हा हे नारदा, आता तू पुढील प्रत्यक्ष कृष्णचरित्रच त्वरित सांग बरे! म्हणजे त्या वर्णनाच्या ओघाओघातच काही प्रश्नही निर्माण होतील, त्यांची योग्य उत्तरेही सापडतील, सर्व खुलासाही होत राहील आणि त्या निमित्ताने कृष्णाचे जीवन व अंतःकरण दोन्ही अधिकाधिक खुलत राहील. खरे की नाही? ''

लक्ष्मीच्या बोलण्यावर नारदाने हसून संमतीदर्शक मान डोलावली आणि मोठ्या उत्साहाने बोलण्यास सुरुवात केली. ''हे श्रवणप्रिय लक्ष्मी, कृष्णचरित्र हे जणू अनेक सागर एकत्र होऊन झालेल्या महासागराप्रमाणे आहे. 'प्रेम, दया, पराक्रम, ज्ञान व आनंद अशा एकेक सागराच्या मीलनातून निर्माण झालेला परमानंदसागर, म्हणजेच जणू कृष्णचरित्र होय' असेच कृष्णचरित्राचे वर्णन करावे लागेल. या परमानंदसागराशी केवळ भक्तीची भावसरिताच एकरूप होऊ शकली. सर्वांविषयीच्या प्रेमातून निर्माण झालेली सर्वांविषयीची दया आणि त्यामुळे सर्वांना रक्षण व आधार देण्यासाठी घडलेला पराक्रम, हा तर कृष्णचरित्राचा स्थायिभावच होता. त्याहीपलीकडे सर्वांच्या दुःखाचे मूळ असलेल्या अज्ञानाचे निरसन करण्यासाठी सर्वांना सांगितलेले सत्यज्ञान आणि सर्वांना प्रेमाने आणून दिलेला आनंदाचा अनुभव, हे कृष्णचरित्राचे आगळेवेगळेपण होते. परंतु सहवासात आलेल्यांना सख्यत्वाचे प्रेम देऊन त्यांच्यासह आपल्या प्रेमाचा अनुभव घेणे, या कृष्णाच्या सहज स्वभावामुळे अनेकांसाठी सगुण प्रेमभक्तीची संधी उपलब्ध झाली. मिळालेल्या सख्यत्वाच्या प्रेमातून व जवळीकतेतून कृष्णाचे माहात्म्य ज्यांना जाणवले, त्यांनी सख्यभक्तीद्वारे कृष्णाच्या अंतःकरणाशीच ऐक्य साधले आणि ते स्वतःच्याच अंतःकरणात कृष्णाशी एकरूप पावले. त्यामुळे कृष्णाच्या अंतःकरणातील आनंदाचा अनुभव हा त्या सख्यभक्तांचाही अगदी सहजपणे होऊन राहिला.

हे लक्ष्मी, कृष्णचरित्रातील हे विशेष अंग हेच मुख्य सूत्र धरून मी तुला आतापर्यंत कृष्णचरित्राचे वर्णन करून सांगितले. कारण कृष्णचरित्राच्या अनेक अंगांपैकी ज्या अंगाने

कृष्णाशी ऐक्य साधणे शक्य झाले, ते सख्यत्वाचे सूत्र हेच कृष्णाच्या जीवनातील मुख्य सूत्र आहे हे तर अगदी ओघानेच आले. गोकुळातील जीवनात कृष्णचरित्राचे हे अंग प्रकर्षाने प्रगट झाले हे अगदी खरे आहे. परंतु कृष्णाच्या पुढील जीवनात हे अंग जरी तेवढ्या विशेषत्वाने प्रगट होऊ शकले नसले, कारण ते अंग इतर अनेक अंगांमुळे जरा झाकोळल्यासारखे झाले, तरीसुद्धा 'कृष्णाशी भक्तिद्वारे ऐक्य पावण्यासाठी हे सख्यत्वाचे अंगच कारणीभूत व साहाय्यभूत होऊ शकते' हा मूळ सिद्धान्त व अनुभव मात्र तसाच अबाधित राहिला. म्हणूनच कृष्णाचे पुढील जीवनचरित्र वर्णन करताना त्या मुख्य अंगानेच प्रगट करणे मला आवश्यक वाटते. कारण कृष्णाचे पुढील सर्व चरित्र विविध कारणांसाठी एवढ्या विविध अंगांनी प्रगट झाले, की त्याचे सुसूत्र वर्णन करणे तर केवळ अशक्यच आहे. तेव्हा हेच सख्यत्वाचे मुख्य सूत्र हाताशी धरून मी पुढील कृष्णचरित्र वर्णन करून सांगणार आहे, जेणेकरून सख्यभक्तिमार्गाचेच माहात्म्य अधिकाधिक प्रगट होईल अणि तेच तर खरे आनंददायी व सर्वश्रेष्ठ आहे.

हे लक्ष्मी, कृष्ण व बलराम यांना आपल्या समवेत घेऊन अक्रुर सुरुवातीला रथ अत्यंत हळुहळू चालवीत होता. गोकुळवासीयांना झालेल्या कृष्णाच्या विरहाच्या दुःखाने अक्रुराचेच अंतःकरण जास्त जड झालेले होते. एक प्रकारच्या अपराधी भावनेने अक्रुराचे मन ग्रस्त झालेले होते. मनाने अजूनही गोकुळातच राहिल्यामुळे अक्रुर वारंवार मागे वळून बघत होता. परंतु त्यावेळी त्याला मागे रथात बसलेल्या कृष्णाचेच दर्शन घडे. कृष्णाच्या मुखावरील भाव पाहून अक्रुराला जाणवत होते, की कृष्णाचे मन मागे गोकुळात मुळीच गुंतून राहिलेले नाही. गोकुळातील सर्वांची मने जणू आपल्यात गुंतवून कृष्णाचे मन मात्र अगदी मोकळे राहिलेले दिसत होते आणि अक्रुराला याचेच मोठे नवल वाटत होते. कृष्ण वारंवार अक्रुराला आपल्या हाताने व नजरेने इशारा करून पुढे बघण्याविषयी व त्वरेने रथ चालविण्याविषयी सांगत होता. अक्रुराचे मन थोड्यावेळाने जसजसे हळुहळू शांत होऊ लागले तसा तसा त्याच्या मनात विचार येऊ लागला.

''ज्या कृष्णाच्या विरहाचे दुःख गोकुळवासीयांना झाले म्हणून मला एवढे वाईट व उदासीन वाटत आहे, तो कृष्ण तर प्रत्यक्ष आता माझ्या संगेच आहे. त्याचा सहवास करण्याची व त्याचे प्रेम अनुभवण्याची संधी मोठ्या भाग्याने मलाच मिळालेली आहे. मग मी जर मनाने त्या गोकुळातच गुंतून राहिलो, तर या कृष्णाच्या प्रत्यक्ष सहवासात असूनही मी त्याच्या प्रेमाला मुकेन आणि माझ्यासारखा दुर्भागी मीच ठरेन. तेव्हा हाताशी आलेली ही संधी आपण वाया न दवडता कृष्णाची काहीतरी सेवाच आपल्याकडून घडली पाहिजे. त्यासाठी कृष्णाचे मन ओळखून त्याप्रमाणे वागणे हाच अत्यंत सोपा उपाय आहे. त्या सेवाभावानेच आपल्याला कृष्णाचे प्रेम अनुभवता येणार आहे. आता तर कृष्णाच्या मनात

एकच विचार अगदी स्पष्टपणे दिसत आहे आणि तो म्हणजे लवकरात लवकर मथुरेला जाऊन पोहोचणे. तेव्हा तेच आपण आता केले पाहिजे. ''

अक्रुराच्या मनातील विचारांचे चक्र फिरता फिरता जेव्हा कृष्णापाशी येऊन थांबले तेव्हाच त्याचे मनही स्थिर झाले आणि कृष्णाच्या मनातील विचार ओळखून अक्रुराच्या मनातही त्याच विचाराचा निश्चय झाला. अक्रुराने कृष्णाकडे पाहून प्रेमाने मंदस्मित केले आणि 'कृष्णाचा इशारा त्याला कळला आहे' असे दर्शविण्यासाठी आपली मान होकारात्मक हलवली. अक्रुराने आपल्या हातातील लगामाद्वारे घोड्यांना तसा इशारा दिला मात्र, त्या समजूतदार घोड्यांनी एकदम वेग घेतला आणि रथ भरधाव वेगाने मथुरेच्या दिशेने दौडू लागला.

हे लक्ष्मी, कंसाने मथुरेत आयोजिलेल्या महोत्सवातील मल्लयुद्धात सहभागी होण्याच्या निमित्ताने जरी कृष्णाला बोलावलेले होते, तरी कृष्णाच्या ठिकाणी मात्र आतुरता होती ती वसुदेव व देवकी यांच्या भेटीची. वसुदेव व देवकी हेच आपले मातापिता आहेत हे कळल्यापासून तर कृष्णाचे मन अगदी बेचैनच झालेले होते. ''माझा प्राण वाचविण्यासाठी माझे पिता वसुदेव यांनी स्वतःच्या प्राणांची बाजी लावून आणि अत्यंत धोका पत्करून मला सुरक्षितपणे गोकुळात आणून पोहोचविले. त्यानंतरही गेली जवळ जवळ बारा वर्षे माझे मातापिता कंसाच्या कारागृहात केवळ माझ्यासाठी म्हणून केवढेतरी कष्टप्रद जीवन जगले. त्या वेळेस त्या उभयतांच्या आणि त्यातूनही माझी माता देवकी हिच्या मनाची अवस्था काय झाली असेल? किती मानसिक क्लेश त्यांना सहन करावे लागले असतील बरे? '' अशा विचारांनी कृष्णाचे मन अत्यंत व्याकूळ झालेले होते. 'माझ्या मातापित्यांनी माझ्या बाबतीतले त्यांचे कर्तव्यकर्म प्रयत्नांची पराकाष्ठा करून पार पाडले. आता त्यांच्याबाबतचे कर्तव्यकर्म पार पाडण्याची वेळ व जबाबदारी माझ्यावर आलेली आहे. कुठल्याही परिस्थितीत व काहीही करून मला माझ्या मातापित्यांची कंसाच्या कारागृहातून कायमची सुटका करायचीच आहे' असा कृतनिश्चय कृष्णाच्या मनाचा झालेला होता. त्यामुळे कृष्णाचे मन आधीच मथुरेत जाऊन त्याच्या मातापित्यांच्या जवळ गेलेले होते. तरीही त्याला मातापित्यांच्या प्रत्यक्ष भेटीची ओढ एवढी लागलेली होती, की रथाचा वेग त्याला कमीच जाणवत होता. म्हणूनच कृष्ण अक्रुराला रथाचा वेग वाढविण्यासाठी वारंवार सूचना करीत होता. अक्रुरही कृष्णाच्या मनाची अवस्था ओळखून त्याच्या परीने जास्तीत जास्त प्रयत्न करीत होताच. परंतु कृष्णाची अधीरता मात्र सतत वाढतच होती.

हे लक्ष्मी, कृष्णाच्या हातूनच कंसाचा मृत्यू आहे हे जरी कृष्णाला कळले होते, तरी त्याच्या ठिकाणी मात्र कंसाच्या मृत्यूचा विचार प्राधान्यानेच काय, पण अजिबात नव्हता.

'कंसाचा मृत्यू माझ्या हातून आहे. त्यासाठी आता कंसाला केव्हा व कसा मृत्यू द्यावा' असा काही विचार किंवा त्याची काही योजना कृष्णाच्या मनात मुळीच येत नव्हती. त्याचे मन त्या बाबतीत अगदी स्वस्थ होते. कृष्णासाठी तो जराही काळजीचा विषय नव्हताच मुळी! 'योग्य वेळ येताच सर्व काही सहजपणे घडेल' अशी कृष्णाची पक्की खात्री होती. कृष्णाच्या स्वभावाचे हेच तर वैशिष्ट्य होते आणि त्याच्या आत्मविश्वासाचे तेच तर लक्षण होते.

*****



# कंसवध- कृष्णाची माता-पिता भेट

**हे** लक्ष्मी, अक्रुराच्या इशाऱ्यानुसार रथाच्या घोड्यांनी कितीही वेग वाढवला तरी कोणाच्याही मनाच्या वेगाएवढा वेग घेणे हे त्या घोड्यांना शक्यच झाले नसते. त्यामुळेच त्या घोड्यांनी धावण्याचा वाढवलेला वेगही कृष्णाच्या मनाला कितीतरी कमीच जाणवत होता. मनाने तर कृष्ण मथुरेला केव्हाच पोहोचलेला होता. त्यामुळे कृष्णाच्या मनाची होणारी अस्वस्थता लपून राहू शकतच नव्हती. त्याच्या मुखावरती ती मनातील अस्वस्थता दृग्गोचर होतच होती. कृष्णाच्या मनाची अस्वस्थता लक्षात येऊन अक्रुरही अस्वस्थ होत होता. परंतु ठरावीक मर्यादेपुढे त्याचाही इलाज चालतच नव्हता. मात्र अशाही परिस्थितीत कृष्णाने घोड्यांना आवश्यक ती विश्रांती मिळावी म्हणून प्रवासात काही थांबे घेणे अक्रुरास भाग पाडले. कृष्णाच्या मनातील ही जीवदया व प्रेम पाहून अक्रुराला नवल तर वाटले नाहीच, परंतु कृष्णाच्या मनाचा मोठेपणा पाहून त्याला कृष्णाची थोरवीच अधिक जाणवली. अशा तऱ्हेने प्रवास करीत कृष्णाचे बलरामासह मथुरेत भर माध्यान्ही आगमन झाले.

मथुरेत होणाऱ्या महोत्सवाच्या निमित्ताने सर्व शहर आधीपासूनच सजवलेले होते. गुढ्या व तोरणे उभारून रस्त्यावरती रंगीत व सुशोभित अशा नानाविध रांगोळ्याही काढलेल्या होत्या. पण या सर्वाला खरी शोभा कृष्णाच्या येण्यामुळेच आली. जणुकाही हे सर्व कृष्णाच्या स्वागतासाठीच केलेले होते असेच जाणवू लागले. कृष्णाचे आगमन मथुरेत होणार आहे याची कुणकुण सर्वच मथुरावासीयांना लागलेली होती. कृष्णाच्या रूपगुणांची कीर्ती मथुरेतील जनांच्या कानावरती आधीपासूनच आलेली होती. कित्येकजण तर अगदी कृष्णाच्या जणू प्रेमातच पडलेले होते. अनेकजणांना कृष्णाला पहाण्याची अत्यंत उत्सुकता लागून राहिलेली होती. त्यातूनही कृष्ण हा कंसाच्या बंदिवासात असलेल्या वसुदेव व देवकी यांचा पुत्र आहे हे कळल्यापासून तर सर्व मथुरावासीजन कृष्णाविषयी अधिकच भावनात्मक झालेले होते. वसुदेव व देवकी यांच्यासारख्या सत्प्रवृत्तीच्या आणि सामान्यजनांसाठी अत्यंत आदरणीय व प्रिय असलेल्यांना कंसाने बंदिवासात ठेवलेले असल्यामुळे, सामान्यजन कंसावर अत्यंत नाराजच होते. परंतु कंसापुढे काहीच इलाज चालत नसल्यामुळे हातावर हात ठेवून स्वस्थ बसण्यापलीकडे सामान्य नागरिक काही करूच शकत नव्हते. अशा पार्श्वभूमीवर कृष्णाचे मथुरेत होणारे आगमन हे सर्वच

मथुरावासीयांना अत्यंत आशादायी व आश्वासक वाटत होते. म्हणूनच कृष्णाच्या वाटेकडे डोळे लावून सर्वजण त्याची अत्यंत आतुरतेने प्रतीक्षा करीत होते.

हे लक्ष्मी, अशा पार्श्वभूमीवर कृष्णाचा मथुरेत झालेला प्रवेश हा अत्यंत लक्षणीय असाच ठरला. मथुरा नगरीत प्रवेश केल्यानंतर अक्रुराने रथाचा वेग अत्यंत कमी केला. खरे तर, त्यात अक्रुराचा हेतू असा होता, की कृष्णाला मथुरा नगरी नीटपणे व व्यवस्थित पहाता यावी. परंतु झाले काय, तर त्याचा प्रत्यक्ष फायदा मथुरावासीयांनाच झाला. कृष्णाला अत्यंत जवळून व बराच वेळ पहाण्याची संधी त्यांना मिळाली आणि कृष्णाच्या प्रथम दर्शनानेच सर्वजण कृष्णाच्या प्रेमातच पडले. कृष्णाच्या शरीराची नाजूक चण व सुडौल बांधा, कृष्णाची काळीसावळी पण तेजस्वी कांती, प्रसन्न व आत्मविश्वासी मुद्रा, मागे मानेपर्यंत रुळणारे व पुढे कपाळावर किंचित झुकणारे काळे-कुरळे केस अणि त्याहीपेक्षा मुख्य म्हणजे, सर्वांकडे अत्यंत आपलेपणाने व प्रेमाने न्याहाळून पाहणारी नजर या कृष्णाच्या रूपविशेषत्वामुळे सर्वांचीच मने त्याच्याकडे सहजपणे आकर्षिली गेली, यात नवल ते काय? साहजिकच सर्वजण अत्यंत प्रेमाने व उत्साहाने कृष्णाचे स्वागत करण्यासाठी पुढे सरसावले.

कृष्णाशी हस्तांदोलन करून त्याला स्पर्श करण्यासाठी सर्वांच्यात अहमहमिका सुरू झाली. सर्वांच्या भावनेचा हात जोडून स्वीकार करता करता न राहवून शेवटी कृष्णच रथातून खाली उतरला आणि सर्वांच्यात मिसळून गेला. कृष्णाचे बोलणे व वावरणे एवढे सहजपणे होत होते, की जणू काही त्याच्यासाठी ते सर्वजण, अगदी तेथील परिसरासहितही, पूर्वपरिचितच होते. लक्ष्मी, आणि तेही खरेच होते ना? कारण मथुरा हेच तर कृष्णाचे जन्मस्थान होते आणि यादव हेच त्याचे जन्मकुळ होते. काही कारणांमुळे घडलेले गोकुळातील बारा वर्षांचे वास्तव्य संपवून कृष्ण पुन्हा आपल्या मूळस्थानी परत आला होता. त्यामुळेच की काय, पण कृष्णाच्या ठिकाणी परकेपणाच्या भावनेचा लवलेशही दिसतच नव्हता. त्याचबरोबर मथुराजनांना सुद्धा कृष्ण अजिबात परका न वाटता, कृष्ण कोणीतरी आपला अत्यंत जवळचा व प्रेमाचा आहे असेच जाणवत होते आणि त्यांच्याही कृतीतून ते अगदी सहजपणे व्यक्त होत होते.

हे लक्ष्मी, कृष्णाला पाहून अनेकांच्या मनात भाव मात्र अगदी वेगवेगळे निर्माण झाले. कोणाला तो आपल्याच मुलासारखा वाटला, तर कोणाला तो आपल्या भावासारखा वाटू लागला. कोणाला आपला प्रिय सखा भेटल्यासारखे झाले, तर कोणाला आपल्या संकटातून व दुःखातून मुक्त करणारा असा त्राताच आल्यासारखे जाणवू लागले. कोणाला कृष्ण म्हणजे त्यांच्या अत्यंत प्रेमाची व जवळची अशी व्यक्तीच आल्यासारखे जाणवले. काहीजणांना कृष्णाच्या रूपाने आपल्यासाठी साक्षात देवदूतच आला आहे असे

जाणवले. तर काहीजणांना कृष्ण हा कंसासाठी साक्षात 'काळ' होऊनच आला आहे असेच वाटू लागले. 'कंसाच्या जुलमाचे व दडपशाहीचे दुःखमय दिवस संपून सुखाच्या व शांतीच्या जीवनाची आता सुरुवात होणार' याची खात्री मात्र सर्वांच्याच मनाला पुरेपूर पटली आणि सर्वांना अगदी निश्चिंत व मोकळे मोकळे वाटू लागले.

आपल्या मनातील वेगळे वेगळे भाव ज्याने त्याने वेगळ्या वेगळ्या कृतीद्वारे व्यक्त केले. कोणी कृष्णाच्या मस्तकावर व पाठीवर थोपटले, तर कोणी त्याला प्रेमाने आलिंगनच दिले. कोणी कृष्णाच्या गालावर व कपाळावर आपले ओठ ठेवून आपला भाव व्यक्त केला. कोणी बरोबर आणलेले खास पदार्थ कृष्णाला केवळ देऊच केले नाहीत, तर अत्यंत कौतुकाने, आपल्या हाताने त्याला भरवलेही. कोणी कृष्णाच्या गळ्यात फुलांच्या माळाही घातल्या आणि आपला आनंद व्यक्त केला. त्याचवेळी कंसाच्या राजवाड्यात निघालेली एक दासी संकोचाने दुरूनच अनिमिष नेत्रांनी कृष्णाकडे पहातच राहिली होती. कृष्णाने तिच्या नेत्रांतील भाव ओळखला आणि तो आपणहून त्या दासीच्या जवळ गेला. त्या दासीजवळ कंसाच्या राजवाड्यात देण्यासाठी म्हणून उगाळलेली चंदनाची उटी होती. परंतु कृष्णाला पहाताच तिला अगदी कृतकृत्य झाल्यासारखे वाटले आणि तिने ती चंदनाची उटी कृष्णालाच अर्पण केली. एवढेच नव्हे, तर त्या दासीने आपल्या हाताने ती चंदनाची उटी कृष्णाच्या अंगाला लावून त्याला सुगंधित केले. तिच्या अर्पण भावाने प्रसन्न झालेल्या कृष्णाने त्या दासीला अत्यंत प्रेमाने आलिंगन देऊन तिचीही काया सुगंधित आणि धन्य केली.

हे लक्ष्मी, मथुरावासीयांनी अत्यंत प्रेमाने व उत्स्फूर्तपणे केलेल्या कृष्णाच्या स्वागताची बातमी साहजिकच कंसाच्या दूतांनी त्याच्या कानावर घातली. त्यामुळे रागाने कंसाच्या अंगाची नुसती लाही लाही झाली. मथुरावासीजनांचे कृष्णावरील असे प्रेम कंसाला अजिबात सहन झाले नाही. त्याची परिणती म्हणजे कंसाचा कृष्णावरील राग अधिकच वाढला आणि त्याच्या रागाचा पाराही अधिकच चढला. मनाचा तोल गेलेल्या कंसाने, कृष्ण राजवाड्यात प्रवेश करीत असताना प्रवेशद्वाराजवळच कृष्णाच्या अंगावर एका मदोन्मत्त हत्तीला सोडले. कृष्णाने लीलया त्या हत्तीच्या सोंडेला धरून पिरगळले आणि त्याला जर्जर करून नामोहरम केले. कृष्णाच्या या पराक्रमाचे तेथे हजर असलेल्या सर्वांनी कौतुक करून कृष्णाची पाठ थोपटली. परंतु कंसाची मात्र भीतीने अगदी गाळण उडाली. तरीही खोटे अवसान आणून कंसाने आपल्या मनातील भीती चेहऱ्यावर दिसू दिली नाही. पुढे कंसाच्या दरबारात जेव्हा प्रत्यक्ष कुस्तीचा फड सुरू झाला, तेव्हा जाणूनबुजून कृष्ण व बलराम यांची कुस्ती त्यांच्यापेक्षा वयाने मोठ्या व शरीराने बलदंड असलेल्या चाणूर व मुष्टीक यांच्याशी लावण्यात आली. कृष्ण व बलराम यांनी हसून या आव्हानाचा स्वीकार केला आणि त्यांना खेळवत खेळवत चीतपटही केले. पराभवाच्या

नामुष्कीने चिडलेले चाणूर व मुष्टीक जेव्हा कृष्ण व बलराम यांच्यावर त्यांना मारण्याच्या उद्देशाने धावून गेले, तेव्हा मग कृष्ण व बलराम यांनीही रुद्रावतार धारण केला आणि कंसासमक्ष भर दरबारात त्या उभयतांना यमसदनास पाठवले. आता मात्र कंसाचे सर्व अवसान गळून पडले. तरीही प्रक्षुब्ध होऊन व जिवाच्या आकांताने कंस हातात गदा घेऊन कृष्णाच्या अंगावर धावून गेला.

हे लक्ष्मी, कृष्णाने क्षणभरच कंसाकडे आपल्या तेजस्वी नजरेने रोखून पाहिले. त्या नजरेतील तेज कंसाला सहन होईना. त्याच्या हातातील गदा गळून पडली. तरीही कंस आवेशाने कृष्णाच्या अंगावर चालून गेला. कृष्णाने मनामध्ये ओळखले की कंसवधाची वेळ येऊन ठेपलेली आहे. म्हणून आपले सर्व बळ एकवटून कृष्णाने कंसाला आपल्या मिठीत घट्ट दाबून धरले. असहाय्य झालेल्या कंसाने पुष्कळ तडफड केली परंतु कृष्णाच्या मिठीतून त्याला स्वतःची सुटका करणे जमेचना. शेवटी निश्चेष्ट झालेल्या कंसाला कृष्णाने भूमीवर पाडले आणि स्वतः त्याच्या छातीवर बसून, आपल्या दोन्ही हातांनी कंसाच्या नाकातोंडावर व छातीवर एका मागून एक असे ठोसे मारू लागला. त्या असह्य माऱ्याने जर्जर झालेल्या कंसाच्या नाकातोंडातून रक्त बाहेर येऊ लागले आणि शेवटी कंस तेथेच निष्प्राण होऊन पडला.

हे लक्ष्मी, कंसाचा वध एवढ्या अचानक व अकस्मात घडल्याचे तुला वाटत असलेले नवल अत्यंत साहजिकच आहे. कारण प्रत्यक्ष कंसवध होत असताना सुद्धा सर्वजण अवाकच झालेले होते. काय होते आहे हे कळण्याच्या आतच कंसाचा मृतदेह खाली पडून सर्व खेळ खलास झाला होता. त्या ठिकाणी हजर असलेले कंसाचे सैनिकही थक्क व दिङ्मूढ होऊन राहिले होते. थोड्या वेळाने काय झाले आहे हे लक्षात आल्यावरही अनेक सैनिक स्तब्धच बसून राहिले. जुलमी, राक्षसी वृत्तीच्या कंसापासून मुक्त झाल्याने त्यांना हायसेच वाटले आणि त्यांनी कृष्णाचे मनापासून कौतुकच केले. परंतु काही निष्ठावान सैनिक मात्र उशिरा का होईना पण भानावर येऊन पुढे सरसावले आणि त्यांनी कृष्णावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. परंतु सावध असलेल्या कृष्णाने तेथे पडलेली कंसाचीच गदा उचलून हातात घेतली आणि बलरामाच्या साहाय्याने त्या सैनिकांवर प्रतिहल्लाच चढवला. बलरामालाही एकदम चेवच आला. त्यानेही एका सैनिकाच्या हातातील गदा हिसकावून घेतली आणि वेगाने गरागरा फिरवावयास सुरुवात केली. कृष्ण व बलराम यांचा आवेग व आवेश पाहून सैनिकांच्या मनात धडकीच भरली आणि त्यांची प्रतिकार करण्याची शक्तीच गळून पडली. आपल्या हातातील शस्त्रे खाली टाकून त्या सैनिकांनी कृष्ण-बलरामापुढे शरणागती पत्करली असता, कृष्णाने मोठ्या मनाने त्यांना अभयदान दिले. क्षणार्धात् दरबारातील इतर सर्वजण उठून उभे राहिले आणि त्यांनी आनंदाचा एकच जल्लोष केला. कंसवधाची बातमी वाऱ्यासारखी सर्व मथुरेत

पसरली आणि सर्व नागरिक बेहोष होऊन राजवाड्याकडे धावत सुटले. कृष्णाचे कौतुक करण्यासाठी ते नागरिक अगदी आसुसलेले होते. कधी एकदा कृष्णाला भेटतो असेच त्या सर्वांना झालेले होते. परंतु कंसाच्या राजवाड्यात येऊन पहातात तो काय, कृष्ण तेथे नव्हताच!

हे लक्ष्मी, कंसाचा मृत्यू झाल्याची निश्चिती झाल्याबरोबर कृष्णाने पहिली गोष्ट काय केली असेल, तर तो बलरामासह धावतच कंसाच्या बंदीगृहाकडे गेला. कंसवधाची बातमी त्या ठिकाणीही पोहोचलेलीच होती. त्यामुळे तेथील पहारेकऱ्यांनी कृष्णाचे स्वागतच केले. कृष्ण तडक वसुदेव व देवकी यांच्याच समोर जाऊन उभा राहिला. आश्चर्यवत् नजरेने पहाणाऱ्या वसुदेव व देवकी यांना उद्देशून कृष्ण जेमतेम एवढेच म्हणाला, ‘‘हे तात, हे माते, मी आलोय! ’’ आणि एकदम देवकीच्या कुशीतच शिरला. कृष्णाच्या स्पर्शाने देवकीचे सर्वांग मोहरून आले. तिच्या ठिकाणचा वात्सल्यभाव एकदम दाटून वाहू लागला आणि मग तिला तिच्या पुत्राची ओळख करून देण्याची वेगळी काही गरजच राहिली नाही. पुत्रप्रेमाने कंठ दाटून येऊन देवकीने कृष्णाला आपल्या मिठीत घेतले आणि कृष्णाच्या सर्वांगावर आपला हात फिरवीत तिने एवढी वर्षे आपल्या नेत्रांत साठवून ठेवलेल्या अश्रुधारांना वाट मोकळी करून दिली. खरेच, सुरुवातीला आपल्या पुत्राच्या विरहाने सतत रडणाऱ्या देवकीचे अश्रूही पुढे पुढे आटून तिचे नेत्र अगदी कोरडे झाले होते. तिच्या चेहऱ्यावर नेहमीच सुन्नता व स्वतःच स्वतःला विसरल्यासारखे भाव असत. नजरही नेहमी शून्यवतच दिसत असे. केवळ शरीरानेच ती जगत होती. पण तिचे मन त्या शरीरातून कधीच तिला सोडून निघून गेल्यासारखे झाले होते. पण अचानक जादूची कांडी फिरल्यासारखे, कृष्णाच्या स्पर्शामुळे देवकीच्याठायीचे चैतन्य पुन्हा जागृत झाले आणि तिच्या मनानेही पुन्हा उभारी घेतली. कृष्णप्रेमाने ऊर भरून वाहणाऱ्या देवकीला कृष्णाला आपल्या मिठीतून दूर करणे शक्यच होत नव्हते आणि कृष्णालाही तसे दूर होणे शक्य होत नव्हते.

हे लक्ष्मी, एवढा वेळ मातापुत्रांचे भावपूर्ण मीलन पहात असलेला वसुदेवसुद्धा तेवढाच भावपूर्ण झाला होता. आपल्या पुत्रांना ओळखायला वसुदेवालाही जरासुद्धा वेळ लागला नाही. तरीही आपला भावनावेग वसुदेवाने मोठ्या संयमाने आवरला होता. डोळ्यांत पाणी आणून बावरलेल्या अवस्थेत तेथेच उभ्या असलेल्या बलरामाला वसुदेवाने प्रेमाने आपल्या कुशीत घेतले आणि तो त्याचे सांत्वन करीत राहिला. थोड्या वेळाने वसुदेव देवकी व कृष्ण यांच्याजवळ आला आणि अत्यंत प्रेमाने आपला हात कृष्णाच्या मस्तकावर ठेवून ते कुरवाळू लागला. वसुदेव आपल्या दुसऱ्या हाताने देवकीचे मस्तक आपलेपणाने थोपटीत राहिला. वसुदेवाच्या प्रेमळ व आश्वासक स्पर्शाने देवकी व कृष्ण हे उभयता सावरले आणि भानावर आले. वसुदेवाच्या चरणांना वाकून नमस्कार करू

पहाणाऱ्या कृष्णाला वसुदेवाने आपल्या दोन्ही हातांनी धरून वर उचलले आणि आपल्या मिठीत घेतले. कृष्णाच्या सर्वांगावर प्रेमाने आपला हात फिरवीत वसुदेवानेही आपल्या भावनेला वाट मोकळी करून दिली आणि आपल्या प्रेमाश्रूंनी कृष्णाच्या मुखकमलाला अक्षरशः न्हाऊ घातले. वसुदेवाने मग एका हाताने आधार देऊन देवकीलाही उठवले आणि त्याच्या व कृष्णाच्या मीलनात तिला सामावून घेतले. सर्व विरह व वियोग पूर्णपणे संपून माता, पिता व पुत्र यांचे पुनर्मीलन घडवणारा तो भावपूर्ण प्रसंग पाहून, तेथे उपस्थित असलेल्या सर्वांचेच नेत्र पाणावून वाहू लागले. ''

त्या भावपूर्ण प्रसंगाचे वर्णन करताना नारदाची अवस्थाही साहजिकच अत्यंत भावपूर्ण झाली होती. त्याच्या बोलण्याचा वेगही मंदावला होता आणि त्याचे शब्दोच्चारही अस्पष्ट होऊ लागले होते. त्यातच लक्ष्मीच्या स्फुंदण्याचा हळुवार आवाज नारदाच्या कानावर आला आणि मग मात्र नारदाचे बोलणे पूर्णपणे थांबलेच. आपले अश्रुपूर्ण नेत्र हलकेच उघडून नारद लक्ष्मीकडे पाहू लागला. प्रेमाने भरून आलेले लक्ष्मीचे मन नारदाला जाणवले आणि त्याला लक्ष्मीचे कौतुकच वाटले. नारदाने तसाच थोडा वेळ जाऊ दिला आणि लक्ष्मीचा भावनावेग कमी होण्याची वाट पहात नारद शांतपणे बसून राहिला. काही वेळाने लक्ष्मीने स्वतःचे स्वतःलाच सावरले आणि मग नारदाला उद्देशून अगदी हळुवार आवाजात ती बोलू लागली.

''हे नारदा, वसुदेव, देवकी व कृष्ण यांच्या भेटीच्या व मीलनाच्या प्रसंगाने कोणीही भावपूर्ण न होईल तरच ते नवल म्हणावे लागेल. असा प्रसंग कोणाच्याही बाबतीत घडू शकतो हे जरी खरे असले, तरी हा प्रसंग कृष्णचरित्रातील आहे हे त्याचे विशेषत्व आहेच. म्हणूनच तुझ्याकडून त्या भावपूर्ण प्रसंगाचे वर्णनही विशेष भावपूर्णतेने झाले आणि हेसुद्धा तुझ्याकडून अगदी सहजतेने घडले. नारदा, तूच बघ ना! कंसाच्या वधाचा, कृष्णाच्या पराक्रमाचा प्रसंग तू तसा अगदी थोडक्यातच सांगितलास. परंतु कृष्णाने धावत जाऊन घेतलेल्या वसुदेव व देवकी यांच्या भेटीचे वर्णन मात्र तुझ्याकडून अगदी भावूपर्णतेने घडले. त्या वर्णनात तू पूर्ण एकरूप झाला होतास! खरे की नाही? असा फरक तुझ्याकडून अगदी सहज घडला हे खरे आहे. परंतु तरीही असा फरक का घडला असावा बरे, असा विचार माझ्या मनात उद्भवतो आहेच. त्याचे एखादे वेळेस निश्चित असे काही कारण नसेलही. पण काहीतरी थोडेफार असे कारण असेलच की नाही? ते जाणून घेण्याची थोडीशी का होईना, पण उत्सुकता माझ्या ठिकाणी निश्चितच आहे. ''

लक्ष्मीच्या बोलण्यावर नारदाने मंदस्मित केले आणि किंचित थांबून बोलण्यास सुरुवात केली. ''हे लक्ष्मी, मला तुझे खरेच कौतुकच वाटते. माझ्या वर्णनातील जो फरक तुझ्या लक्षात आला तो खरे तर अगदी सूक्ष्म आहे. परंतु तरीही तो तुला जाणवला हे

तुझ्याकडून घडत असलेल्या श्रवणभक्तीचेच लक्षण आहे. लक्ष्मी, तुझे म्हणणे अगदी बरोबर आहे. कंसवध व कृष्णाची वसुदेव व देवकी यांच्याशी झालेली मीलनभेट, या दोन प्रसंगांच्या वर्णनात माझ्याकडून सहजपणे का होईना, पण फरक घडला हे खरेच आहे. त्यातील पहिला कंसवधाचा प्रसंग हा कृष्णाच्या पराक्रमाचा होता, तर दुसरा वसुदेव व देवकी यांच्या भेटीचा प्रसंग कृष्णाच्या भावपूर्ण अवस्थेचा होता. कृष्णाचा पराक्रम हा दैवीच होता. नाहीतर बारा वर्षांच्या लहान मुलाकडून एवढ्या मोठ्या बलदंड मल्लांचा आणि बलवान अशा कंसाचा वध होणे कधीच शक्य नव्हते. असे पराक्रम दैवी शक्तीमुळे कृष्णाकडून आधीही पुष्कळ घडलेले होते आणि त्यानंतरच्या त्याच्या पुढील आयुष्यातही पुष्कळ घडले.

असे पराक्रम सज्जनांना छळणाऱ्या दुष्टांचे निर्दालन करण्यासाठी प्रगट होत असतात. त्यामागेही सज्जनांविषयीचा आपलेपणा व कळवळा हेच मूळ कारण असते. परंतु भावपूर्ण प्रसंग मात्र आपल्या प्रेमाच्या व्यक्तींविषयीच कृष्णाकडून घडले आणि भावपूर्ण अवस्था ही तर कृष्णाच्या अंतःकरणाची कायमची अवस्था आहे. तो तर त्याचा स्थायिभाव आहे. कारण तेच त्याच्या ईश्वरी अनुभवाचे लक्षण आहे. कृष्णाकडून घडलेले पराक्रम हे सुद्धा त्याच्या ईश्वरी अनुभवातूनच घडले, हे जरी खरे असले तरी ईश्वरी अनुभवातील कृष्णाची भावपूर्णता मात्र त्याच्या प्रेमाच्या व्यक्तींबाबतीत व त्यातूनही विशेषतः भक्तांच्या बाबतीत प्रगट झाली. तेथेच व तेव्हाच कृष्णाचे अंतःकरण पूर्णपणे व मोकळेपणाने प्रगट झाले. म्हणूनच अशा भावपूर्ण प्रसंगाचे वर्णन करताना, आपण अगदी कृष्णाच्या अंतःकरणाजवळ आहोत आणि कृष्ण आपल्या अंतःकरणाच्या जवळ आहे असाच अनुभव होऊन राहतो. साहजिकच अशा भावपूर्ण प्रसंगाचे वर्णनही अधिक सखोलतेने व म्हणून विस्तृतपणे घडते आणि त्यातील भावपूर्णतेच्या आनंददायी अनुभवात मन पूर्णपणे बुडून रहाते. ''

नारदाच्या बोलण्याने लक्ष्मीच्या मुखावर समाधानाचे हास्य झळकले. कौतुकाने मान डोलवीत ती नारदाला उद्देशून बोलू लागली, ''हे नारदा, तुझे बोलणे अत्यंत संयुक्तिकच आहे. कृष्णाच्या अंतःकरणातील भावपूर्णता हीच जाणून घेण्याची व अनुभवण्याची मुख्य गोष्ट आहे. म्हणूनच कृष्णाची अशी भावपूर्णता प्रगट करणारे प्रसंग हेच वर्णनीय आहेत आणि त्या प्रसंगाला कारणीभूत होणारे त्याचे भक्त हेच खरे कौतुकास्पद आहेत. परंतु नारदा, कंसाच्या वधामुळे एका दुष्ट प्रवृत्तीच्या व्यक्तीचा नाश झाला, हेही खरेच आहे ना? त्यामुळेच केवळ वसुदेव व देवकी यांची सुटका कंसाच्या अत्याचारांपासून झाली एवढेच नव्हे, तर अनेक सात्त्विक सज्जनांनाही कंसाच्या जुलमी सत्तेपासून मुक्तता मिळाली असणार हेसुद्धा नक्कीच आहे. त्या सर्वांनाही मुक्त जीवनाचा आनंद प्राप्त झाला असणारच, नाही का? ''

***

लक्ष्मीच्या बोलण्यावर किंचितसे हास्य करून नारद उद्‌गारला, ''अगं लक्ष्मी, खरी मुक्तता जर कोणाला लाभली असेल, तर ती त्या कंसालाच होय! मूळचा दुर्जनच व स्वार्थी असल्यामुळे, प्रत्यक्ष त्याचा पिता उग्रसेन याला दूर हटवून आणि बंदिवासात ठेवून सत्तेच्या व राज्याच्या लोभाने कंस स्वतःच राज्यसिंहासनावर बसला होता. त्यातूनही आपली भगिनी देवकी हिच्या आठव्या पुत्राच्या हातूनच आपला मृत्यू आहे हे कळल्यावर तर कंसाच्या दुष्प्रवृत्तींनी अगदी टोकच गाठले. केवळ वसुदेव व देवकी यांना बंदिवासात ठेवूनच कंसाच्या मनाचे समाधान झाले नाही. पुढे कृष्णाला शोधून ठार मारण्याच्या हेतूने त्याने अनेकांवर अत्याचार केले. एवढेच नव्हे, तर मथुरेच्या आजूबाजूच्या परिसरातील अनेक नवजात बालकांची त्याने निर्घृण हत्या करवली. त्याचे पापाचे डोंगर एकीकडे तर एवढे वाढत होते, की त्याच्या भाराखाली त्याच्यातील उरल्या सुरल्या सत्प्रवृत्तीही मरून नामशेष झाल्या. एवढेच काय, अगं, कंसाची दया येऊन अगदी मी सुद्धा कंसाचे मन वळवून त्याच्या ठिकाणच्या मृतप्राय सत्प्रवृत्तींमध्ये प्राण फुंकण्याचा आटोकाट प्रयत्न केला खरा, परंतु या नारायणाची नियती हीच श्रेष्ठ व अंतिम असते. त्यामुळे माझ्याही प्रयत्नाला यश आले नाही. मला मात्र प्रयत्न केल्याचे समाधान मिळाले, इतकेच!

हे लक्ष्मी, एक महत्त्वाची गोष्ट घडली जी तुझ्या लक्षात आलेली दिसत नाही, आणि ती म्हणजे कंसाच्या ठिकाणी लागलेला कृष्णाचा ध्यास! भीतीने का होईना, पण त्याला सतत कृष्णाची आठवण येत राही. खरे तर, कंसाने कृष्णाला आधी कधी पाहिलेही नव्हते आणि सुरुवातीला तर त्याला त्याचे 'कृष्ण' हे नावही माहीत नव्हते. फक्त 'देवकीचा आठवा पुत्र' एवढेच कंसाला ठाऊक होते. पण तरीही मृत्यूच्या भीतीने कंसाला स्वतःच्या आजूबाजूला कृष्णाचे अस्तित्व व वावर सारखा जाणवत असे आणि त्यामुळेच तो नेहमी भीतीने घाबरलेल्या अवस्थेत असे. त्याच्या ध्यानी, मनी आणि म्हणून स्वप्नीसुद्धा त्याला कृष्णाचाच भीतीदायक ध्यास लागून राहिला होता. लक्ष्मी, एक गोष्ट निश्चित आहे की कळत असो वा नकळत असो, ध्यास म्हणजे ध्यास! ध्यासाचे फळ हे निश्चितपणे मिळणारच आणि अगदी झालेही तसेच. कृष्णाच्या हातून मृत्यू आल्यानंतर कंस त्याच्या सर्व दुःख, भीती व काळजी यांच्यातून मुक्त तर झालाच, पण देहमुक्त झालेला कंसाचा आत्माही कृष्णाच्या ईश्वरी स्वरूपात विलीन झाला. अर्थात ही गोष्ट बाह्यांगाने पहाता व दाखवता येण्यासारखी नसल्यामुळे कोणाच्याही लक्षात येणे शक्यच नव्हते. ते फक्त कृष्णालाच जाणवले. कृष्णानेच ते ओळखले आणि मुख्य म्हणजे कृष्णाला त्याचे अजिबात नवल वाटले नाही.''

नारदाचे सांगणे संपत असतानाच लक्ष्मी मध्येच एकदम म्हणाली, ''हे नारदा, पण मला मात्र त्याचे नवलच वाटत आहे आणि नवलाईची गोष्ट घडल्यानंतर नवल हे वाटणारच ना! अरे, ज्या कंसाने कृष्णाचा द्वेष-मत्सर करण्यापलीकडे दुसरे काही केले नाही, कृष्णावरील रागाने जो कंस सतत जळफळत राहिला, एवढेच नव्हे, तर ज्या कंसाने वाटेल त्या मार्गाने कृष्णाचे जीवन संपवण्याचा प्रयत्न केला, त्या कंसाचा आत्मा त्याच्या मृत्यूनंतर जर कृष्णाच्या ईश्वरस्वरूपात विलीन झाला असेल, तर तो कहरच झाला असेच म्हणावे लागेल. अरे नारदा, दुष्कर्मी व दुष्प्रवृत्तीचे जन जर असे देहत्यागानंतर ईश्वरस्वरूपात विलीन होत असतील, तर ही केवळ नवलाईची गोष्ट नसून ती अत्यंत अयोग्य अशीच गोष्ट आहे, असे मला तरी अगदी खात्रीपूर्वक वाटते. अनेक ऋषिमुनींना आणि भगवत् भक्तांना अनेक वर्षे कष्टकारक तपश्चर्या केल्यावरती आणि मनाचे पुष्कळ क्लेश सहन करून ईश्वरप्राप्ती झाली आणि देहत्यागानंतर त्यांचा आत्मा व्यापक ईश्वरस्वरूपात विलीन झाला. असे असताना कंसासारखे नालायक व नतद्रष्ट लोक जर ईश्वरस्वरूपात असे अगदी सहजपणे विलीन होऊ लागले, तर मग साधना, तपश्चर्या व भक्तिमार्ग या गोष्टींना काहीच अर्थ नाही असेच होणार नाही का? पण एकीकडे तपस्या, भक्ती यांचे केवढे तरी माहात्म्य तर आहेच ना? मग याची सांगड कशी लागावी बरे? हे नारदा, माझी तर बुद्धीच चालेनाशी झालेली आहे आणि माझ्या मनालाही ती गोष्ट मानवत नाही. कंसासारख्या दुष्टाचा हा बहुमान कशासाठी? अरे, व्यापक ईश्वरस्वरूपात विलीन होणे ही गोष्ट काय एवढी साधी अन् स्वस्त आहे की काय? ''

लक्ष्मीच्या मनाला होणारा त्रास आणि तिला थोडासा का होईना पण आलेला राग, नारदाच्या पूर्णपणे लक्षात आला. पण नारदाला मात्र जराही राग न येता लक्ष्मीची थोडीशी गंमतच वाटली. परंतु लक्ष्मीला होणाऱ्या त्रासाचे मात्र नारदाला वाईटच वाटले आणि म्हणूनच लक्ष्मीची योग्य समज करून देण्याच्या हेतूने नारद लक्ष्मीला समजावून सांगू लागला.

''हे लक्ष्मी, तुला कंसाचा एवढा राग येणे साहजिकच आहे आणि ते योग्यही आहे. परंतु मी जे तुला आता सांगणार आहे ते नीट समजून घे. म्हणजे मग तुझ्या मनातील गोंधळ थांबून ते शांत होईल. तुला सर्वकाही स्पष्टपणे व स्वच्छपणे दिसू लागेल आणि मन पुन्हा उत्साही होऊन ते श्रवणानंद घेण्याच्या अवस्थेला येईल.

हे लक्ष्मी, प्रथम एक गोष्ट लक्षात ठेव, की ईश्वराच्या नियतीचा हा नियम आहे की 'जसा ज्याचा ध्यास, तसे त्याचे फळ'. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ईश्वराची नियती ही निरपेक्ष आहे. ती कोणाच्या बाजूने किंवा कोणाच्या विरुद्ध नाही. तेथे कोणत्याही प्रकारचा पक्षपात हा संभवतच नाही. म्हणूनच ईश्वराची नियती ही अत्यंत शुद्ध आहे आणि तेथे 'जसा ध्यास

तसे फळ' अगदी कोणालाही, म्हणजे सर्वांनाच मिळते. परंतु असा ध्यास लागणे ही काही साधी व सोपी गोष्ट नाही. केवळ एकाच गोष्टीच्या सततच्या विचाराने व निश्चयानेच असा ध्यास लागू शकतो. सामान्य मनुष्याला म्हणूनच असा ध्यास लागू शकत नाही. कारण त्याच्या मनातील विचार वारंवार बदलत असतात आणि त्याच्या बुद्धीचा निश्चय सारखा ढळत असतो. त्यामुळे प्रारब्धानुसार मिळणाऱ्या गोष्टींवरतीच त्याला समाधान मानत बसावे लागते. कोणताही ध्यास धरून ती गोष्ट प्राप्त करून घेण्याचा सामान्याचा आवाका व क्षमता असतच नाही. ध्यासाची अवस्था ही कठीण आहे हे खरेच आहे. परंतु ध्यासाचे फळ योग्य व आटोकाट प्रयत्नाने आणि दैवाची साथ असल्यास निश्चितपणे प्राप्त होते, हे मात्र सत्य आहे.

हे लक्ष्मी, ही ध्यासाची अवस्था असते मात्र अगदी विलक्षण! एखाद्या ध्यासाने एखादा युक्त झाला म्हणजे त्याला जागृती, स्वप्नी व ध्यानीमनी तीच व्यक्ती वा तीच गोष्ट सतत दिसत रहाते. त्याला त्याच्याशिवाय दुसरे काही सुचतच नाही. एवढेच नव्हे, तर ती गोष्ट वा ती व्यक्ती प्रत्यक्ष आपल्या जवळच आहे, असा भासही त्याला आत्यंतिक ध्यासामुळे होत असतो. त्यामुळे प्रत्यक्ष अनुभव न घेताही आपण तो अनुभव घेतच आहोत असे जाणवत रहाते. अर्थात् ध्यासामुळे झालेला भास हा खरा नसला, तरी मन मात्र तो काल्पनिक अनुभव घेत रहाते आणि त्याप्रमाणे मनाची स्थिती होऊन रहाते. प्रत्यक्ष काहीही प्रयत्न न करता, कशाचाही काल्पनिक अनुभव घेण्याची मनाची ही वृत्ती अद्भुत तर आहेच, पण ते मनाच्या सामर्थ्याचे द्योतक नसून, ते मनाच्या दुर्बलतेचेच लक्षण आहे. कारण प्रत्यक्ष ते प्रत्यक्षच आणि काल्पनिक ते काल्पनिकच. प्रत्यक्षाचा अनुभव घेण्यासाठी केवढ्यातरी प्रयत्नांची आवश्यकता असते आणि ते प्रयत्न सातत्याने करण्यासाठी मनाचे बळही तेवढेच मोठे असणे अत्यंत आवश्यक असते.

हे लक्ष्मी, कंसाचीही अवस्था नेमकी तशीच झाली होती. मृत्यूच्या भीतीमुळे नेहमी कृष्णाचेच विचार व कृष्णाचेच व्यवधान त्याच्या ठिकाणी असे. प्रत्यक्ष कृष्णाला न पहाताही कंसाच्या दृष्टीसमोर कृष्णाचे एक काल्पनिक रूप असे, ज्यामुळे कंस सदासर्वकाळ मनाच्या भयभीत अवस्थेतच असे. कृष्ण केव्हाही येईल आणि आपला वध करील या सततच्या भीतीमुळे का होईना, पण कंसाच्या ठिकाणी नित्य कृष्णाचाच ध्यास लागलेला असे. परंतु कंसाचे भाग्य असे होते, की त्याला ज्या कृष्णाचा ध्यास लागलेला होता तो कृष्ण तर प्रत्यक्ष ईश्वरस्वरूप होता. त्यामुळे कंसालाही त्याच्या नकळतच कृष्णरूपाद्वारे ईश्वराचाच ध्यास लागल्यासारखे झाले होते.

हे लक्ष्मी, कंसाने त्याच्या दरबारात प्रथमच कृष्णाला पाहिले. खरे तर, कृष्णाचे ते मनमोहक रूप पाहूनच कंसाच्या ठायीची दुष्प्रवृत्ती लयाला जायला पाहिजे होती. परंतु

प्रत्यक्षात मात्र तसे काही घडले नाही. कारण आधीच द्वेष व मत्सराने पूर्णपणे पछाडलेला कंस कृष्णाला प्रत्यक्ष पहाताच अत्यंत घाबराघुबरा झालेला होता. आपला मृत्यूच साक्षात आपल्यासमोर उभा ठाकलेला आहे असे वाटून कंस जिवाच्या आकांताने कृष्णावर चालून गेला आणि आपला मृत्यू कंसाने स्वतःच ओढवून घेतला. त्या वेळेस कंसाच्या ठिकाणी असलेला कृष्णाचा ध्यास एवढा पराकोटीला पोहोचलेला होता, की कंसाच्या देहातील आत्मा त्याच्या देहाला सोडल्यावर अगदी सहजपणे कृष्णाच्या आत्मस्वरूपात विलीन झाला. त्यामुळेच 'खरी मुक्तता कंसालाच मिळाली' असे म्हणणे अत्यंत योग्यच ठरते. वासना, विकार व अहंकार यांच्यात अडकलेला कंसाचा जीवात्मा, केवळ त्याने घेतलेल्या कृष्णाच्या जबरदस्त ध्यासामुळेच त्या बंधनातून मुक्त होऊन कृष्णस्वरूपात विलीन झाला. हे सामर्थ्य व हे माहात्म्य कृष्णाचेच आहे. कारण कृष्णाच्या अस्तित्वामुळेच कंसाला एवढा प्रचंड ध्यास आणि तोही एवढा प्रदीर्घ काळ लागू शकला हे तर खरेच आहे ना?

हे लक्ष्मी, आणखीन एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव, की आत्मा मूळात अगदी निर्विकार व अत्यंत शुद्ध असाच आहे. पण मानवी देहात आल्यावरतीच त्या आत्म्यावर विकारांची व विषयांची पुटे चढतात आणि अज्ञानाने व अहंकाराने ती पुटे अधिकच घट्ट होऊन रहातात. कंसासारख्या दुर्जनांच्या बाबतीत हा घट्टपणा एवढा पराकोटीला पोहोचलेला असतो, की त्यांच्या ठिकाणी फक्त दुष्प्रवृत्तींचेच वर्चस्व शिल्लक राहिलेले असते. पण कंसाने मृत्यूच्या भीतीने कृष्णाशी शत्रुत्वही एवढ्या पराकोटीचे धरले आणि तेही अगदी शेवटपर्यंत धरून ठेवले, की कंसाच्या अंतःकरणातही तळमळीमुळे कायमचीच आर्तता निर्माण झाली. एवढेच नव्हे, तर ती आर्तता सतत वाढत राहून अगदी पराकोटीला जाऊन पोहोचली होती. त्यामुळेच कंसाचा आत्मा त्याच्या मृत्यूने केवळ देहाच्याच बंधनातून सुटला असे नाही, तर सर्व विकारांच्या बंधनातूनही पूर्ण मुक्त झाला आणि त्याच्या मूळ शुद्ध स्वरूपाला पावला. त्यामुळे तो कंसाचा शुद्ध स्वरूपातील आत्मा, कृष्णस्वरूपात अगदी सहजपणे विलीन होऊ शकला.

हे लक्ष्मी, तुझी जी दुसरी शंका आहे, की मग ऋषी, मुनी व भगवत्‌भक्तांचे माहात्म्य आहे की नाही? आणि मग तपश्चर्या, साधना व भक्तिमार्ग यांचेही महत्त्व नाहीच की काय? तर असे असणे हे कदापिही शक्यच नाही. कारण भगवंताचे भक्त आणि त्यांनी अवलंबिलेला भक्तिमार्ग यांचे माहात्म्य अत्यंत थोर व या सृष्टीच्या इतिहासात अजरामर आहे. त्या भक्तिमार्गाचे व त्या भक्तांचे श्रेष्ठत्व हे वादातीत व अबाधित आहे. सगुण प्रेमातून निर्माण झालेला सगुण भक्तीचा हा मार्ग, अंतःकरणाला पूर्णपणे शुद्ध करून आनंदाचा अनुभव आणून देणारा आहे. एवढेच नव्हे, तर तो मार्ग प्रत्यक्ष भगवंतालाही अतिशय आनंदित करणारा आहे, हे त्या भक्तांचे व त्या भक्तिमार्गाचे वैशिष्ट्य आहे, जे अत्यंत आगळेवेगळे व म्हणूनच एकमेव असेच आहे. त्यामुळेच भक्तांच्या ठायीचा

भगवंताच्या सगुण रूपाचा ध्यास, हाही अतिशय वेगळा व आनंददायी आहे. कारण त्या ध्यासाचे मूळच भगवंताच्या रूपागुणावर जडलेल्या आत्यंतिक प्रेमामध्ये आहे.

हे प्रेम भगवंताच्या प्रत्यक्ष सहवासातून आणि प्रेमाच्या प्रत्यक्ष अनुभवातून निर्माण झालेले असते. या प्रेमाने मनाची पूर्ण शुद्धी झालेली असते. तेथे कोणत्याही वासनेचे वा विकाराचे मुळीच अस्तित्व नसते. त्या ठिकाणी सगुण प्रेमाच्या सत्यत्वाविषयी बुद्धीचा पूर्ण व कायमचा निश्चय झालेला असतो आणि चित्ताच्या ठिकाणी भगवंताच्या सगुण भेटीचाच एकीएक ध्यास लागून राहिलेला असतो. अशा तऱ्हेने मन, बुद्धी व चित्त सगुण प्रेमाच्या अनुभवाने व भगवंताच्या माहात्म्याने नित्य भरलेले असते. भक्ताच्या अंतःकरणाच्या अशा प्रेममय अवस्थेतील त्याला लागलेला भगवत्प्राप्तीचा ध्यास हाच सर्वश्रेष्ठ आहे आणि तो ध्यास लागलेला भक्तच भगवंताला अत्यंत प्रिय आहे. कारण अंतःकरणातील त्या ध्यासामध्ये प्रेमानुभवाची स्मृती, तृप्ती, आर्तता व भेटीत प्रेमानुभवाची पूर्तता हे सर्व एकत्रितपणे सामावलेले असते.

हे लक्ष्मी, मला वाटते आता तुझ्या निश्चितपणेच लक्षात आले असणार, की भक्ताला लागलेला भगवंताचा कायमचा प्रेमध्यास आणि इतरांना इतर काही कारणांमुळे लागलेला तात्पुरता ध्यास, यामध्ये केवढा तरी मुलभूतच फरक आहे. त्यात अगदी जमीन अस्मानाचेच अंतर आहे असेच म्हणावे लागेल. कंसाला मृत्यूच्या भीतीने लागलेला कृष्णाचा ध्यास हा त्याच्या मनाची सारखी तगमग करीत असे. 'कृष्ण' हा शब्द केवळ ऐकल्यानेच कंसाचा भीतीने थरकाप उडत असे. कृष्णाविषयीचे विचारही त्याच्या मनाची अस्वस्थता व तळमळ वाढवीत असत आणि त्याचे जगणेही कठीण करीत असत. अशा तऱ्हेने कंसाला लागलेल्या कृष्णाच्या ध्यासाने कंसाचे सर्व जीवनच अत्यंत दुःखदायी व क्लेशकारक होऊन राहिलेले होते.

पण लक्ष्मी, भक्तांच्या ठिकाणी असलेला भगवंताचा ध्यास हा मात्र अत्यंत आनंददायी असतो. तेथे कोणत्याही वासना वा विकार नसल्यामुळे, भक्त सुख व दुःखाचा अनुभव घेण्याच्या मनःस्थितीतच नसतात. भगवंताच्या प्रेमामुळे भगवंताच्या विरहाचेच दुःख व आर्तता भक्तांच्या ठिकाणी एवढी असते, की त्यांना संसारातील इतर दुःखे व अडचणी अजिबात जाणवतच नाहीत. त्याचप्रमाणे भगवंताच्या प्रेमानुभवाचेच आत्यंतिक सुख व तृप्ती भक्त एवढी अनुभवत असतात, की त्यांना त्या प्रेमसुखापुढे इतर कोणत्याही सुखाची मातब्बरी अशी मुळीच वाटत नाही. भगवत्प्रेमाने भरलेले भक्ताचे मन भगवंताच्या भक्तीचा आनंद सतत अनुभवीत असते. त्या आनंदाच्या अनुभवाने जगले जाणारे भक्ताचे जीवन हे अत्यंत शांती व समाधानाचे असते.

हे लक्ष्मी, तेव्हा एखाद्याच्या मृत्यूनंतर आत्म्याची काय स्थिती झाली किंवा त्याला काय गती मिळाली, यापेक्षा तो जिवंत असताना काय व कसे जीवन जगत होता हेच

अधिक महत्त्वाचे आहे. कारण जीवनाचा अनुभव हा प्रत्यक्ष आहे आणि मृत्यूनंतरची अवस्था ही प्रत्यक्ष अनुभवाच्या पलीकडची आहे. कंसासारखे दुष्प्रवृत्तीचे दुर्जन हे भीतीच्या ध्यासाने जीवनात क्षणाक्षणाला मरण पावत असतात, तर भगवंताचे भक्त प्रेमाच्या ध्यासाने क्षणाक्षणाला आनंदाच्या अनुभवाने जगत असतात आणि देहाच्या मृत्यूनंतरही अमर होऊन रहातात. कंसाला मुक्ती ही त्याच्या मृत्यूनंतरच मिळाली, तर भगवंताचे भक्त हे देहात, संसारात व या जगात असूनही त्यांच्या सर्व बंधनातून मुक्त झालेले असतात. कारण ते भगवत्प्रेमाने सदा सर्वकाळ युक्त असतात. त्यामुळेच ते भक्त भक्तीचा आनंद मुक्तपणे घेत असतात. कंसासारखी उदाहरणे ही अपवादात्मकच घडणारी असतात आणि ती अनुकरणीयही नसतात. परंतु भगवत्भक्तांचे इतिहास मात्र अगणित होऊन गेले आणि तेच सर्वांना आदर्श होऊन राहिलेले आहेत. त्या भक्तांचीच जीवने कृतार्थ होतात आणि तेच भक्त खऱ्या अर्थाने धन्यतेस पावतात.

हे लक्ष्मी, म्हणूनच भगवत्भक्तांचे व भक्तिमार्गाचे माहात्म्य व थोरवी ही सदासर्वकाळची आहे. त्यांचाच प्रेमध्यास खरा आणि त्यांचाच भक्तीचा आनंद खरा! त्यांचीच जीवने ही श्रेष्ठ आहेत आणि तीच सर्वांनाच नेहमीच आदर्श व अनुकरणीय आहेत. कंसाच्या कृष्णध्यासाची परिणती ही कंसाचा आत्मा कृष्णाच्या आत्मस्वरूपात विलीन होण्यात झाली, हे सांगताना मला जशी उत्कट ध्यासाची परिणती सांगायची होती तसेच व त्याहीपेक्षा कृष्णाच्या विशुद्ध, व्यापक व सर्वसमावेशक अशा अंतःकरणाचीच महती सांगायची होती. लक्ष्मी, हे तुझ्या आता निश्चितपणे लक्षात आले असेल, याची मला नक्की खात्री आहे. ''

नारदाच्या बोलण्याने झालेले समाधान लक्ष्मीच्या मुखावर दिसू लागलेच. किंचित हसून लक्ष्मी नारदाला म्हणाली, ''हे नारदा, तुझे म्हणणे अगदी बरोबर आहे, जसे ते नेहमीच असते. कृष्णाच्या प्रेमी भक्तांच्याठायी असलेला कृष्णाविषयीचा प्रेमाचा ध्यास आणि कृष्णाच्या शत्रुत्वातून व विरोधातून कंसाच्या ठिकाणी असलेला कृष्णाविषयीचा भीतीचा ध्यास, याच्यात मूलभूतच फरक आहे. अर्थात् 'जसे मूळ तसे फळ' या न्यायाने प्रेममूळाचे फळ भक्तिभाव व आनंदानुभव आहे, तर भीतीपोटी मनाला सतत कुरतडत राहणारी काळजी व कायमचे दुःख आहे. त्यामुळे दोन्ही ध्यासांची परिणती जरी एक असली किंवा तशी ती दिसली तरी त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाच्या स्थितीत मात्र दोन टोकांचे अंतर आहे. बरोबर आहे ना? परंतु कृष्णचरित्रातील प्रेमसूत्र हेच आनंददायी आहे आणि म्हणून तेच मुख्य आहे, हे तर खरेच आहे. तेव्हा हे नारदा, त्या प्रेमसूत्राच्या आधारानेच गुंफलेले कृष्णाचे पुढील चरित्र तू त्वरित सांग बघू. 'कृष्णाचे सख्यप्रेम कोणाला मिळाले, त्यातून कृष्णाच्या जवळ खऱ्या अर्थाने कोण आले आणि कृष्णाला कोण खरे सखे म्हणून

लाभले' हे सर्व श्रवण करण्यासाठी माझ्या मनाची अवस्था आता पूर्णपणे मोकळी झालेली आहे आणि त्यामुळे माझी श्रवणातुरता अतिशयच वाढून राहिलेली आहे. ''

***

लक्ष्मीच्या बोलण्याने मुदित झालेला नारद प्रसन्न मुखाने हसून लक्ष्मीशी बोलू लागला, ''हे लक्ष्मी, कंसवधानंतर जरी मथुरेतील दहशतीची व जुलमी राजवट संपली होती, तरी अजूनही तेथे सुखशांतीचे व नीतिनियमांचे राज्य सुरू व्हायचे होते. त्यासाठी मथुरेच्या राज्यसिंहासनावर तशा सत्शील व नीतिमान राजाची आवश्यकता होती. म्हणूनच हे जाणून कृष्णाने, वसुदेव व देवकी यांची कारागृहातून सुटका केल्यावर सर्वप्रथम जर कोणती गोष्ट केली असेल, तर ती म्हणजे कंसाने बंदीवासात टाकलेल्या त्याच्या मातामहाची म्हणजे उग्रसेनाची मुक्तता. कृष्ण स्वतः वसुदेवाला बरोबर घेऊन उग्रसेनाकडे गेला आणि त्याला सन्मानपूर्वक राजवाड्यात घेऊन आला. वृद्धापकाळात सर्व बाजूंनी निराश झालेल्या उग्रसेनाच्या जीवनात पुन्हा नवीन उमेद व उत्साह आला आणि आपल्या नातवाच्या म्हणजे कृष्णाच्या पराक्रमाचे त्याला अत्यंत कौतुक वाटले. कृष्णाच्या प्रेमाने उग्रसेनाचा ऊर भरून आला. त्याने कृष्णाला आपल्या मिठीत घेऊन त्याचे मुख प्रेमाने कुरवाळले आणि त्याचे मस्तक अत्यंत कौतुकाने थोपटले. पुढे कृष्णाने स्वतः पुढाकार घेऊन राजसभा आमंत्रित केली आणि सर्वांच्या समक्ष उग्रसेनाने मथुरेच्या राज्यकारभाराची सूत्रे पुन्हा आपल्या हातात घेतली. मथुरेमध्ये सर्वत्र विश्वासाचे व समाधानाचे वातावरण पसरले आणि सामान्य जनांचे सुरक्षित व सुरळीत जीवन पुन्हा सुरू झाले. या सर्व प्रसंगात कृष्णाने घेतलेला पुढाकार व त्याची संयोजकता हा मात्र सर्वांच्याच मुखी कौतुकाचा विषय झाला. एवढ्या लहान वयात कृष्णाच्याठायी असलेला समजूतदारपणा व विचारांची प्रगल्भता ही सर्वांच्याच दृष्टीने अर्थातच एक आश्चर्याचीच बाब होती.

हे लक्ष्मी, अशा तऱ्हेने वसुदेव-देवकी व कृष्ण-बलराम यांचे एकत्र जीवन सुरू झाले. वसुदेव व देवकी यांच्या ठिकाणचा एवढ्या प्रदीर्घ काळचा दाटून राहिलेला पुत्रांविषयीचा वात्सल्यभाव व स्नेहभाव, त्यांना आता मोकळेपणाने व मनमुराद अनुभवता येऊ लागला. देवकीला तर कृष्णासाठी काय व किती करू असेच झाले होते. अनेक प्रकारांनी अनेक गोष्टी करून देवकी सतत कृष्णाचे कोडकौतुक करीत असे. कृष्णासाठी नानाविध खाद्यपदार्थ करणे, कृष्णासाठी अनेक रंगाचे पोषाख शिवणे आणि कृष्णाला अनेक अलंकार, आभूषणांनी सजवणे याचा देवकीला एवढा छंद जडला होता, की ती सतत त्या निमित्ताने कृष्णाच्याच विचारात असे. कृष्ण तिला सतत तिच्या दृष्टिक्षेपातच हवा असे. थोडावेळ जरी कृष्ण देवकीच्या नजरेपासून दूर झाला तरी देवकी अत्यंत बेचैन होई आणि तिच्या जिवाची अगदी घालमेल होत असे. कृष्णाला पुन्हा पहाताच देवकीच्या जिवाला शांतता लाभत असे. त्या मानाने वसुदेवाला वेळच कमी मिळत असे. उग्रसेनाला

राज्यकारभारात सदैव मदत करीत असल्यामुळे वसुदेव सतत कार्यरत असे आणि अनेक गोष्टी करण्यात निमग्न असे. परंतु जेव्हा जेव्हा वेळ व सवड मिळत असे, तेव्हा तेव्हा देवकीच्या मुखातून कृष्णाच्या कौतुकाची दाट व गोड खीर सेवन करण्यातच वसुदेवाला धन्यता वाटत असे. वसुदेव व देवकी यांच्या जीवनात अशा तऱ्हेने कृष्णामुळे आलेले सुखासमाधानाचे व प्रेमशांतीचे दिवस, ते उभयता अगदी क्षणोक्षणी व पुरेपूर अनुभवीत होते.

हे लक्ष्मी, परंतु या सर्वांमध्ये कृष्णाची मनःस्थिती मात्र वेगळीच झालेली होती. वसुदेव व देवकी यांच्या प्रेमाचा व कौतुकाचा अनुभव कृष्णाला अत्यंत आनंदित करीत होता खरा, परंतु त्यामध्ये त्याचे मन काही पूर्णपणे रमत नव्हतेच. कृष्णाच्या मनात सर्वसामान्यांविषयीचा आपलेपणा व प्रेम सतत जागृत असल्यामुळे त्याला केवळ घरच्या घरी बसून रहाण्यात चैनच पडत नसे. कारण तो तर त्याचा स्वभावच नव्हता. त्यामुळे मथुरेमध्ये सर्वत्र फिरून सामान्यांशी जवळीक साधणे, त्यांची दुःखे व अडचणी जाणून घेणे, त्यांचे सांत्वन करून त्यांना सर्वतोपरीने मदत करणे, हेच कृष्णाला आवडत असे आणि तसेच त्याच्याकडून घडतही असे. कारण त्याच्यातच कृष्णाचे मन खऱ्या अर्थाने रमत असे. तोच कृष्णाचा सहज स्वभाव होता. कृष्णाच्या अशा वागण्यामुळे साहजिकच तो मथुरेत सर्वसामान्यांचाही आवडता होऊन राहिला होता. परंतु कृष्णाला मात्र त्या निमित्ताने मथुरेतील सर्व खरी परिस्थिती अगदी जवळून पहाता व अभ्यासता आली.

कृष्णाच्या लक्षात आले, की सामान्यांच्या मनात व म्हणूनच त्यांच्या संसारातही अशांती, भीती व दुःखच आहे. त्याला बाह्यांगाचे कारण जरी कंसाचा जुलमी व दडपशाहीचा राज्यकारभार हे होते, तरी खरे कारण सर्वांच्या ठिकाणी असलेली विषयसुखाची लोलुपता आणि त्यामुळे त्यांची ढासळलेली नीतिमत्ता हेच होते. त्यातील दुष्ट प्रवृत्तीच्या कंसाचे बाह्य कारण जरी आता नष्ट झालेले असले, तरी लोकांच्या मनातील अशुद्धता कायमच असल्यामुळे त्यांची जीवने प्रत्यक्षपणे शांती समाधानाची नव्हतीच. पुण्यकर्मांचाच लोप झालेला असल्यामुळे कोणाच्याही मनात आस्तिक्य भावाचीही जागृती राहिलेलीच नव्हती आणि सदाचरणाचाही विसर सर्वांना अगदी सहजपणे पडलेला होता.

हे लक्ष्मी, खरे तर सामान्यांची ही अधोगती काळाच्या गतीनुसारच घडत होती. कारण नियतीनुसार द्वापारयुगाचा शेवट जवळ जवळ येत होता आणि पुढे त्याहूनही खडतर काळाचे येणारे कलियुग दृष्टोत्पत्तीस येऊ लागले होते. अज्ञान, वासना व अहंकार यांचा जोर, जो पुढे कलियुगात अगदी शिगेला पोहोचणार होता, त्यांची सर्व चिन्हे प्रगटपणे दिसू लागली होती. परंतु हे सर्व जाणत असूनही मथुरेतील प्रत्यक्ष परिस्थिती पाहून मात्र

कृष्णाचे मन कळवळले. या सर्वांवर काहीतरी निश्चित उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे हे कृष्णाच्या लक्षात आले. त्यासाठी त्याने प्रत्यक्ष उग्रसेन राजाचीच भेट घेण्याचे ठरवले आणि त्याप्रमाणे कृष्ण लागलीच पिता वसुदेव याला बरोबर घेऊन उग्रसेन राजाच्या महालात गेला.

कृष्ण व वसुदेव यांचे असे अचानक येणे घडलेले पाहून उग्रसेन आधी चकित व मग आनंदित झाला. आपल्या पित्याचा हात धरून येत असलेल्या कृष्णाची प्रसन्न व सुस्मित मुद्रा पाहून उग्रसेनाला अतिशय हर्ष झाला आणि त्याचे मन अत्यंत प्रेमाने भरून आले. उग्रसेनाच्या पायांना स्पर्श करून त्याला अभिवादन करण्यासाठी वाकलेल्या कृष्णाला, उग्रसेनाने आपल्या दोन्ही हातांनी उचलून घेतले आणि प्रेमाने आपल्या मांडीवर बसवून घेतले. कृष्णाच्या मस्तकावर कौतुकाने हात फिरवून उग्रसेनाने कृष्णमुख प्रेमाने कुरवाळले आणि कृष्णाच्या दोन्ही गालांचे व भालाचे पटापट मुके घेतले. कृष्णही त्याच प्रेमाने उग्रसेनाच्या कुशीत शिरून त्याला बिलगून बसला. आजोबा व नातू यांच्या प्रेमाचा हा सोहळा बघून वसुदेव मात्र अत्यंत सुखावला आणि त्या दृश्याकडे अत्यंत कौतुकाच्या नजरेने पहातच राहिला.

उग्रसेनाच्या प्रेमाच्या व कौतुकाच्या वर्षावाने कृष्णही सुखावला खरा, परंतु तो लगेचच सावध झाला. कारण ज्या हेतूने कृष्ण उग्रसेनाला भेटावयास आला होता तो हेतू कृष्णाच्या ठिकाणी जागृत होता. कृष्णाने स्वतःला उग्रसेनापासून हळूच व अलगदपणे बाजूला केले आणि नम्रपणे उग्रसेनाशी बोलू लागला.

‘‘हे मातामह, तुमच्या या माझ्यावरील प्रेमाचा व लोभाचा मला खरेच अत्यंत आनंद होत आहे. लहानपणापासूनच काही कारणामुळे मी तुमच्यापासून दूर राहिलो होतो आणि त्यामुळे तुमच्या या प्रेमाला मुकलो होतो. परंतु परमेश्वराच्या इच्छेनुसार व माझ्या भाग्याने पुन्हा आपण सर्व एकत्र आलो आणि म्हणूनच मला तुमच्या या प्रेमाचा लाभ होत आहे. यात माझे कौतुक नसून तो तर तुमचाच मोठेपणा आहे. तुमचा नातू या नात्याने तुमचे माझ्यावरील प्रेम अत्यंत साहजिक व स्वाभाविक आहे. त्यामुळेच तुम्ही माझे नेहमी लाड व कौतुक करीत असता आणि त्याचे मला अत्यंत सुख होत असतेच. परंतु माझ्या मनाला खरे समाधान होत आहे ते एकाच गोष्टीमुळे, की तुमच्या आयुष्यात पुन्हा स्वास्थ्याचे व सुखाचे दिवस परत आले. त्या आधीचा कितीतरी काळ तुम्हाला जे दुःख व हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या ना, त्याची कोणाला कल्पनाही करता येणे शक्यच नाही.

परंतु नित्य फिरणाऱ्या या कालचक्रात परमेश्वरी कृपेने आपल्याला पुन्हा अनुकूलता प्राप्त झाली. दुष्ट व खलप्रवृत्तीच्या कंसाचे कायमचे निर्दालन झाले आणि आपल्यासारखा

सत्प्रवृत्तीचा, सज्जन शासनकर्ता पुन्हा या मथुरानगरीला लाभला. त्यामुळे सर्व मथुरावासीयांचेही नशीबी आलेले कर्मभोग संपले आणि त्यांच्याही सुख व शांतीच्या जीवनाला पुन्हा सुरुवात झाली यात अजिबात शंका नाही. हे मातामह, आता सर्व मथुराजन केवळ आपल्याकडेच आधारासाठी, रक्षणासाठी व मार्गदर्शनासाठी, एक आदर्श म्हणून पहात आहेत आणि त्याचे फळ त्यांना निश्चितपणे मिळेल याची मला पूर्ण खात्री आहे. ''

कृष्णाचे बोलणे आधी कौतुकाने ऐकत असलेला उग्रसेन हळूहळू मात्र गंभीर होत राहिला. कृष्णाचे बोलणे थांबले तरीही उग्रसेन बराच वेळ तसाच गंभीर व स्वस्थ बसून राहिला. क्षणभर तेथे शांतता पसरली. कोणीच काही बोलेना. कारण वसुदेवही तेवढाच गंभीर, पण अधिक भावनात्मक झाला होता. शेवटी या शांततेचा भंग उग्रसेनाकडूनच घडला आणि आपल्या धीर-गंभीर आवाजात तो एकेक शब्द बोलू लागला.

''अरे कृष्णा, तुझ्या बोलण्याने तू तर अगदी माझ्या काळजालाच हात घातलास. खरे तर, मी अनुभवलेले सर्व दुःख, क्लेश व सहन केलेल्या सर्व यातना माझ्या अंतःकरणात अगदी खोलवर जाऊन बसलेल्या आहेत. त्याची वाच्यता मी कधीच कोणाकडे करीत नाही. आपले कर्मभोग आपण भोगले. त्याची तक्रार किंवा व्यथा दुसऱ्याला सांगण्याचे काही कारण नाही आणि सांगूनही काही उपयोग नाही. कारण त्याविषयी बोलण्याने पुन्हा त्या सर्व दुःखाचे स्मरण होते आणि मन पुन्हा उदासीन व विषण्णच होते. कंसासारखा नीच व दुष्ट प्रवृत्तीचा पुत्र माझ्याच पोटी यावा, यापेक्षा अधिक दुर्भाग्य या जगात दुसऱ्या कोणाच्याही वाट्याला आलेले असणे शक्यच नाही.

पण कृष्णा, माझे भाग्यही असे की तुझ्यासारखा नातूही मला लाभावा आणि त्यानेच माझी सर्व दुःखातून व संकटातून मुक्तता करावी. आता त्या दुःखद प्रसंगांच्या केवळ अंधुक व अस्पष्ट अशा स्मृती मात्र माझ्या ठिकाणी असतात. परंतु त्यांच्या जखमा मात्र अजूनही माझ्या अंतरात खोलवर कोठेतरी मला व्यथित करीत असतातच. तरीही एक गोष्ट मात्र निश्चित आहे, की त्या व्यथांचा परिणाम मी माझ्या मनावर मुळीच होऊ देत नाही. माझे नित्याचे जीवनही अगदी सुरळीत चालू असते. एवढेच काय, राज्याचा कारभारही माझ्याकडून अगदी व्यवस्थित घडत असतो. त्यामध्ये कोठेही काही तक्रारीला जागा आहे असे मला तरी वाटत नाही. मुख्य म्हणजे हा वसुदेव, जो अत्यंत सज्जन व सत्प्रवृत्तीचा आहे, त्याचे मला केवढेतरी साहाय्य या राज्यकारभारात लाभत असते. सर्व दैनंदिन कारभार तोच पहात असतो आणि सर्व काही माझ्या संमतीने करीत असतो.

अरे कृष्णा, पण मगाशी बोलताना तू जो उल्लेख केलास की 'सर्व मथुराजन माझ्याकडे आधारासाठी व रक्षणासाठी पहात आहेत' तो तर योग्यच आहे व ते अत्यंत

साहजिकच आहे. सामान्यजनांची त्यांच्या राजाकडून असलेली ही अपेक्षा रास्तच आहे. परंतु तो आधार व ते रक्षण तर त्यांना मिळत आहेच ना! त्यात काहीही कमतरता नाही. त्यामध्ये कोणालाही काही तक्रारीला जागा नाही याची मला अगदी निश्चित खात्री आहे. मग तू त्याचा उल्लेख मुद्दामहून का बरे केलास? तुला त्यात काही कमतरता वा उणीव जाणवली का? कोणी तुझ्याकडे काही तक्रार केली का? कारण मला ठाऊक आहे की तू स्वतः मथुरा नगरीत मोकळेपणाने फिरत असतोस. सर्वांशी आपलेपणाने वागत व बोलत असतोस. या तुझ्या वागण्याचे मला अत्यंत कौतुकच वाटत असते. तेव्हा तुझ्या लक्षात अशा काही गोष्टी आलेल्या आहेत का, की ज्यामुळे तू तसा उल्लेख तुझ्या बोलण्यात मुद्दामहून केला होतास? तसे काही असेल तर सर्व काही मला अगदी स्पष्टपणे सांग. काहीही संकोच करू नकोस. मला तर आता असेच वाटायला लागले आहे, की असे काही तरी सांगण्यासाठीच तू मुद्दामहूनच माझ्या भेटीसाठी आला असावास. होय ना? तेव्हा कृष्णा, तुझ्या मनात जे काय आहे ते सर्व काही मोकळेपणाने सांग बघू. ''

उग्रसेनाच्या बोलण्यावर कृष्ण थोडावेळ स्वस्थच राहिला. त्याने एकदा वसुदेवाकडे पाहिले आणि तो बोलू लागला, ''हे मातामह, तुमचे बोलणे अगदी संयुक्तिकच आहे. तुम्ही राज्यावर बसल्यापासून सर्व जनतेला आधार व रक्षण अगदी सहजपणे व पुरेपूर मिळत आहे आणि त्याची सर्वांनाच जाणीव व खात्रीही आहे. आता कोणाच्याही मनात भीतीचा लवलेशही नाही. सर्वजण अगदी निर्भयपणे व मोकळेपणाने आपापले जीवन जगत आहेत. ही एक अत्यंत महत्त्वाचीच गोष्ट आहे यात शंकाच नाही. परंतु त्याचबरोबर हेही खरे आहे, की हा जीवनाचा एक भाग झाला. दुसरा महत्त्वाचा भाग अजूनही तसाच शिल्लक राहिलेला आहे आणि तो म्हणजे, सामान्य जनांची मने जी अत्यंत कमकुवत व दुर्बल झालेली होती, ती तशीच आहेत. याचे मुख्य कारण, सर्वांकडून काही पुण्यकर्म वा सत्कर्म घडायचेही पूर्णपणे थांबलेले आहे. कंसाच्या भीतीने ही सर्व कर्मे हळूहळू बंद पडत गेली, ती गेलीच आणि लोकांनाही आता त्याचीच सवय जडून राहिलेली आहे.

हे मातामह, आपण जाणूनच आहात, की सत्कर्मामुळेच मनात सद्भाव निर्माण होतो आणि सद्भाव हाच मनाचे बळ वाढवतो. सत्कर्मामुळेच आचाराची शुद्धी होऊन विचारही हळूहळू शुद्ध होऊ लागतात, हे तर खरेच आहे ना? तेव्हा मला असे निश्चितपणे वाटते की सर्व प्रजाजनांना पुन्हा सत्कर्माला प्रवृत्त करावयास हवे आणि त्यासाठी आपणच पुढाकार घेतला पाहिजे. आपणच अशी पुण्यकर्मे मोठ्या प्रमाणावर घडवून आणली पाहिजेत आणि त्यात सर्वांना सहभागही दिला पाहिजे. त्यामुळेच सामान्यांना पुण्यकर्मे करण्याची सवय पुन्हा लागेल आणि त्यांच्या ठिकाणचा सद्भाव जागा होईल. सर्वांची मने त्यामुळेच निर्मळ व सबळ होतील आणि सर्वांनाच मग मनाच्या शांती व समाधानाचा अनुभव येईल. हे मातामह, मी जे काही बोललो ते तर आपण सर्व जाणूनच आहात. मी

काही आपल्याला सांगावे अशी खरी म्हणजे काहीही जरूरी नाहीच. मी केवळ आपल्या निदर्शनास या गोष्ट आणून दिला आहेत इतकेच! ''

कृष्णाच्या बोलण्याने उग्रसेन प्रभावित झाला आणि त्याला कृष्णाचे अत्यंत कौतुकही वाटले. कृष्णाकडे पाहून मोकळेपणाने हसतच उग्रसेन म्हणाला, ''अरे कृष्णा, तुझी तर अगदी कमालच आहे. तुझ्या पराक्रमाची मला माहिती होतीच. परंतु तुझ्या बुद्धीमत्तेची चुणूक मात्र मला तुझ्या आत्ताच्या बोलण्यावरूनच कळली. खरेच, तुझे बोलणे हे अगदी प्रगल्भ व मुद्देसूद आहे. तुझी विचारसरणी अत्यंत स्पष्ट आहे. मुख्य म्हणजे तुझ्या ठिकाणी सामान्यांच्या स्वास्थ्याचा व हिताचा विचार आहे आणि मला याचेच विशेष अप्रूप वाटते. तुझे म्हणणेही अगदी बरोबरच आहे. प्रजाजनांना सत्कर्माला प्रवृत्त करून सन्मार्गाला लावण्याची जबाबदारी मुख्यत्वेकरून राजावरच आहे. कारण 'यथा राजा तथा प्रजा! 'आम्हा राजेलोकांकडूनच जेव्हा यज्ञयाग, दानधर्म, देव-देवतांची पूजाअर्चा व महोत्सव अशी कर्मे घडतील, तेव्हाच सामान्यजनही त्यामध्ये सामावले जातील आणि त्यांच्या ठिकाणी ईश्वराविषयी आस्तिकता व भाविकता निर्माण होऊन ती वाढत राहील. त्यातूनच मग त्या प्रजाजनांकडूनही हळूहळू सत्कर्मे घडायला सुरुवात होईल आणि ते सदाचाराला प्रवृत्त होतील. त्यामुळेच त्यांची मनेही सबळ होऊन त्यांना शांती व समाधान प्राप्त होईल हे अगदी खरे आहे.

अरे कृष्णा, आता वसुदेवाशी चर्चा करून त्याच्या अंमलबजावणीसही आम्ही सुरुवात करू. तू अगदी निश्चिंत रहा. परंतु कृष्णा, मला अजूनही एका गोष्टीचे राहून राहून नवल वाटत आहे की तुला एवढी समज व ज्ञान झाले कोठून? मला खात्री आहे, की तुझ्यावर ही त्या परमेश्वराचीच कृपा आहे. म्हणूनच एवढ्या लहान वयातही तुझ्याकडून केवढातरी पराक्रमही घडला. तुझ्या बुद्धीची वाढही अगदी वेगाने झालेली आहे. पण मला त्याचे जेवढे कौतुक वाटते तेवढीच तुझी काळजीही वाटते. कारण आता तू वयाने बारा वर्षांचा झाला आहेस आणि तुझ्या पुढील जीवनाविषयी विचार करून काहीतरी निर्णय घेण्याची हीच वेळ आलेली आहे.

अरे कृष्णा, तुझ्या ठिकाणी तर सर्वच गोष्टी आहेत. पराक्रम आहे, युद्धातही तू अत्यंत तरबेज आहेस. तुझ्याठायी अनेक कलागुणही आहेत. मुरलीवादनातही तू अगदी पारंगत आहेस. परंतु एक गोष्ट माझ्या लक्षात आलेली आहे, की या कशाचेही तुला शास्त्रशुद्ध ज्ञान नाही. तुला हे सर्व जरी उपजतच व निसर्गतःच लाभलेले असले, तरी या सर्वांतील गुरूगम्यज्ञान प्राप्त करून घेणे मात्र तुझ्यासाठी अती आवश्यक आहे. कारण कोठलेही शास्त्र वा कला यांचे ज्ञान गुरूशिवाय पूर्णपणे व यथार्थतेने प्राप्त होत नाही हेही खरेच आहे. तेव्हा मला वाटते, आता तू व बलराम या उभयतांनी विद्यार्जनासाठी गुरूगृही

जाणेच योग्य ठरेल. वसुदेवा, या संबंधी तुझे काय म्हणणे आहे? तूही तुझे विचार अगदी स्पष्टपणे व मोकळेपणाने प्रगट करावेस हे बरे! ''

उग्रसेनाच्या बोलण्यावर संमतीदर्शक मान डोलवीत वसुदेव म्हणाला, ''महाराज, आपला विचार अत्यंत योग्य असाच आहे. कृष्ण व बलराम यांच्या वयाच्या दृष्टीने पाहिले असता, त्यांनी आता योग्य अशा गुरूंकडूनच सर्व विद्या, शास्त्र व कला यांचे शास्त्रशुद्ध ज्ञान प्राप्त करून घेणे आवश्यकच आहे. कारण गुरूंकडून प्राप्त झालेल्या ज्ञानानेच व त्यांच्या कृपेनेच सर्व ज्ञानाला पूर्णत्व प्राप्त होत असते हे खरेच आहे. परंतु कृष्णाची आताची अवस्था आपण प्रत्यक्ष पाहिली असता 'कृष्ण सर्व विद्या, शास्त्र व कला यात पूर्णपणे पारंगत आहे' असेच आपल्या दृष्टीस येत आहे. त्याने आतापर्यंत केलेला अतुलनीय पराक्रम आणि त्याने आताच केलेले अत्यंत मुद्देसूद व यथार्थ बोलणे, हे त्याच्या परिपक्व अवस्थेचेच लक्षण नाही का? राज्यकारभार व सामान्यांचे हित यांची अगदी यथार्थ सांगड त्याच्या बोलण्यात किती सहजपणे होती. त्यातूनच कृष्णाच्या ठिकाणी असलेला सामान्यांच्या दुःखाविषयीचा कळवळा, त्यावरील उपाययोजना आणि मुख्य म्हणजे राज्यकारभाराच्या हेतूविषयी असलेली योग्य समज, हे सर्व अगदी स्पष्टपणे जाणवत होते. कृष्णाच्या ठिकाणी असलेली मनाची भावनात्मकता आणि बुद्धीची प्रगल्भता यांची योग्य सांगड ही खरेच कौतुकास्पद, पण अपवादात्मकही आहे. तेव्हा अशा कृष्णाला नेहमीच्या पारंपरिक पद्धतीने व केवळ आपल्या राजघराण्याच्या रितीनुसार म्हणून, गुरूंकडे विद्यार्जनासाठी पाठवणे खरेच आवश्यक आहे का? महाराज, असाही विचार माझ्या मनात येत आहे आणि तो विचार मी आपणासमोर मोकळेपणाने मांडत आहे. ''

*****

## गुरूभक्तीचे महत्त्व

वसुदेवाच्या बोलण्याने उग्रसेनही थोडासा विचारातच पडल्यासारखा झाला. वसुदेवाच्या बोलण्यातील मुद्दा उग्रसेनाच्या लक्षात आला होता आणि त्यातील तथ्यही त्याला जाणवत होते. परंतु तरीही त्याने ठरवलेली योजनाच त्याला अधिक योग्य वाटत होती. पण काय व कसे बोलावे याचा विचार करीत उग्रसेन स्वस्थच बसून राहिला. या स्तब्धतेचा भंग स्वतः कृष्णानेच केला. वसुदेवाकडे एक हास्याचा कटाक्ष टाकून कृष्ण थोडासा उग्रसेनाच्या जवळ आला आणि आपल्या प्रेमळ व धीरगंभीर वाणीने बोलू लागला.

‘‘हे मातामह, आपण आमच्याविषयीचा घेतलेला निर्णय अत्यंत योग्य व संयुक्तिकच आहे. पिता या नात्याने माझे तात, वसुदेव महाराज, हे माझे कौतुक करीत आहेत आणि ते त्यांच्या दृष्टीने बरोबरच आहे. परमेश्वरी कृपेने जन्मतःच व निसर्गतःच काही विद्या व कलागुण यांचे ज्ञान माझ्याठायी आहे हे अगदी खरेच आहे. माझ्याकडून घडलेले अनेक पराक्रम, माझ्याकडून घेतले गेलेले अनेक निर्णय, एवढेच काय, माझ्याकडून घडलेले मुरलीवादन, त्यातून प्रगटलेले संगीत या सर्व गोष्टी अगदी उत्स्फूर्तपणेच घडत असत. त्यातील कोणतीही गोष्ट मी ठरवून अशी कधी केलेलीच नाही. परंतु एक गोष्ट मात्र निश्चितपणे खरी आहे, की हे सर्व घडण्याचे मूळ कारण म्हणजे माझ्या अंतःकरणात असलेला सर्वांविषयीचा आपलेपणा व प्रेम आणि सज्जनांविषयी असलेला कमालीचा कळवळा व सहानुभूती! माझ्या अंतःकरणाचा हा स्थायीभावही उपजतच आहे आणि तशी जाणीव माझ्याठायी नित्य जागृत असते. सज्जन व प्रेमीजनांना आधार द्यावा, त्यांचे रक्षण करावे, त्यांना सुखवावे, त्यांना प्रेम द्यावे ही माझी अगदी सहजवृत्ती आहे. या वृत्तीमुळेच अनेकांच्या निमित्ताने अनेक गोष्टी माझ्याकडून अगदी सहजपणे घडत आल्या. याच माझ्या स्वभावाने मी आतापर्यंतचे गोकुळातील जीवन जगलो. माझ्याकडून घडलेला कंसाचा वध हासुद्धा माझ्या या भावातून व माझ्या या वृत्तीमुळेच झाला हे अगदी खरेच आहे.

हे मातामह, तरीही आपण म्हणता ते योग्यच आहे. कारण कुठल्याही ज्ञानाची वा कलागुणांची प्राप्ती ही गुरूंकडूनच पूर्णपणे व यथार्थपणे होत असते हे सत्यच आहे. त्यासाठी गुरूंचा प्रत्यक्ष सहवास व त्यांची सेवा घडणे अत्यंत आवश्यकच आहे. तेव्हा आपण आम्हाला गुरूगृही पाठवण्याची जी योजना केलेली आहे, ती अत्यंत योग्यच आहे. आपल्या या इच्छेचे पालन करणे हे तर आमचे कर्तव्यकर्मच आहे. कारण ते आमच्या हिताचे आहे आणि आमचे हित हे आपल्यापेक्षा अधिक कोण बरे जाणू शकणार आहे? ’’

कृष्णाच्या बोलण्याने उग्रसेनाला अत्यंत समाधान झाले. कृष्णाच्या बोलण्यातील तथ्य वसुदेवाच्याही लक्षात आले आणि त्यालाही कृष्णाचे कौतुक वाटून संतोष झाला.

उग्रसेनाने कृष्णाच्या मस्तकावर हाताने थोडेसे थोपटल्यासारखे केले आणि त्याने वसुदेवाकडे सहेतुक नजरेने पाहून स्मितहास्य केले. वसुदेवानेही हसून, आपली मान डोलवून दाद दिली आणि तो उग्रसेनाला उद्देशून बोलू लागला.

"महाराज, या कृष्णाने आपल्या वागण्या-बोलण्याने गोकुळवासीयांची मने कशी आकर्षून घेतली असतील आणि आपले 'कृष्ण' हे नाव कसे सार्थ ठरवले असेल, याची आता आपल्याला अगदी खात्री पटते आहे. एवढा पराक्रमी व गुणवान असूनही त्याच्या ठिकाणी जराही अहंकार नाही. त्याचे हे वेगळेपण खरेच विशेषच आहे. त्याने सांगितलेली गुरूंची थोरवी अत्यंत योग्य व सत्यच आहे. सर्व शास्त्र, विद्या व कला यांच्या ज्ञानाची फळप्राप्ती केवळ गुरूंच्या सहवासामुळे व सेवेमुळेच होऊ शकते. तेव्हा या दृष्टीने कृष्ण व बलराम यांच्या गुरूगृही जाण्याची व्यवस्था आपण आता लवकरात लवकरच करावयास हवी.

महाराज, कृष्ण व बलराम यांना योग्य अशा अधिकारी गुरूंकडे पाठवावयास हवे. परंतु त्यासाठी कोण योग्य व अधिकारी आहे हे ठरवण्याचा अधिकार आपलाही नाही. थोर पुरुषांची योग्यता जाणणे आपल्यासारख्या सामान्याला शक्यच नाही. तो अधिकार जाणणारासुद्धा त्याच अधिकाराचा व योग्यतेचा हवा. या दृष्टीने विचार करता मला आपले कुलगुरू महामुनी गर्ग ऋषी यांचीच आठवण होत आहे. मी स्वतः त्यांची भेट घेऊन त्यांना यासंबंधी विचारीन. त्यांच्याच मार्गदर्शनानुसार वागण्यात आपले हित आहे. कारण आपले खरे हित केवळ गर्ग मुनीच जाणतात."

वसुदेवाच्या बोलण्याला आपली संमती दर्शवून उग्रसेन म्हणाला, "हे वसुदेवा, तुझे म्हणणे अत्यंत योग्य असेच आहे. आपले कुलगुरू गर्ग मुनी यांच्या सांगण्यानुसार आपण वागणेच योग्य आहे. आपल्या सर्वांच्या हिताची काळजी फक्त गर्ग मुनींनाच आहे. तेव्हा आता तू जराही वेळ न घालवता त्वरित गर्ग मुनींची भेट घ्यावीस असे मला वाटते."

उग्रसेनाचे बोलणे संपताच वसुदेव लगेच आपल्या आसनावरून उठला आणि उग्रसेनाला प्रणिपात करून तो जाण्यास निघाला. कृष्णानेही उग्रसेनाच्या पायांना स्पर्श करून नमस्कार केला असता, उग्रसेनाने प्रेमाने कृष्णाला आपल्या जवळ घेऊन त्याचे मस्तक कुरवाळले आणि त्यांना हसून निरोप दिला. वसुदेवाने कृष्णाचा हात आपल्या हातात धरला आणि ते उभयता प्रसन्न मुद्रेने उग्रसेनाच्या महालाबाहेर पडले."

नारदाचे बोलणे लक्षपूर्वक ऐकताना लक्ष्मी अत्यंत विचारात पडलेली दिसत होती. नारदाचे बोलणे थोडेसे थांबल्यासारखे वाटताच ती संधी साधून लक्ष्मीने बोलावयास सुरुवात केली.

"हे नारदा, हे कृष्णचरित्र एकंदरीतच खरेच गहन आहे यात जराही शंकाच नाही. 'एवढ्या पराक्रमी, गुणवान व ज्ञानी असलेल्या कृष्णाला गुरूगृही जाण्याची आवश्यकताच नाही' हे वसुदेवाचे म्हणणे सकृत्दर्शनी अगदी बरोबरच वाटते. कृष्णाला गुरूंपासून आणखी असे काय मिळणार होते, की जे त्याच्यापाशी नव्हते? कृष्ण तर आत्मज्ञानी सुद्धा होता ना? मग, वसुदेवाचे म्हणणे अगदी संयुक्तिक असेच नव्हते का?

हे नारदा, मला कोणतीही तुलना करावयाची नाही. कारण तसे करणे अयोग्यच आहे. परंतु तरीही माझ्या ठिकाणी नारायणाच्या रामावतारातील अशाच प्रसंगाचे स्मरण पूर्णपणे जागृत आहे. त्या वेळी राम हा अज्ञानाने पूर्णपणे ग्रस्त झालेला होता आणि स्वतःची ओळखही पूर्णतः विसरलेला होता. स्वतःच्या अस्तित्वाविषयी आणि जीवनाच्या हेतूविषयी रामाठायी संभ्रमच निर्माण झालेला होता. त्यावेळी विश्वामित्र ऋषींनी स्वतःच पुढाकार घेऊन वसिष्ठ महर्षींना, रामाला आत्मज्ञान सांगण्याविषयीची विनंती केलेली होती. वसिष्ठ महर्षींनीही मग कृपावंत होऊन रामाला सर्वश्रेष्ठ असे आत्मस्वरूपाचे ज्ञान दिले होते. एवढेच नव्हे, तर रामाला त्याच्या अवतार कार्याचीही जाणीव करून दिली होती.

परंतु येथे नारायणाच्याच कृष्णचरित्रात मात्र अगदी वेगळेच चित्र दिसत आहे. कृष्णाकडून केवढे तरी कार्य आधीच घडून गेलेले आहे. कृष्णाठायी त्याच्या कार्याची जाणीव तर अगदी पहिल्यापासूनच दिसत होती. 'गोकुळातील गोवर्धन पर्वताचा प्रसंग, कालियामर्दनाचा प्रसंग, कंसाने पाठवलेल्या अनेक मायावी राक्षसांचा कृष्णाने केलेला वध अणि त्याहीपेक्षा मथुरेत आल्यावरती कृष्णाने लगेचच केलेला कंसवध' असे अनेक पराक्रम कृष्णाकडून अत्यंत सहजतेने व लीलया घडले. त्याहीपेक्षा अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, कृष्णाने गोकुळात सर्वांना करून दिलेली ईश्वराच्या अस्तित्वाची व स्वधर्माची जाणीव. त्यातही कृष्णमाहात्म्याचा कळस झाला, जेव्हा त्याने राधेच्या ठिकाणी ईश्वरी प्रेमभाव निर्माण केला, एवढेच नव्हे, तर राधेच्या भक्तिभावाचाही स्वीकार करून कृष्णाने तिच्यासाठी सर्वश्रेष्ठ असे ईश्वरी ज्ञान प्रगट केले आणि तिला त्याच्या अनुभवाची प्रचितीही आणून दिली.

हे नारदा, कृष्णाचे एवढे माहात्म्य प्रगट झाल्यानंतरही, त्या पार्श्वभूमीवर कृष्णाचे आता गुरूगृही जाणे अगदीच विरोधाभासाचे वाटत नाही का? सर्वात कमाल म्हणजे कृष्ण स्वतःच गुरूगृही जाण्याचे महत्त्व सांगून तसा आग्रहही धरत आहे. मला तरी या सर्वांची सांगड लावणे कठीणच जात आहे. अर्थात् तशी सांगड असणार हे निश्चितच! परंतु ती सांगड फक्त तुझ्याच अंतःकरणात आहे आणि केवळ तूच मला ती सांगड समजावून सांगू

शकतोस हेही खरेच आहे. तेव्हा कृपा करून तू हे सर्व मला नीट व सुसूत्रपणे समजावून सांग ना! ''

लक्ष्मीच्या बोलण्याने नारदाच्या मुखावर गंभीरतेचा भाव आल्याचे लक्ष्मीला स्पष्टपणे जाणवले. नारद अंतर्मुख झाल्याचेच ते लक्षण आहे हे लक्ष्मीने ओळखले आणि तीही काही न बोलता स्वस्थच राहिली. नारदाने क्षणभरच आपले नेत्र मिटून घेऊन पुन्हा उघडले आणि धीरगंभीर सुरात तो लक्ष्मीला उद्देशून बोलू लागला.

''हे लक्ष्मी, तुझा प्रश्न अगदी बरोबरच आहे. त्याचे उत्तर मी सांगितले तरी ते कळण्यासाठी तुला सर्व विषयच नीट समजावून घ्यावा लागेल. तेव्हा आता मी जे काही सांगत आहे ते नीट लक्षपूर्वक श्रवण कर. कारण हा विषय तसा कठीण नसला तरी थोडासा गहनच आहे. केवळ वरवरच्या श्रवणाने तो विषय आकलन होणे हे बुद्धीला जडच जाईल आणि मग त्याचा ताण तुझ्या मनालाही जाणवू लागेल. तेव्हा मोकळ्या मनाने व बुद्धीने सर्व ऐकून योग्य ती समज करून घे.

हे लक्ष्मी, मुळामध्ये नारायणाचे मानव देहाने अवतरणे हाच या सृष्टीतील एक अद्‌भूत चमत्कार आहे. त्यातूनही एकेक अवतारचरित्र हेही एकेक रहस्यच आहे. त्यातील राम व कृष्ण हे विशेष अवतार होते. कारण त्या दोन्ही अवतारांत पूर्ण चरित्रे प्रगट झाली. परंतु ती दोन्ही चरित्रे वेगवेगळ्या काळात व वेगवेगळ्या परिस्थितीत प्रगट झाली. त्या चरित्रातील कार्यही त्या त्या वेळच्या आवश्यकतेनुसार घडले हे लक्षात ठेव. त्यामुळे रामचरित्र व कृष्णचरित्र यांची तुलना करणेच मुळात योग्य ठरणार नाही. परंतु त्यातील मर्म व सत्य जाणून घेण्यासाठी मात्र त्या दोन्ही चरित्रांचा वेगळेपणाने विचार व अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे.

रामावतारात रामाठायी जन्मतःच स्वतःच्या स्वरूपाविषयी पूर्ण अज्ञान होते. परंतु वसिष्ठ ऋषी दशरथाचे राजगुरू असल्यामुळे, प्रभू रामाला वसिष्ठ ऋषींचा सहवास व मार्गदर्शन सहजपणे लाभत असे. कारणपरत्वे रामाकडून वसिष्ठ ऋषींची सेवाही घडत असे. त्यामुळे रामाठायी गुरूविषयीचा सेवाभाव व नम्रभाव निर्माण झालेला होता. परंतु वसिष्ठ ऋषींचे यथार्थ माहात्म्य जाणत नसल्यामुळे राम वसिष्ठ ऋषींच्या आत्मस्वरूप अनुभवाविषयी अनभिज्ञच राहिला. पुढे विश्वामित्र ऋषींच्या सांगण्यानुसार राम वसिष्ठ ऋषींना अनन्यभावाने शरण गेला. तेव्हा त्याला वसिष्ठ ऋषींनी कृपावंत व दयावंत होऊन सर्वश्रेष्ठ असे आत्मज्ञान दिले. त्या आत्मज्ञानाच्या निश्चयाने व ध्यासाने रामाला त्याच्याठायी आत्मस्वरूपाचा अनुभव आला आणि ती जाणीव रामाच्या ठिकाणी नित्य स्फुरत राहिली. पुढे त्याच्या चरित्रात अधर्माचा नाश व सद्‌धर्माला संजीवन देणारे केवढे तरी पराक्रमाचे कार्य घडले. पण वसिष्ठ ऋषींना दिलेल्या अनन्य शरणागतीने व

सेवाभावाने आलेले निरहंकारीत्व रामाठायी त्याच्या सर्वच जीवनचरित्रातही कायमच राहिलेले होते. त्यामुळे 'कार्यरूप होऊनही निरहंकारीत्व' हे जे मानवी देहातील आत्मस्वरूपाच्या अनुभवाचे रहस्य आहे, त्याची पूर्ण प्रचिती रामचरित्राद्वारे प्रगट झाली.

हे लक्ष्मी, कृष्णावताराच्या वेळची परिस्थिती ही वेगळी व आणखीनच गंभीर होती. सद्‌धर्माचा ऱ्हास व अधर्माची वाढ झपाट्याने झालेली होती. कृष्णाकडून अगदी बालवयातच केवढा तरी पराक्रम प्रगट होऊन अनेक राक्षसांचा वध झाला. एवढेच नव्हे, तर सर्वांच्या ठिकाणी प्रेमाने सद्‌भाव व सद्‌वृत्ती निर्माण करण्याचेही कार्य कृष्णाकडून अगदी सहजपणे घडत राहिले. 'कृष्ण वयाने मोठा झाल्यावर सद्‌गुरूंना शरण जाऊन त्यांच्याकडून आत्मज्ञान प्राप्त करून घेईल आणि मग त्याच्याकडून कार्य घडावयास सुरुवात होईल' अशी वाट पहाण्याजोगासुद्धा वेळ राहिलेला नव्हता. त्या वेळच्या परिस्थितीनुसार तेवढा काळ हाही काळाचा अपव्ययच ठरला असता. त्यामुळेच या नारायणाच्याठायी स्फुरलेल्या सहज संकल्पानुसार, कृष्णावतारात कृष्णाठायी त्याच्या आत्मस्वरूपाची व त्याच्या कार्याचीही जाणीव अगदी बालवयातच स्फुरून आली. त्याचे कारण कृष्णालाही कळत नसे. पण स्वतःच्या अंतःकरणातील स्फुरणाऱ्या त्या प्रेरणेला प्रमाण मानून कृष्णाकडून कार्य घडत राहिले. त्यावेळच्या परिस्थितीची तीच जरूरी होती आणि काळाची तीच मागणी होती. कृष्णचरित्राने त्याची पूर्ती होत राहिली.

हे लक्ष्मी, कृष्णाकडून लहान वयातच केवढे तरी कार्य घडले हे खरेच होते. पण कृष्णाचे कार्य परिस्थितीनुसार फक्त गोकुळापुरतेच मर्यादित राहिले हेही खरेच होते. त्यानंतर मथुरेला आल्यावरती केवढेतरी कार्य कृष्णाकडून घडावयाचे होते. कंसाचा वध केल्यानंतर अजूनही कितीतरी अधर्मीयांचे निर्दालन करून, सज्जनांना रक्षण व आधार द्यायचा होता. एवढेच नव्हे, तर त्या सज्जनांना ईश्वरप्राप्तीचा मार्ग दाखवून त्या मार्गाने जाण्यासाठी प्रवृत्त करावयाचे होते. एवढे कार्य घडूनही निरहंकारीत्व अनुभवायचे, तर सद्‌गुरूंना अनन्य शरणागती देणे व त्यांची सेवा घडणे हे अत्यावश्यकच होते आणि मुख्य म्हणजे त्याचे महत्त्व स्वतः कृष्णालाही ठाऊक होते. सद्‌गुरूकृपेशिवाय मानवी देहातील आत्मस्वरूपाच्या अनुभवाची पूर्ती नाही आणि सद्‌गुरूभक्तीशिवाय सद्‌गुरूकृपा नाही, हे त्रिकालाबाधित सत्य कृष्णही पूर्णपणे जाणून होता. त्यामुळेच कृष्णाने गुरूगृही जाण्याला लागलीच आनंदाने संमती दिली. कारण जरी उग्रसेन हा केवळ त्यावेळच्या राजघराण्याच्या रीतिरिवाजानुसार कृष्णाला गुरूगृही पाठविण्याची सूचना करीत होता, तरी त्यामुळे गुरूगृही जाण्याची संधी मात्र कृष्णाला मिळणार होती. कृष्णाच्या दृष्टीने सर्व विद्या व कला यांचे शिक्षण हे केवळ निमित्त होते. पण त्या निमित्ताने कृष्णाला गुरूंचा सहवास व सेवा करावयाची सुसंधी मिळाली असती आणि कृष्णाच्या दृष्टीने तीच गोष्ट अत्यंत महत्त्वाची व मोलाची होती.

हे लक्ष्मी, एखादे वेळेस निरहंकारीत्व या शब्दाने तुला थोडेसे गोंधळल्यासारखे होईल. कृष्ण तर सर्वांशीच व नेहमीच अत्यंत आदराने व नम्रतेने वागत असे. त्याच्या वागण्याबोलण्यात कधीच 'मी'पणा दिसला नाही. मग त्याच्या ठिकाणी अहंकार असणे कसे शक्य आहे? आणि अहंकारच नाही तर मग निरहंकारीत्व असण्याचा प्रश्नच कुठे निर्माण होतो? असेही तुझ्या मनात अगदी नक्कीच येईल. परंतु येथे अहंकार हा उल्लेख सर्वसामान्यांच्या ठिकाणी असलेल्या त्यांच्या जीवभावाविषयी, म्हणजे त्यांच्या अज्ञान व विकार यांनी युक्त अशा अवस्थेविषयीचा म्हणून केलेला नाही.

लक्ष्मी, अवतारचरित्रातही विशिष्ट वेळी व विशिष्ट कारणाने विशिष्ट कार्य घडतानाही अवतारी पुरुषांच्या ठिकाणी कर्तृत्वाचा अहंकार तेवढा वेळ जागृत होतोच. अर्थात् कार्याच्या पूर्तीबरोबरच तो अहंकारही तात्काळ व ठायीच्या ठायीच विलीनही पावतो. परंतु जेवढा वेळ अहंकार असतो तेवढा वेळ तो वेगळेपणाने असतोच. तसा कर्तृत्वाचा अहंकार जागा झाल्याशिवाय अवतारी पुरुषांकडूनही कार्य घडूच शकणार नाही. कारण तो अहंकार हीच मानवी देहातील कार्यशक्ती आहे आणि त्यामुळेच कार्य घडू शकते. आता 'कार्य घडते' म्हणजे तरी काय? तर कार्य केल्यानेच घडते आणि कार्य करायचे म्हणजे कर्तृत्व आलेच आणि कर्तृत्व म्हटले की अहंकारही आलाच.

सर्वसामान्य जीवांच्याठिकाणी अज्ञानामुळे निर्माण झालेला अहंकार हा त्या जीवांचा शत्रू असतो. कारण तो अहंकारच सर्व जीवांना त्यांच्याठिकाणी असलेल्या ईश्वराच्या अनुभवापासून दूर ठेवतो आणि त्या अज्ञानी जीवांवर स्वतःची सत्ता गाजवतो. त्यामुळेच सामान्य जीवांना ईश्वराच्या अस्तित्वाचा व सत्तेचा विसर पडतो आणि त्या जीवांना अनन्वित दुःख, क्लेश व यातना यांचा अनुभव घ्यावा लागतो. अवतारी पुरुषांच्या ठिकाणी त्यांच्या ईश्वरस्वरूपाची जाणीव असल्यामुळे, त्यांच्याठायी कार्यसाठी निर्माण होणारा 'मी'पणाचा अहंकार हा त्यांना आवश्यकच असतो. त्यांच्याठायीची कार्यशक्ती कार्यान्वित करण्यासाठी हा अहंकार त्यांना साहाय्यभूतच होतो आणि म्हणूनच त्यांच्याकडून कार्य घडून अनेक जीवांचे कल्याण घडू शकते. तरीही एक गोष्ट मात्र खरीच आहे, की हा निर्माण झालेला अहंकार तेवढा वेळा का होईना, पण सूर्यावर आलेल्या मळभाप्रमाणे आत्मस्वरूपाला बाह्यांगाने झाकोळतोच. परंतु अंतरातील आत्मस्वरूपाची जाणीव व तेज कायमच असल्यामुळे आत्मस्वरूपाचा अनुभव लागलीच जागृत होतो आणि पुन्हा सर्व अंतःकरणाला व्यापून रहातो.

हे लक्ष्मी, कर्तृत्वासाठी अहंकार आवश्यक आहे व कर्तृत्वातूनच अहंकार निर्माण होतो हे जरी खरे असले, तरी कर्तृत्वाचे फळ जेव्हा ईश्वराला समर्पण केले जाते तेव्हाच त्या अहंकाराची बाधकता नाहीशी होते आणि तो अहंकार शत्रू म्हणून न रहाता जणू

मित्रच होऊन रहातो. हा समर्पणाचा भाव भक्तिभावातून निर्माण होतो. अशी भक्ती ही ईश्वरस्वरूपाचा अनुभव घेणाऱ्या महात्म्यांच्या चरणी राहून, त्यांच्या सहवासाने व सेवेनेच घडू शकते. त्यासाठीच त्या महात्म्यांना अनन्यभावाने शरण जाणे आवश्यक असते. कारण शरण्यभावाने चरणी राहिलेल्यांच्याच भावाचा स्वीकार ते महात्मे कृपावंत होऊन करतात. त्या महात्म्यांच्या प्रत्यक्ष घडलेल्या भक्तीमुळेच सर्व जीवनच समर्पण भावाने जगले जाते. ते जीवन अत्यंत कर्तृत्वाचे असूनही निरहंकारी असते आणि म्हणूनच खऱ्या आनंदाचेही होऊन रहाते.

हे लक्ष्मी, मगाशी तू म्हटल्याप्रमाणे रामावतारात राम हा वसिष्ठ ऋषींना अनन्यभावाने शरण गेला होता. सद्गुरूंच्या कृपेने आत्मज्ञान प्राप्त झाल्यावरतीच रामाकडून केवढे तरी कर्तृत्व प्रगट झाले आणि अवतारकार्य घडले. परंतु रामाच्या अंतःकरणात वसिष्ठ ऋषींची प्रेमळ व तेजस्वी अशी मूर्तीही कायमची स्थापित झालेली होती. त्यामुळे केवढा तरी पराक्रम व कर्तृत्व रामाकडून प्रगट होत असताना, त्याच वेळी रामाकडून सर्व फळ मात्र त्याच्या सद्गुरूंच्या म्हणजे वसिष्ठ ऋषींच्या चरणी अगदी सहजपणे अर्पण करणे घडत होते. त्यामुळेच कर्तृत्वाचा अहंकार जराही शिल्लक न रहाता, राम त्याच्या आत्मस्वरूपाचा आनंददायी अनुभव पूर्णपणे घेत होता.

हे लक्ष्मी, नेमकी हीच गोष्ट कृष्णाच्या बाबतीत घडायची राहिली होती आणि मुख्य म्हणजे त्याची जाणीव व आवश्यकता स्वतः कृष्णाच्याठायीच होती. यात काहीही नवल नसून तेच कृष्णाचे माहात्म्य होते आणि तेच कृष्णाच्या अवतारचरित्राचे वेगळेपण व विशेषत्व होते. कृष्णाठायी अगदी लहानपणीच आत्मस्वरूपाची जाणीव सहजपणे स्फुरल्यामुळे त्याच्याकडून केवढेतरी लोकरक्षणाचे, लोकोद्धाराचे व लोककल्याणाचे कार्य घडले. परंतु कृष्णाच्या स्वतःच्या दृष्टीने त्याच्या आत्मस्वरूपाचा आनंददायी अनुभव मानवी देहात पूर्णपणे घेण्यासाठी, सद्गुरूसेवा व सद्गुरूभक्ती घडणे हे शिल्लक राहिलेच होते. तीच संधी व वेळ कृष्णाच्या जीवनात आता येऊन ठेपलेली होती आणि ती अनुभवण्यासाठी कृष्ण हा स्वतःच अत्यंत आतुर झालेला होता. ''

बराच वेळ चाललेले नारदाचे बोलणे लक्ष्मी अत्यंत लक्षपूर्वक ऐकत होती. कापूस पिंजून पिंजून काढल्याप्रमाणे नारदाने सर्वांगाने केलेले विश्लेषण व कारणमीमांसा ऐकता ऐकता लक्ष्मीचे मन चकित, तर बुद्धी थक्कीत झाली होती. परंतु त्याचबरोबर तिच्या मनाला व बुद्धीलाही एका आगळ्याच सुखाचा अनुभवही जाणवत होता. कारण नारदाच्या सांगण्यातील भाव तिच्या मनाला कळत होता आणि त्यातील गुज तिच्या बुद्धीला आकलनही होत होते. त्याचाच परिणाम म्हणजे लक्ष्मीच्याठायी नारायणाच्या माहात्म्याची अधिकच जाणीव निर्माण झाली आणि नारदाविषयीचा तिचा प्रेमादरही अधिकच वाढला. अंतःकरणाच्या त्याच अवस्थेतून लक्ष्मी नारदाला उद्देशून बोलू लागली.

''हे नारदा, तुझ्याकडून प्रगटलेले या नारायणाच्या अवतारचरित्राचे रहस्य तर केवळ अद्‌भूतच आहे असेच म्हणावे लागेल. त्यातून एक गोष्ट माझ्या निश्चितपणे लक्षात आलेली आहे, की नारायणाचे मानवी देहाने प्रगटणे हे केवळ इतरांच्या उद्धारासाठी व कल्याणासाठीच नसते, तर 'मानवी देहाद्वारे स्वतः स्वतःचा अनुभव घेणे' ही नारायणाची लीलासुद्धा त्या अवतारचरित्रामध्ये घडत असते. 'तेच तर त्या चरित्रांचे मूळ असते आणि त्याच्या बळावरच त्या जीवनचरित्रांमध्ये अनेकांचा उद्धार व कल्याण होत असते' हे तू प्रगट केलेले गुज मला कळले याचाच मला केवढातरी आनंद होत आहे. अवतारी पुरुषांच्या अंतःकरणातील त्यांच्या कार्याचे मूळ हे त्यांच्याकडून घडलेल्या सद्‌गुरूभक्तीचे फळ असते, हे तुझे सांगणेसुद्धा तुझ्या स्वानुभवातूनच आहे हे तर अगदी निश्चितच आहे.

हे नारदा, तुझ्याकडूनही या नारायणाच्या प्रेरणेने त्याचेच केवढेतरी कार्य त्याच्या सृष्टीमध्ये घडत असते. तिन्ही लोकांत नित्य संचार करून तू नारायणाच्या माहात्म्याचे गुणगायन करीत असतोस आणि सर्वांसाठी नारायणाच्या सगुण प्रेमभक्तीचे महत्त्व प्रगट करीत असतोस. या त्रिगुणात्मक सृष्टीमध्ये तुलाही सर्व तऱ्हेचे बरे वाईट अनुभव येतच असणार. परंतु तू मात्र कशाचाही हर्ष वा खेद न करता, सर्व काही नारायणालाच अर्पण करीत असतोस. नारदा, तुझ्या अंतःकरणात या नारायणाची मूर्ती कायमची स्थापित झालेली आहे. त्यामुळेच तुझ्याकडून सर्व कर्मफळे या नारायणालाच अगदी सहजपणे समर्पित होतात आणि तू मात्र नारायणाच्या भक्तिफळाचा आनंद नित्य अनुभवीत असतोस. पण त्यासाठी व त्याआधी तुझ्याकडून या नारायणाची केवढी तरी सेवा व भक्ती प्रत्यक्षपणे घडलेली आहे आणि नित्यपणे घडतही असते. म्हणूनच जाणीवपूर्वक कार्य करूनही भक्तिभावाचे निरहंकारीत्व कसे असते, याचे स्वानुभवाचे वर्णन तुझ्याकडून अत्यंत यथार्थपणे घडले.

हे नारदा, तुझी ही अवस्था प्रत्यक्ष माझ्या दृष्टीसमोर असल्यामुळेच मी त्या दृष्टीने तू वर्णन करून सांगत असलेल्या कृष्णचरित्राकडे पहाते आणि त्यामुळेच त्या चरित्रातील तू प्रगट करीत असलेले गुज मला आकलन होते. नाहीतर, तू सांगत असलेला हा विषय खरेच गहन आहे. मन व बुद्धी यांच्याही पलिकडे असलेल्या अवस्थेचे शब्दांकन करणे खरे तर कठीणच आहे. तरीही तू माझ्यावरील प्रेमाने त्या अवस्थेचे वर्णन करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करीत आहेस हे मलाही ठाऊक आहे. त्याबद्दल मी तुझी अत्यंत ऋणी आहे. ''

लक्ष्मीच्या बोलण्याने प्रसन्न झालेला नारद लक्ष्मीला उद्देशून म्हणाला, ''हे लक्ष्मी, तुझे म्हणणे अगदी खरे आहे. शब्दातीत अनुभवाच्या अवस्थेचे वर्णन करीत असताना शब्द हे कमीच पडत असतात. योग्य शब्दयोजना करताना काही वेळा शब्द पुढे मागेही होतात किंवा शब्दांची थोडीशी मोडतोडही होते. त्या अवस्थेचे क्रमवार किंवा तपशीलवार वर्णन

करणेही अशक्य होऊन रहाते. पण या सर्व मर्यादांची व कमतरतेची जाणीव असूनही अंतःकरणाच्या भावपूर्णतेमुळे शब्दांचे साहाय्य घेणे आवश्यकच ठरते. पण तरीही लक्ष्मी, या शब्दांच्या मर्यादेत किंवा तपशीलात अडकून न रहाता तू माझ्या सांगण्यातील नेमका गाभा पकडलास, याचेच मला अत्यंत कौतुक वाटत आहे. मुख्य मुद्दा तुझ्या लक्षात आला की 'सद्गुरूंना शरणागती व त्यांचीच भक्ती या शिवाय निरहंकारीत्व येत नाही आणि निरहंकारीत्वाशिवाय मानवी देहातील आत्मस्वरूपाच्या अनुभवाची परिपूर्णता नाही. या परिपूर्ण अवस्थेतच स्वानंदाचा अनुभव आहे. 'या दृष्टीनेच पहाताना लक्षात येते, की एवढे कार्य घडूनही कृष्णाला सद्गुरूसेवा व सद्गुरूभक्ती यांच्यावाचून त्याच्या जीवनात अपुरेपणा जाणवत होता आणि म्हणूनच कृष्णाला गुरूगृही जाऊन रहाणे अत्यावश्यक वाटत होते. ''

नारदाच्या बोलण्यावर लक्ष्मी हसून म्हणाली, ''हे नारदा, या विषयातील गुज जेवढे म्हणून विशद करून व समजावून सांगणे तुला शक्य होते, तेवढे तू सांगितले आहेस आणि ते जेवढे म्हणून माझ्या अल्पबुद्धीला कळणे शक्य होते तेवढे मला कळलेही आहे. आता या विषयावर कितीही निरपेक्षपणे बोलले किंवा त्यावर कितीही वेळ केवळ तात्त्विक चर्चा केली, तरी ती कमीच आहे आणि अनावश्यकही आहे. कृष्णचरित्रात घडलेल्या प्रत्यक्ष प्रसंगाचेच वर्णन करणे व ऐकणे आता आपल्या दोघांसाठीही आवश्यक आहे. कारण त्या सगुणकथेच्या द्वारेच तुझ्या अंतरातील भाव पूर्ण मोकळे होतील आणि मलाही तू सांगत असलेले तुझ्या अनुभवाचे गुज त्याच माध्यमातून यथार्थपणे जाणता येईल. सगुणचरित्रांचे हेच तर माहात्म्य व महत्त्व आहे ना! तेव्हा कृष्णचरित्रातील प्रत्यक्ष प्रसंगच तू मला वर्णन करून सांग ना!

'मार्गदर्शन घेण्यासाठी वसुदेव गर्ग मुनींकडे जाणार होता' असेच काही तरी तू सांगत होतास. ते अत्यंत साहजिकच आहे म्हणा. कारण गर्ग मुनी हे यादवकुळाचे कुलगुरू होते. त्यामुळे वसुदेव त्यांच्याचकडे जाणार हेही सहजच आहे. पण नारदा, ते सर्व मला तू सविस्तरपणे सांग. तुझ्या रसाळ वाणीने प्रगटणारे ते सारे वर्णन ऐकण्याची माझी आतुरता फारच वाढून राहिली आहे. आधीच या नारायणाच्या प्रेमाने तुडुंब भरून नित्य वहाणारे तुझे अंतःकरण हे मूळ कारण आणि त्यातून प्रेमरसाने पूर्णपणे भरलेल्या अशा कृष्णचरित्रातील कथांचे निमित्त कारण! मग काय, प्रेमाची नुसती मेजवानीच होणार आणि अवीट गोडीच्या प्रेमरसाचे मनसोक्त सेवन करायला मिळणार यात नवल ते काय! ''

***

लक्ष्मीच्या बोलण्यावर नारद अगदी मोकळेपणाने हसला आणि त्याचे मुखकमल आरक्तवर्णाने युक्त झाले. क्षणभर थांबून नारदाने आपल्या रसवंती वाणीला पूर्णपणे मोकळे केले.

''हे लक्ष्मी, गर्ग मुनी हे यादवकुळाचे कुलगुरू होते हे खरेच आहे. म्हणूनच कृष्णजन्म झाल्यावरती स्वतः गोकुळात जाऊन त्यांनी कृष्णाचे नामकरण केले होते हे तुझ्या लक्षात असेलच. त्यामुळे साहजिकच वसुदेव गर्ग मुनींकडेच गेला. प्रथम वसुदेवाने गर्ग मुनींना साष्टांग प्रणिपात केला आणि त्यांच्या सन्मुख हात जोडून उभा राहिला. समोर उभ्या असलेल्या वसुदेवाकडे गर्ग मुनींनी प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले असता वसुदेवाने नम्रतापूर्वक बोलावयास सुरुवात केली.

''हे मुनिवर्य, आमचे भाग्य अत्यंत थोर म्हणूनच आम्हाला आपल्यासारख्या महात्म्यांचा लाभ झाला. आपण कृपावंत होऊन आजपर्यंत सतत आमच्या यादव कुळाला राजधर्माचे ज्ञान सांगून राजधर्माचरणाला उद्युक्त करीत राहिलात. क्वचितप्रसंगी अनवधानाने घडलेल्या आमच्या चुकांना आपण उदार मनाने क्षमा केलीत आणि योग्य धर्माचरणाला पुन्हा पुन्हा प्रवृत्त करीत राहिलात. आमच्या कुळात घडणारी प्रत्येक गोष्ट ही आपल्याच मार्गदर्शनानुसार व आपल्याच आशीर्वादाने घडत अलेली आहे आणि पुढेही आमचे जीवन आपल्या सांगण्यानुसार व आपणाला अपेक्षित असेच घडत राहील. आपली ही कृपा आमच्यावर निरंतर असावी, अशीच नम्र प्रार्थना आपल्या चरणी करीत आहे.

हे मुनिवर्य, आज मी आपल्याकडे मुद्दामहूनच एका विशिष्ट कारणाने आलो आहे. माझा पुत्र कृष्ण याच्याविषयी आपण सर्वकाही जाणून आहातच. त्याच्या जन्माची वार्ता कळल्यावरती आपण कृपावंत होऊन स्वतः गोकुळात गेला होतात आणि त्याचे 'कृष्ण' असे नामकरणही आपल्याच शुभवाणीने झालेले होते. त्यानंतर घडलेले कृष्णाचे सर्व जीवन हेही आपणास विदित आहेच. आता कृष्णाच्या पुढील जीवनाच्या दृष्टीने काय योजना करावी आणि काय निर्णय घ्यावा याचे मार्गदर्शन घेण्यासाठीच मी आपल्या चरणी आलो आहे.

बारा वर्षे पूर्ण झालेल्या कृष्णाला आता विद्यार्जनासाठी गुरूगृही पाठवावे असा उग्रसेन महाराजांचा मानस आहे. कृष्णाचे आतापर्यंतचे पराक्रमी व विशेषत्वाने प्रगट झालेले जीवन पहाता 'कृष्णाला कुठलेही विद्यार्जन अनावश्यक आहे' असे मला अगदी मनापासून वाटत होते. परंतु स्वतः कृष्णानेच गुरूगृही जाण्याची जरूरी व इच्छा व्यक्त केली आहे. तेव्हा त्यासाठीच कृष्णाला व त्याचबरोबर माझा प्रथम पुत्र बलराम यालाही आपल्याच सान्निध्यात ठेवावे अशीच आमची इच्छा आहे. कारण आपल्याशिवाय दुसऱ्या

कोणाचेही माहात्म्य निदान आमच्यासाठी तरी नाही. तरी आपण आमच्या विनंतीचा स्वीकार करावा अशी आपल्या चरणी नम्रपणे प्रार्थना करतो. ''

वसुदेवाच्या बोलण्यावर गर्ग मुनी गंभीर झाले आणि त्यांनी आपले नेत्र मिटून घेतले. काही वेळ ते त्याच अवस्थेत स्वस्थ बसून राहिले. थोड्या वेळाने गर्ग मुनींनी आपले नेत्र उघडले, तर त्यांचे नेत्र अश्रूंनी पूर्णपणे भरलेले होते. गर्ग मुनींची ती भावपूर्ण अवस्था पाहून वसुदेवालाही नवलच वाटले. परंतु काहीही न बोलता तो गर्ग मुनींकडे एकटक नजरेने पहात राहिला. काही वेळानंतर गर्ग मुनींच्या मुखातून धीरगंभीर वाणी प्रगट होऊ लागली.

''हे वसुदेवा, खरोखरीच त्या परमेश्वराची लीला अगाध आहे. केवळ सृष्टीरूपाने प्रगट होऊनही त्याचे समाधान होत नाही, तर स्वतः मानव देहाने त्या सृष्टीत अवतार घेऊन तो खेळत असतो. एवढेच नव्हे, तर स्वतःबरोबर अनेकांनाही खेळावयास भाग पाडतो. जे त्याच्या खेळाविषयी अजाण असतात त्यांना तो खेळ न कळल्यामुळे अत्यंत त्रासच होतो. शरीराचे कष्ट तर होतातच, परंतु त्यांच्या मनालाही फार क्लेशच होतात. मात्र ज्यांना हा परमेश्वराचा खेळ कळतो, ते परमेश्वराच्या खेळात मनापासून सहभागी होतात आणि त्या खेळाचा आनंद घेतात. परंतु त्या परमेश्वराशी ऐक्य पावलेले जे त्याचे भक्त असतात, ते मात्र परमेश्वर ज्या त्याच्या स्वानंदाच्या अवस्थेतून हा खेळ मांडत असतो व खेळत असतो, त्या त्याच्या अवस्थेचा आनंद अनुभवीत असतात. त्यामुळेच परमेश्वराच्या खेळात प्रेमाने सहभागी होऊनही त्याचे भक्त मात्र त्या खेळात न रमता वा न गुंतता, परमेश्वराच्या प्रेमातच रममाण होऊन रहातात आणि त्या परमेश्वराचा खेळ त्या प्रेमाने रंगवत ठेवतात. भक्तांच्या या ऐक्यरूप अवस्थेतील प्रेमभक्तीने परमेश्वर त्यांच्यावर सदासर्वकाळ प्रसन्न राहिलेला असतो.

हे वसुदेवा, त्या परमेश्वराने असाच एक अद्भूत खेळ या कृष्णचरित्राच्या रूपाने मांडलेला आहे. त्याची जाणीव मला अगदी सुरुवातीपासूनच, म्हणजे कृष्णजन्मापासूनच आहे. कारण कृष्ण हा साक्षात परमेश्वराचाच अवतार आहे याची खूण व खात्री मला त्याच्या जन्माची कथा जाणल्यावर लागलीच पटली होती. म्हणूनच तर मी स्वतः गोकुळात नंदाच्या घरी जाऊन कृष्णाचे नामकरण केले होते. त्याच वेळेस कृष्णाकडून पुढे प्रगट होणाऱ्या दिव्य चरित्राविषयीसुद्धा मी नंदाकडे बोललो होतो. त्याप्रमाणे कृष्णाचे अत्यंत पराक्रमाचे व सर्वांसाठी प्रेमदायी असे चरित्र प्रगटही झाले. या पुढेही कृष्णचरित्राद्वारे परमेश्वराच्या अनेक दिव्य व आनंददायी लीला प्रगट होतील. अशीच एक लीला आता या कृष्णचरित्रात घडत आहे अणि त्याचा मला अत्यंत आनंद होत आहे.

हे वसुदेवा, विद्यार्जनासाठी कृष्णाने गुरूगृही जावे, अशी जी इच्छा उग्रसेनाच्या मनात आली आहे ती योग्यच आहे. कारण गुरूकृपेशिवाय जीवनाची पूर्तता व सार्थकता नाही हेही खरेच आहे आणि कृष्णाठायीसुद्धा याची पूर्ण जाणीव आहे, हेच तर खरे कृष्णाचे वैशिष्ट्य व माहात्म्य आहे. एवढे कार्य कृष्णाकडून घडूनही त्याच्या ठिकाणी असलेली ही जी जाणीव आहे, तोच तर त्याचा ईश्वरी गुण आहे आणि तेच तर त्याच्याठायीच्या ईश्वरत्वाचे लक्षण आहे. म्हणूनच गुरूगृही जाण्याची आवश्यकता कृष्णालाही वाटत आहे आणि ते अगदी बरोबरच आहे.

हे वसुदेवा, आता कृष्णाला माझ्याचकडे ठेवून घेण्याविषयी म्हणशील, तर त्या संबंधी परमेश्वराची नियती वेगळी आहे आणि तीच आपणा सर्वांना प्रमाण आहे. कृष्णासारख्या अवतारी पुरुषाची शरणागती स्वीकारण्यासाठी तशीच वृत्ती असलेली अधिकारी व्यक्ती हवी. ईश्वरस्वरूपाशी ऐक्य पावलेल्या सर्वच महात्म्यांच्या अंतःकरणाची अवस्था एकच असते. परंतु त्यांचा कार्य करण्याचा अधिकार मात्र त्यांच्या वृत्तीनुसार वेगळा वेगळा असतो. या दृष्टीने कृष्णाचा शिष्य म्हणून स्वीकार करण्यासाठी थोर महात्मे सांदिपनी यांची योजना परमेश्वराच्या नियतीत आधीपासूनच ठरलेली आहे. तेव्हा कृष्णाला व त्याच्याबरोबर बलरामालाही सांदिपनी ऋषींच्या आश्रमात तू त्वरित घेऊन जावेस. पुढील गोष्टी परमेश्वरी नियतीनुसार योग्य प्रकारे घडणार आहेतच. ''

गर्ग मुनींच्या बोलण्याने वसुदेव थोडासा चकितच झाला होता. गर्ग मुनींच्या बोलण्यात आलेले 'अवस्था, अधिकार, वृत्ती, कार्य' इत्यादी विषय वसुदेवाला शब्दाने समजले जरूर, परंतु पूर्णपणे उमजले मात्र नाहीत. 'गर्ग मुनी कृष्णाला स्वतःकडे ठेवून न घेता त्याला सांदिपनी ऋषींकडे न्यावयास का बरे सांगत आहेत' हे वसुदेवालाही निश्चितपणे कळेचना. परंतु त्या गोष्टीचा जास्त विचार करीत न रहाता, वसुदेवाने गर्ग मुनींचे सांगणे शिरोधार्ह मानले आणि गर्ग मुनींना प्रणिपात करून वसुदेव मथुरा नगरीला परतला. उग्रसेनाला भेटून वसुदेवाने गर्ग मुनींशी झालेले समग्र बोलणे त्याला कळीत केले. उग्रसेनाची संमती घेऊन वसुदेवाने कृष्ण व बलराम यांच्यासह सांदिपनी ऋषींकडे जाण्याची तयारी सुरू केली.

वसुदेवाने प्रथम ही गोष्ट देवकीच्या कानावर घातली. साहजिकच सुरुवातीला देवकीला जरासे वाईट वाटलेच. किती तरी काळाच्या विरहानंतर तिला आता कोठे कृष्णाचा सहवास लाभला होता आणि लगेचच पुन्हा कृष्ण आता तिच्यापासून दूर जाणार होता. वियोगाच्या विचारानेच देवकीचे मन कळवळले. परंतु 'कृष्णाच्या हिताच्या दृष्टीने ते अत्यंत आवश्यक आहे' अशी वसुदेवाने देवकीची परोपरीने समजूत काढल्यावर मात्र, देवकीने आपल्या भावनेला आवर घातला आणि स्वतःला सावरले. वसुदेवाने नंतर कृष्ण व

बलराम यांनाही बोलावून घेतले आणि गर्ग मुनींशी झालेले बोलणे त्यांना समजावून सांगितले. वसुदेवाच्या सांगण्यानुसार व गर्ग मुनींची आज्ञा प्रमाण मानून कृष्ण व बलराम उभयता सांदिपनी ऋषींकडे विद्यार्जनास्तव जाण्यासाठी सज्ज झाले.

हे लक्ष्मी, त्यानंतर एका शुभदिनी सुप्रभाती कृष्ण व बलराम यांनी प्रथम मातामह उग्रसेन यांना वंदन करून त्यांचे आशीर्वाद घेतले. त्यानंतर उभयतांच्या माता देवकी व रोहिणी यांनाही उभयतांनी नमस्कार करून त्यांचे शुभाशीष मागून घेतले. त्यांनी कृष्ण व बलराम यांना आपल्या कुशीत घेऊन त्यांचे मुख कुरवाळले आणि त्यांच्यावर प्रेमाचा जणू वर्षावच केला. बराच वेळ त्या दोघींना आपल्या पुत्रांना दूर करवेच ना! शेवटी वसुदेव स्वतः पुढे आला आणि त्याने त्या दोघींची समजूत घालून कृष्ण व बलराम यांना आपल्या जवळ घेतले. दोघांचे हात धरून तो त्यांना घेऊन रथात बसला आणि वसुदेवाने सारथ्याला रथ चालवण्याची सूचना केली. वसुदेवाचे अंतःकरणही जडच झाले होते. त्याचेही नेत्र अश्रुंनी भरूनच आले होते. पण त्याने संयमाने स्वतःच्या भावनावेगाला आवरून धरले होते.

राजवाड्यातून बाहेर पडून रथ मथुरेच्या राजपथावर आला मात्र, मथुरेतील सर्व नागरिक कृष्ण व बलराम यांना निरोप देण्यासाठी रस्त्यावरच आले. तसे पाहिले, तर कृष्ण व बलराम यांचे मथुरेतील वास्तव्य थोड्या काळाचेच झालेले होते. परंतु तेवढ्याही काळात त्यांनी आपल्या प्रेमळ वागण्या-बोलण्याने व उमद्या व्यक्तिमत्त्वाने सर्वांच्याच मनाला भुरळ घातली होती. थोड्या काळासाठी का होईना, पण 'कृष्ण व बलराम आपल्यापासून दूर जात आहेत' ही कल्पनाही त्यांना सहन करणे शक्य होत नव्हते. अश्रुपूर्ण नेत्रांनी व आपला हात उंचावून प्रत्येकजण कृष्ण व बलराम यांना प्रेमाने निरोप देत होता. कृष्ण व बलरामही आपले दोन्ही हात जोडून सर्वांना अभिवादन करीत होते आणि त्यांच्या प्रेमभावनेचा मनःपूर्वक स्वीकार करीत होते. रथाचा सारथीही तेवढ्याच जड मनाने रथ सावकाशपणेच चालवीत होता. बऱ्याच वेळानंतर वसुदेव, कृष्ण व बलराम यांना घेऊन चाललेला तो रथ मथुरा नगरीच्या बाहेर आला आणि सांदिपनी ऋषींच्या आश्रमाच्या दिशेने कूच करू लागला. ''

बोलता बोलता नारद एक क्षणभरच बोलायचा थांबला आणि लक्ष्मीने तीच संधी लगेचच साधून बोलावयास सुरुवात केली.

''हे नारदा, कृष्णचरित्राच्या सूत्रानेच तू या नारायणाच्या सगुण अवताराचे माहात्म्य प्रगट करीत आहेस हे खरे आहे. कारण तेच सूत्र मुख्य आहे आणि तेच वर्णनीयही आहे यात तीळमात्रही शंका नाही. परंतु त्या चरित्राच्या निमित्ताने जेव्हा काही इतर अनुषंगिक विषयही तुझ्याकडून प्रगट होतात, तेव्हा त्या विषयांचाही विचार करणे मला तरी

आवश्यकच वाटते. कारण ते विषय जरी प्रासंगिक असले तरी त्यामध्येही काहीतरी गुज दडलेले असतेच आणि ते गुज जाणून घेण्याची उत्सुकताही मग माझ्या मनाला लागून रहातेच ना!

हे नारदा, मगाशी बोलताना एक वाक्य तू अगदी सहजपणे बोलून पुढे गेलास की, 'अवस्था, अधिकार, वृत्ती इत्यादी शब्द व विषय वसुदेवाला केवळ समजले, पण उमजले मात्र नाहीत. परंतु जास्त विचार न करता वसुदेवाने गर्ग मुनींचे सांगणे प्रमाण मानून तशी कार्यवाही केली. 'नारदा, माझीही मनःस्थिती अगदी तशीच झाली आहे. मलाही ते विषय शब्दाने व अर्थाने थोडेसे कळले, पण नीटपणे उमजलेले नाहीत. त्यातील गुज व भाव माझ्यासाठी अजूनही अप्रगटच आहे आणि जोपर्यंत तो भाव मला आकलन होत नाही, तोपर्यंत केवळ शब्दांचे अर्थ कळण्यात काहीच अर्थ नाही. होय ना? तेव्हा कृपा करून त्या विषयांची मला अधिक उकल करून सांग. म्हणजे पुढे घडणाऱ्या कृष्णचरित्राचे श्रवण करून त्याचा पूर्ण आनंद घेणे माझ्या मनाला सुलभ व शक्य होईल.

गर्ग मुनी हे स्वतः थोर ऋषी होते आणि यादवकुळाचे कुलगुरूही होते. मग त्यांनीच कृष्णाचा शिष्य म्हणून स्वीकार न करता कृष्णाला सांदिपनी ऋषींकडे पाठवण्यास सांगितले, याचे मला तरी नवलच वाटत आहे. 'गर्ग मुनींचा अधिकार नव्हता' असेही म्हणता येत नाही. आता त्यांची तशी वृत्ती व अवस्था नव्हती म्हणजे तरी निश्चित काय? आणि सांदिपनींची तशी अवस्था व वृत्ती होती हे तरी गर्ग मुनींना कसे कळले? नारदा, बघ ना! विचार करायला लागले की मनात एवढे प्रश्न निर्माण होतात आणि मग मनाची लक्षपूर्वक श्रवण करण्याची क्षमता कमी होते. पण लक्षपूर्वक श्रवण केल्यावर मनात अनेक विचार व प्रश्न हे येणारच ना! त्या विचारांना डावलता येत नाही, पण योग्य समज करून घेऊन मला त्या विचारांना बाजूला करता येईल एवढे मात्र निश्चित. तेव्हा लवकरात लवकर माझ्या प्रश्नांचे तू निरसन करावेस हेच अधिक योग्य आहे. ''

लक्ष्मीच्या बोलण्यावर नारदाने किंचित स्मितहास्य केले आणि तो म्हणाला, ''हे लक्ष्मी, तुझे लक्षपूर्वक ऐकणे व विचारपूर्वक बोलणे हा नेहमीच माझ्या कौतुकाचा विषय होऊन राहिला आहे. परंतु तुझे लक्ष माझ्या बोलण्यातील भावाकडे असते हे महत्त्वाचे आहे. तो भाव लक्षात आला नाही, की तुझ्या ठिकाणी अनेक विचार निर्माण होतात. म्हणूनच तुझ्या विचारांकडे लक्ष देण्याचा भाव माझ्याठायी निर्माण होतो. कारण तशी माझी वृत्ती आहे. तुझ्या मनातील विचार व त्यातून निर्माण झालेले प्रश्नही साहजिकच आहेत. पण त्याचा उलगडा करून सांगण्याचा मलाही प्रयत्नच करावा लागणार आहे. कारण त्यातील भाव एवढे सूक्ष्म असतात, की त्यांचे योग्य शब्दांकन करणे पूर्णपणे शक्य होत

नाही. हे जसे मी जाणून आहे तसे ते तुलाही ठाऊक आहेच. पण तरीही शब्दांचे जास्तीत जास्त सहाय्य घेणे हे आवश्यकच आहे. असो. तेव्हा लक्ष्मी, विषय नीट समजून घे.

आत्मस्वरूपाचा अनुभव ही अंतःकरणात सतत व सहज स्फुरणारी अशी एक नित्याची मूलभूत जाणीव असते. ती जाणीव हेच या सृष्टीतील एकमेव सत्य आहे. त्यामुळे सर्व स्वानुभवी महात्म्यांच्याठायी असलेली ती जाणीव, ही एकीएकच असते. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे वेगळेपण वा दुजेपण संभवूच शकत नाही. पण ही जाणीव अव्यक्त असल्यामुळे केवळ ज्याच्या त्याच्या अनुभवाचीच असते. बाह्यांगाने दुसऱ्या कोणालाही ती अवस्था कळणे वा जाणता येणे शक्यच होऊ शकत नाही. अर्थात असे स्वानुभवी महात्मे मात्र, त्यांच्या आंतरिक प्रेरणेने एकमेकांची अवस्था आपल्या अंतरात जाणून असतात. स्वतःच्या स्वानुभवाने दुसऱ्याच्या ठिकाणच्या स्वानुभवाची अवस्था त्यांना निश्चितच जाणवत असते. कारण स्वानुभवाच्या अवस्थेचे ते एक प्रमुख लक्षणच आहे.

हे लक्ष्मी, अशी स्वानुभवाची विशुद्ध अवस्था बाह्यांगाने प्रगट होताना मात्र, विविध रूपाने व अंगाने प्रगट होते आणि म्हणूनच मूळची एकच अवस्था वेगळी वेगळी दिसते. या वेगळेपणाचे एक मुख्य कारण म्हणजे त्या त्या महात्म्यांचा मूळचा प्रकृतीस्वभाव होय. आत्मस्वरूपाच्या अनुभवामध्ये मूळ स्वभावातील सर्व अहंकार पूर्णपणे लयाला गेलेला असला, तरी मूळ स्वभाव मात्र कायम रहातो. त्या स्वभावानुसारच त्या महात्म्यांकडून घडणारे कार्यही मग वेगवेगळे दिसते आणि तसे ते असतेही. परंतु हे बाह्यांगाचे वेगळेपण मूळच्या आंतरिक अवस्थेला जराही बाधित करू शकत नाही. त्यामुळे महात्म्यांच्या ठायीचे हे बाह्यांगाचे वेगळेपण ही केवळ एक विविधताच ठरते. त्या वेगळेपणात उच्च-नीच किंवा श्रेष्ठ-कनिष्ठ अशी तुलना मात्र अजिबात संभवतच नाही.

काही महात्मे आत्मस्वरूपाच्या स्वानुभवातच रममाण होऊन रहातात, ज्या अवस्थेला 'आत्मरती' असे म्हणतात. त्यांच्याठिकाणी तर स्वतःच्याच देहाचे भान नसते, तर मग जगाचे भान कुठून असणार? त्यामुळे लोककल्याणाचे कार्य त्यांच्याकडून घडण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. काही महात्म्यांच्या ठायी किंचितसे वेगळेपण तेही किंचित काळ निर्माण होते खरे, परंतु तरीही त्यांच्या ठिकाणी आत्मस्वरूपाचा ध्यास कायम असतो. तोच ध्यास जेव्हा उत्कट होतो तेव्हा त्या महात्म्यांकडून उत्स्फूर्तपणे 'आत्मगान' प्रगट होते. काही महात्म्यांच्याठायी आणखीन वेगळेपण निर्माण होते. तरीही आत्मस्वरूपाची जाण व निश्चय त्यांच्याठिकाणी कायम असतो. तेव्हा त्यांच्याकडून बुद्धीच्याद्वारे सर्वश्रेष्ठ असे 'आत्मज्ञान' प्रगट होते. काही महात्म्यांच्याठायी बाह्यांगाचे सर्व भान असते. पण तरीही त्यांच्याठिकाणी आत्मस्वरूपाचा आपलेपणा कायम असतो. तो आपलेपणा त्यांच्या मनामध्ये जेव्हा उचंबळून येतो तेव्हा त्या महात्म्यांकडून त्यांचे

'आत्मप्रेम' प्रगट होते. महात्म्यांच्या या आत्मप्रेमाचा लाभ सर्वांनाच होतो. त्यांच्या आत्मज्ञानाचा लाभ काहीजण करून घेतात आणि आत्मस्वरूपाच्या सत्यत्वाचा आपल्या बुद्धीच्या ठायी निश्चय करतात. महात्म्यांच्या आत्मगानाच्या नादाने काही थोड्याजणांच्या ठायी आत्मस्वरूपाचा अनुभव घेण्याचा ध्यास लागतो आणि त्या महात्म्यांच्याच कृपाप्रसादाने काही थोडेचजण 'आत्मरती' अवस्थेचा स्वानुभव घेतात.

हे लक्ष्मी, एखादी कृती प्रगट होताना ती कशी करायची हे जसे ज्याच्या त्याच्या स्वभावानुसार घडते, तसेच मुळात तशी कृती करायची की नाही हे ज्याच्या त्याच्या वृत्तीनुसार घडते. जसे 'जायचे की नाही जायचे, बोलायचे की नाही बोलायचे, करायचे की नाही करायचे' हे ज्याच्या त्याच्या वृत्तीनुसार ठरते, पण 'कोठे वा कसे जायचे, काय, किती वा कसे बोलायचे, काय व कसे करायचे' या गोष्टी प्रत्येकाच्या स्वभावानुसार घडत असतात. जगामध्ये अशा भिन्न भिन्न स्वभावाच्या व वृत्तीच्या व्यक्ती आहेत म्हणून जसे सृष्टीचे सर्व व्यवहार सर्वांगाने चालू असतात, तसेच वेगवेगळ्या स्वभावाच्या व वृत्तीच्या महात्म्यांमुळेही परमेश्वराचे लोककल्याणाचे कार्य घडत रहाते. कारण परमेश्वराची नियतीच तशी आहे. तेव्हा कृती, वृत्ती व स्वभावाचे बंधन हे सर्व मानवांनाच आहे. कारण मानवी देहाचीच ती मर्यादा व ते लक्षण आहे. पण सामान्यांच्या ठिकाणी त्यांच्या प्रकृतीस्वभावाचा अहंकार असतो आणि त्यामुळेच त्यांची अधोगती झालेली असते. पण थोर महात्मे हे मानवदेहधारी असल्यामुळेच वृत्ती व स्वभावाच्या बंधनात असले तरीही ते पूर्णपणे निरहंकारी असतात हेच अत्यंत महत्त्वाचे आहे. हेच तर त्यांच्या आत्मस्वरूपाच्या अनुभवाचे लक्षण आहे.

हे लक्ष्मी, थोर महात्म्यांच्या शुद्ध व निरहंकारी अंतःकरणामध्ये जशी त्यांच्या आत्मस्वरूपाची जाणीव सतत स्फुरत असते, तशीच तेथे परमेश्वराच्या व्यापक स्वरूपाची जाणीवही सहजपणे असते. आत्मस्वरूपाच्या जाणिवेमुळेच त्यांचे अंतःकरण शुद्ध असते अणि परमात्म्याच्या व्यापक स्वरूपाच्या जाणिवेमुळेच त्यांचे अंतःकरण निरहंकारी असते. परमात्म्याशी अशा जुळलेल्या महात्म्यांच्या अंतःकरणामध्ये, नियतीत पुढे घडणाऱ्या परमेश्वरी कार्याचे सत्संकल्पही काहीवेळा अचानक व सहजपणे स्फुरतात. त्याचे त्यांना स्वतःला नवलही वाटत नाही किंवा कौतुकही वाटत नाही. परंतु अंतःकरणात निर्माण झालेल्या त्या सत्संकल्पाच्या उर्मीचा आनंद मात्र ते महात्मे जरूर अनुभवतात. नेमकी तीच गोष्ट गर्ग मुनींच्या बाबतीत घडली. परमेश्वरी नियतीतील योजनेनुसार कृष्णासाठी सांदिपनी ऋषींची नियुक्ती अहे, अशा संकल्पाची उर्मी गर्ग मुनींच्या विशुद्ध अंतःकरणात निर्माण झाली.

हे लक्ष्मी, एक गोष्ट निश्चितच आहे की गर्ग मुनी हे सांदिपनी ऋषींचे माहात्म्य पूर्णपणे जाणून होते. एक महात्माच दुसऱ्या महात्म्याला खऱ्या अर्थाने व स्वानुभवाने ओळखू शकतो हे सत्यच आहे. दुसरे व महत्त्वाचे कारण म्हणजे गर्ग मुनींना, सांदिपनी ऋषींकडून त्यांच्या स्वभावानुसार घडणाऱ्या कार्याचीही पूर्ण माहिती होती. स्वतःच्या आश्रमात अनेक साधकांना आश्रय देऊन सांदिपनी ऋषींनी त्यांच्यावर अनुग्रह केला होता. साधकांना योग्य साधन देऊन त्यांच्याठिकाणी ईश्वरप्राप्तीची तळमळ निर्माण करण्याचा सद्हेतू मनामध्ये धरूनच, सांदिपनी ऋषींकडून विविध अंगानी कार्य घडत होते. त्यांचे कार्य त्यांना शरण आलेल्या मुमुक्षूंसाठीच आणि त्यांच्या आश्रमापुरतेच मर्यादित होते खरे, परंतु म्हणूनच खरे साधक योग्य साधनेने व गुरूकृपेने स्वानुभवाच्या सिद्ध अवस्थेला पोहोचण्याची शक्यता त्या ठिकाणी होती. ईश्वराच्या प्राप्तीसाठी असलेला सद्गुरूभक्तीचा सत्यमार्ग सांदिपनींच्या रूपाने, जीवनाने व कार्याने त्यांच्या आश्रमात प्रगट होता.

हे लक्ष्मी, सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सांदिपनी ऋषी गृहस्थाश्रमी होते आणि आपल्या पत्नीसह आश्रमात राहूनच आपल्या ईश्वरी अनुभवाने आनंदाचे जीवन जगत होते. आपले आश्रमातील स्थान सोडून ते कधीही कोठेही जात नसत, तर त्यांचे वास्तव्य निरंतर स्वस्थानी, म्हणजे त्यांच्या आश्रमातच असे. परंतु गर्ग मुनींचा स्वभाव व बाह्यजीवन वेगळे होते. स्वानुभवात नित्य रममाण असूनही त्यांच्या ठिकाणी अचानक एखादी उर्मी उठत असे आणि मग त्यांच्या स्वभावानुसार गर्ग मुनी त्या उर्मीप्रमाणे कृती करून अनुभव घेत असत. त्या त्यांच्या स्वभावामुळेच त्यांचे वास्तव्य एका जागी कधीच जास्त काळ होत नसे. लक्ष्मी, तुला आठवतच असेल, की एकदा अशाच त्यांच्या अंतःकरणात उठलेल्या उर्मीनुसार, गर्ग मुनी एकदम तडक गोकुळात नंदाकडे जाऊन पोहोचले होते. गर्ग मुनींनीच कृष्णाचे विधीयुक्त नामकरण करून त्याचे 'कृष्ण' हे नाव ठेवले होते. एवढेच नव्हे, तर कृष्णाच्या जन्माचे रहस्य व कृष्णाच्या जीवनकार्याचे माहात्म्यही गर्ग मुनींनी नंदाला विशद करून सांगितले होते.

हे लक्ष्मी, गर्ग मुनींचे आणखीन एक वेगळेपण होते. 'संसारातील मुमुक्षूंचा शिष्य म्हणून स्वीकार करावा, त्यांच्याकडून शरणागती मुद्दामहून सांगून, मागून घ्यावी, त्यांना योग्य ते साधन द्यावे, त्यांच्यासाठी सत्यज्ञान प्रगट करावे, त्यांच्या ठिकाणच्या त्रिगुणात्मक दोषांचे निर्मूलन करून, त्यांच्या मनाला सर्व वासनांपासून मुक्त करून पूर्ण शुद्ध करावे आणि त्यांच्या सेवाभावाचा स्वीकार करून त्यांच्या ठायीच्या अहंकाराला नष्ट करावे, अशी वृत्ती गर्ग मुनींची मुळातच नव्हती. पण अशा वृत्तीमुळेच ईश्वराचे सद्गुरू रूपातील कार्य घडू शकते. कारण सामान्य जीवांच्या ठिकाणचे असलेले सत्त्व, रज व तम असे त्रिगुणात्मक दोष व त्यांचा अहंकार घालवण्यासाठी त्रिगुणातीत ईश्वरी स्वरूपाचे त्रिगुणात्मक असे 'शिव'रूपच प्रगट व्हावे लागते. सत्य असलेले तेच 'शिव'रूप म्हणजेच

सद्‌गुरूरूप होय. या सर्वाची जाणीव स्वतः गर्ग मुनींच्याठायी होती. स्वतःच्या वृत्तीचे ज्ञान व स्वभावाचे भान त्यांना होते आणि त्याचबरोबर सांदिपनी ऋषींचा स्वभाव व वृत्तीची जाणही गर्ग मुनींच्याठायी होती. म्हणूनच कृष्णाने शरण जावे यासाठी सांदिपनी ऋषीच एकमेव अधिकारी व त्या वृत्तीचे असे थोर महात्मे आहेत हे त्यांनी जाणले आणि तशीच उर्मी त्यांच्या अंतःकरणात अगदी सहजपणे निर्माण झाली. गर्ग मुनींच्या ठिकाणची ही योग्य जाणीव, त्यांचे निरहंकारीत्व, परमेश्वरी कार्य घडावे असा त्यांचा ध्यास आणि त्या परमेश्वरी कार्यात त्यांनी आनंदाने घेतलेला सहभाग व दिलेले सहकार्य' हे सर्वच गर्ग मुनींच्या अंतःकरणातील ईश्वरी अनुभवाचे द्योतकच होते आणि व्यापक परमेश्वरी सत्तेशी असलेल्या त्यांच्या एकरूपतेचे ते लक्षण होते. ''

नारदाच्या बोलण्याने लक्ष्मी प्रभावित होत होती खरी, पण तरीही नारद सांगत असलेला विषय तिला पूर्णपणे कळला आहे असे तिच्या मुखावरून तरी वाटत नव्हते. लक्ष्मीनेही बोलून तिच्या मनातील तीच भावना व्यक्त केली. नारदाला उद्देशून लक्ष्मी म्हणाली,

''हे नारदा, तुझ्या परीने तू हा विषय जास्तीत जास्त विशद करून सांगण्याचा प्रयत्न करीत आहेस हे माझ्या लक्षात येत आहे. परंतु माझ्या बुद्धीच्या आकलन शक्तीच्याही मर्यादा असल्यामुळे मला तो विषय पूर्णपणे कळत नाही हे तुझ्याही लक्षात आले असेलच. परंतु स्वानुभवाचे व अंतःकरणाच्या अवस्थेचे वर्णन हे बुद्धीच्या जाणून घेण्याच्याही कुवतीपलीकडचे आहे हे मात्र मी निश्चितपणे जाणून आहे. त्यामुळे तू सांगत असलेला विषय मला नीटपणे कळला नाही म्हणून मी मनात खेद करीत निश्चितच बसणार नाही. परंतु तुझ्या सांगण्यातील भावार्थ मात्र माझ्या नक्कीच लक्षात आलेला आहे आणि तोच अत्यंत महत्त्वाचा आहे याची मला खात्री आहे.

मुख्य म्हणजे आत्मानुभवी महात्म्यांच्या विशुद्ध अंतःकरणात उठणाऱ्या उर्मींचा हा खेळ आहे. या उर्मी अनेक व विविध असल्या, तरी त्या महात्म्यांच्या शुद्ध अंतःकरणात उठलेल्या आहेत. त्यामुळे त्या उर्मी शुद्ध तर आहेतच, परंतु त्या उर्मी व्यापक परमेश्वराच्या सृष्टीखेळात नित्य घडणाऱ्या लीलांचाच एक भाग आहे, हीच गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. नारदा, 'लीला म्हणजे सहजता आणि आनंद' असे तूच नेहमी स्वानुभवाने सांगत असतोस आणि माझाही हळूहळू तसाच अनुभव होत आहे. कारण मीही त्याच भावाने या नारायणाच्या सगुण अवतारचरित्रांकडे आता पहात असते. परंतु बुद्धीच्या जिज्ञासू वृत्तीमुळे काही वेळा माझ्या ठिकाणी काही प्रश्न निर्माण होतात इतकेच! तूही माझ्या प्रश्नांना उत्तर देण्याच्या निमित्ताने अगदी मनमोकळेपणाने बोलत असतोस. त्या श्रवणानेच माझे मन भरून येते आणि माझ्या दृष्टीने तीच गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे तुझ्या

सांगण्यातील जेवढे माझ्या बुद्धीला कळते तेवढे मी स्वीकारते आणि इतर न कळलेल्या गोष्टींचा जास्त विचार करीत न बसता, प्रेमाने भरलेल्या मनाने श्रवणासाठी अत्यंत आतुरतेने सादर होते. कारण त्यामुळेच माझे मन नारायणाच्या प्रेमाने वाहू लागते आणि आनंदाचा अनुभव देणारा भक्तिभाव माझ्या मनाठायी निर्माण होतो.

नारदा, आता माझे मन पुढे घडणाऱ्या कृष्णचरित्राच्या श्रवणानंदाचा अनुभव घेण्यासाठीच अत्यंत आतुर झालेले आहे. 'सांदिपनी ऋषींच्या आश्रमात कृष्णाच्या काय लीला घडल्या? कृष्णाचा शिष्यभाव कसा प्रगट झाला असेल बरे? आणि सर्वात मुख्य म्हणजे सांदिपनी ऋषींनी कृष्णाला आणखीन विशेष असे काय ज्ञान दिले असेल? सांदिपनी व कृष्ण यांचे संबंधही कशा प्रकारचे असतील? हे सर्व सर्व ऐकण्याची व जाणून घेण्याची माझ्या मनाची उत्कंठा अगदी पराकोटीला पोहोचलेली आहे. तेव्हा नारदा, तू आता कृष्णचरित्रातील हा अत्यंत महत्त्वपूर्ण प्रसंग त्वरित वर्णन करून सांग बरे! ''

लक्ष्मीच्या बोलण्यावर नारदाने हसून संमतीदर्शक मान डोलवली आणि बोलण्यास प्रारंभ केला. ''हे लक्ष्मी, कृष्णलीला श्रवण करण्याचा तुझा हा भाव खरेच योग्य व स्तुत्य आहे यात शंकाच नाही. त्या कृष्णलीला आहेतच तशा आनंददायी! सगुण प्रेमातून भक्तिभाव निर्माण करून आनंदाचा अनुभव आणून देण्याचे केवढेतरी सामर्थ्य, केवळ या कृष्णकथांमध्ये अगदी पुरेपूर भरून राहिलेले आहे. त्याचाच अनुभव घेण्यास आपण उभयता आता सादर होऊया.

हे लक्ष्मी, मथुरेतील सर्वांचा प्रेमळ निरोप घेऊन कृष्ण व बलराम यांच्यासह वसुदेव जो निघाला तो थेट सांदिपनी ऋषींच्या आश्रमाजवळ येऊन पोहोचला. वाटेत थोडा वेळ आणि तेही जेव्हा अगदी अत्यावश्यक झाले तेव्हाच विश्रांतीसाठी त्यांचे काही थांबणे झाले असेल तेवढेच. बाकी सर्व वेळ वसुदेवाच्या ठिकाणी एकच व्यवधान होते आणि ते म्हणजे लवकरात लवकर सांदिपनी ऋषींच्या आश्रमात पोहोचण्याचे. त्यामुळेच सांदिपनी ऋषींचा आश्रम दृष्टीक्षेपात आल्याबरोबर, वसुदेवाला व्यवधानपूर्तीचे समाधान लाभले आणि त्याचे मनही एकदम उत्तेजित झाले. सारथ्याला सूचना देऊन वसुदेवाने रथ आश्रमाच्या बाहेरच थांबवला आणि कृष्ण व बलराम यांच्यासह, रथातून खाली उतरून वसुदेव आश्रमाच्या परिसरात प्रवेश करता झाला.

*****

## कृष्ण-सांदिपनी भेट

क्षिप्रा नदीच्या तीरावर व उज्जैन नगरीच्या जवळ असलेल्या त्या आश्रमातील वातावरणच एवढे प्रसन्न व पवित्र होते, की त्याठिकाणी मनाची शांती लाभावयास कोणालाही जराही वेळ लागला नसता. वसुदेवाच्या मनावरही त्या परिसराचा लागलीच परिणाम झाला. कृष्ण व बलराम यांच्यासंबंधीचे आपले कर्तव्यकर्म पुरे करीत असल्याचे समाधान एकीकडे बाह्यांगाने वसुदेवाला वाटत होते, तरीही मनातून पुत्रांच्या वियोगाच्या जाणिवेने त्याला थोडीशी बेचैनी व अस्वस्थता जाणवत होतीच. परंतु आश्रमातील शांत व प्रसन्न वातावरणाने वसुदेवाचेही मन बरेचसे शांत झाले. आजुबाजूचा सर्व रम्य परिसर अवलोकन करीत करीत, पण कुठेही न रेंगाळता वसुदेव, कृष्ण व बलराम सांदिपनींच्या पर्णकुटीच्या जवळ येऊन पोहोचले.

वसुदेवाने आपल्या आगमनाची सूचना सांदिपनींच्याकडे त्यांच्या शिष्यांच्याद्वारे पाठवली आणि त्यांच्या भेटीची परवानगी मागितली. सांदिपनींची अनुमती प्राप्त होताच वसुदेवाने कृष्ण व बलराम यांच्यासह सांदिपनींच्या पर्णकुटीत प्रवेश केला. आसनस्थ झालेली सांदिपनींची शांत, सौम्य व प्रसन्न मूर्ती पहाताक्षणीच वसुदेवाचे हात आपसूकच जोडले गेले आणि तो सहजपणे नतमस्तक झाला. सात्त्विक तेजाने युक्त असलेल्या सांदिपनींच्या मुखावर स्मितहास्य झळकले. त्यांनी वसुदेवाचे प्रेमाने स्वागत केले आणि त्याला बाजूच्या आसनावर बसण्याची हातानेच खूण केली. वसुदेव अत्यंत आदरपूर्वक व नम्रभावाने सांदिपनींच्या सन्मुख व चरणाशीच बसला असता, सांदिपनी त्याच्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहू लागले. सांदिपनींच्या नजरेतील भाव ओळखून वसुदेवाने आधी आपली ओळख करून दिली आणि बोलावयास सुरुवात केली.

‘‘हे ऋषिवर्य, आपण सर्वज्ञ आहातच. या सृष्टीत अशी कोणतीही गोष्ट नाही की जी आपण जाणत नाही. कारण या सृष्टीचे मूळ असलेल्या परमेश्वरालाच आपण जाणत असता. परंतु आमच्यासारखे मूढ व अज्ञानी जीव मात्र, परमेश्वरालाही जाणत नाहीत आणि आपले माहात्म्यही खऱ्या अर्थाने जाणत नाहीत. तरीही आपण मात्र आमचे अज्ञान जाणून असल्यामुळे आमच्यासाठी दयार्द्र होता आणि आम्हाला आपल्या चरणी आश्रय देता. एवढेच नव्हे, तर आमच्या अज्ञानमूलक अडचणींवरती योग्य मार्गदर्शन करून आमच्या अडचणींचे निराकरणही करता. या आपल्या थोरपणाचे यथार्थ वर्णन करण्यासाठी माझ्यापाशी योग्य असे शब्दच नाहीत. आमच्यासारख्या राजघराण्यातील व्यक्तींनाही केवळ

तुमचाच आधार वाटत असतो. आम्ही नेहमी प्रजाहितदक्ष असावे आणि आमच्याकडून राजधर्माचे योग्य पालन व्हावे यासाठी आम्ही तुमच्याच मार्गदर्शनावर पूर्णपणे अवलंबून असतो. या राजधर्माचे व राज्य करण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या अनेक कर्तव्यकर्मांचे यथार्थ ज्ञान प्राप्त व्हावे म्हणून आम्ही आमच्या राजघराण्यातील पुत्रांना, त्यांच्या बालवयातच आपल्यासारख्या थोर महात्म्यांकडे सुपूर्द करीत असतो, ज्यामुळे त्यांच्यावर योग्य संस्कार घडून त्यांना सर्व ज्ञानप्राप्ती होते आणि आपल्या कृपाशीर्वादाने लोककल्याणासाठी राज्यकारभार करण्यास ते पात्र होतात.

हे ऋषीवर्य, आजही मी आपणाकडे राजगुरू गर्ग मुनी यांच्या सांगण्यावरून अशाच हेतूने आलेलो आहे. माझ्याबरोबर आलेले हे माझे दोन पुत्र, कृष्ण व बलराम यांना आपला कृपाश्रय लाभावा एवढीच माझी इच्छा आहे. आपल्या मार्गदर्शनाने व सहवासानेच ते उत्तम पुरुष होतील आणि त्यांचे सर्व जीवन ते समर्थपणे जगतील याची मला पूर्ण खात्री आहे. हे महाराज, आपणांस कृष्णजन्माचे रहस्य व त्याचे आतापर्यंतचे सर्व जीवनही विदित असेलच. त्यासंबंधी मी आपणास काही सांगणे हे धाडसाचे व अयोग्यच ठरेल. तरी आपण कृपावंत व्हावे आणि माझ्या उभय पुत्रांचा शिष्य म्हणून स्वीकार करून त्यांना आपल्या चरणी स्थान द्यावे अशी आपणांस अत्यंत नम्र प्रार्थना आहे. ''

वसुदेवाचे बोलणे संपता संपताच त्याने कृष्ण व बलराम यांचे हात धरून त्यांना सांदिपनींच्या सन्मुख आणून उभे केले. कृष्ण व बलराम यांनी सांदिपनींना साष्टांग दंडवत घातला आणि ते दोघेही हात जोडून उभे राहिले. सांदिपनींनी त्या दोघांकडे प्रेमळ नजरेने व कौतुकाने पाहून स्मितहास्य केले आणि त्यांना खुणेनेच आपल्या जवळ बोलावले. कृष्ण व बलराम जराही न लाजता बुजता निःसंकोचपणे सांदिपनींच्या जवळ आले असता, सांदिपनींनी त्या उभयतांना दोन्ही बाजूंनी आपल्या कुशीत घेतले आणि त्या उभयतांचे मस्तक अत्यंत प्रेमाने कुरवाळले. सांदिपनींच्या ठिकाणचा उचंबळून आलेला तो वात्सल्यभाव पाहून वसुदेवाचेही नेत्र भरून आले. सांदिपनींनी कृष्ण व बलराम यांना आपल्या सन्निध बसवून घेतले आणि आपल्या मधूर व प्रेमळ वाणीने ते वसुदेवाशी बोलू लागले.

''हे वसुदेवा, खरोखरीच तू अभिनंदनास पात्र आहेस. आपल्या राजधर्माचे योग्य पालन करण्यासाठी तू तत्पर आहेस ही गोष्टच अत्यंत स्पृहणीय आहे. सध्याच्या काळात आपल्या धर्मापासून च्युत होण्याची वृत्तीच वाढत आहे. कोणालाही कोणाच्या मार्गदर्शनाची आवश्यकताच वाटेनाशी झालेली आहे. कारण कोणालाही आपण अज्ञानी आहोत वा आपले काही चुकत आहे याची जाणीवच राहिलेली नाही. सामान्य प्रजेला आधार देऊन योग्य मार्गाकडे प्रवृत्त करण्याचे राजाचे कर्तव्यकर्म आहे, नव्हे तो त्याचा धर्मच आहे.

त्यासाठी या धर्माचे ज्ञान त्याने योग्य अधिकारी व्यक्तींच्या मार्गदर्शनाने प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. असे असतानाही सांप्रत काळी अनेक राजांकडून त्याचे पालन होत नाही. राजसत्तेचा उपयोग अनेक विषयांचा भोग घेण्यासाठीच आहे, अशा समजुतीने अनेक राजे केवळ विषयासक्त होऊन राहिलेले आहेत. त्यामुळेच ते राजे दुर्बल व तेजोहीनही झालेले आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्याकडून प्रजेचे रक्षण व कल्याण होणे हे कदापिही शक्य नाही. क्षात्रतेज व ब्रह्मतेज यांच्या संयोगानेच खऱ्या धर्माची जागृती होते व रहातेही. परंतु क्षात्रधर्माचाच लोप होत असल्यामुळे सद्धर्माला पाय ठेवायला जागाच शिल्लक राहिलेली नाही. हे सर्व जरी काळगतीनुसारच घडत असले तरी ते सर्वांनाच अधोगतीला नेणारे आहे हे मात्र निश्चित.

हे वसुदेवा, अशा परिस्थितीत तुझ्यासारखे राजघराण्यातील पुरुष हेच सद्धर्माच्या जागृतीसाठीचे आशास्थान आहेत. कारण आजकाल राजकुळातील कुलाचार व कुलरीती यांचा सर्वत्र लोप होत असताना, तू मात्र आपल्या उभय राजपुत्रांना या आश्रमामध्ये घेऊन आलास. त्यांच्यावर सदाचार व सद्वृत्तीचे संस्कार व्हावेत या त्यामागील तुझ्या सद्हेतूचे म्हणूनच मला अत्यंत कौतुक वाटत आहे. त्यातूनही तुझे येथे माझ्याकडे येणे हे गर्गमुनींच्या सांगण्यावरून झालेले आहे, हे जाणून तर मला अतिशय आनंद झाला. गर्गमुनींसारखे थोर महात्मे हे त्यांच्या ईश्वरी अनुभवामुळे ईश्वरी नियतीला पूर्णपणे जाणत असतात आणि त्यानुसार त्यांच्याकडून अत्यंत उत्स्फूर्तपणे व अगदी सहजपणे जीवन जगणे घडत असते.

हे वसुदेवा, आता मी तुला एवढेच सांगतो, की ज्या हेतूने तू तुझ्या उभय पुत्रांना येथे घेऊन आलेला आहेस, तो तुझा हेतू निश्चितपणे पूर्तीस जाईल याची तू पूर्ण खात्री बाळग. कृष्ण व बलराम यांची काळजी करण्याचे तुला काहीच कारण नाही. त्या उभयतांना तू माझ्या स्वाधीन कर. माझ्यासाठी कृष्ण व बलराम हे माझ्या पुत्रासमानच आहेत. त्यांची सर्वार्थाने काळजी घेणे व त्यांचे योग्य पालन करणे हा तर माझा सहज धर्मच आहे. तेव्हा आता तू निश्चिंत मनाने आपल्या राज्यात परत जाण्याचे करावेस.

हे वसुदेवा, तुला आणखीन एक गोष्ट तुझ्या माहितीसाठी म्हणून सांगतो, की मला कृष्णाच्या जन्माचा इतिहास किंवा त्याचे आतापर्यंतचे जीवन याविषयी काहीच माहिती नाही आणि तशी माहिती असणे मला आवश्यकही नाही. कारण मी माझ्या ईश्वरी स्वानुभवात नित्य रमून माझे नित्याचे प्राप्त जीवन सहजपणे व आनंदाने जगत असतो. त्यातूनही जे कोणी शिष्यभावाने माझ्या चरणी आश्रयासाठी येतात, त्यांचा मी माझ्या आंतरिक प्रेरणेला प्रमाण मानून स्वीकार करीत असतो. येणाऱ्याच्या ठिकाणची आर्तता व ज्ञानप्राप्तीची तळमळ हीच माझ्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. बाकी त्याचा पूर्व इतिहास किंवा त्याची इतर गुणवत्ता ही गौणच आहे. किंबहुना, या गोष्टींना अर्थाअर्थी

काहीच महत्त्व नाही. कारण त्या गोष्टी त्याला त्याच्या प्रारब्धानुसार व ईश्वराच्या नियतीनुसार प्राप्त झालेल्या असतात आणि तशा तशा गोष्टी त्याच्या जीवनात घडलेल्या असतात इतकेच! त्या गोष्टींवरून कुणाचेही श्रेष्ठत्व वा कनिष्ठत्व ठरू शकत नाही. ईश्वरी ध्यासाने ईश्वराची प्राप्ती, म्हणजेच अंतःकरणात ईश्वराची अनुभूती अणि त्यातूनच घडणारी ईश्वराची अखंड व अभेद भक्ती यानेच सामान्यातील सामान्य जीवालाही खरे श्रेष्ठत्व प्राप्त होत असते. त्यातच मानवी जीवनाची सार्थकता व धन्यता आहे हेच सत्य आहे. ''

वसुदेवाशी बोलता बोलता सांदिपनी ऋषी एका क्षणात अंतर्मुख झाले आणि त्यांच्या विशुद्ध अंतःकरणातील स्वानुभवाचे सत्य त्यांच्या ओघवत्या वाणीतून शब्दरूप घेऊन त्यांच्याही नकळत साकार होऊ लागले. त्या वेळेस त्यांचे मुखही अत्यंत तेजोमय दिसू लागले. वसुदेवालाही क्षणभर काही कळेचना. तोही थोडासा भांबावल्यासारखाच झाला. परंतु कृष्ण मात्र एकदम गंभीर व भावपूर्ण झाला आणि सांदिपनींच्या जवळ येऊन त्याने त्यांच्या चरणांवर आपले मस्तक ठेवून त्यांना प्रणिपात केला. सांदिपनींनीही कौतुकाने कृष्णाच्या पाठीवर थोपटले अणि त्याच्या मस्तकावर प्रेमाने आपला हात फिरवला.

सांदिपनींच्या बोलण्याचा व घडलेल्या प्रसंगाचा निश्चित अर्थ जरी वसुदेवाला कळला नाही, तरी 'कृष्ण व बलराम यांचा स्वीकार सांदिपनी ऋषींनी केला आहे' एवढेच वसुदेवाच्या लक्षात आले. त्याच्या दृष्टीने तेच महत्त्वाचे होते आणि म्हणून त्याला त्याचाच आनंद झाला. वसुदेवाने पुढे होऊन पुन्हा सांदिपनींना नम्रभावे वंदन केले आणि परत जाण्याविषयी त्यांची अनुज्ञा मागितली. सांदिपनींनी वसुदेवाला निघण्यापूर्वी त्यांच्या गृहस्थाश्रमातील आदरातिथ्याचा स्वीकार करण्यास सांगितले. सांदिपनी ऋषींची पत्नी स्वतः आतून बाहेर आली आणि तिने वसुदेवाच्या समोर प्राशनासाठी जल व सेवनासाठी फलाहार ठेवला. सांदिपनींच्या आज्ञेचा मान ठेवून वसुदेवाने थोडासा फलाहार करून जलप्राशन केले आणि सांदिपनींना पुन्हा नमस्कार करून तो पर्णकुटीच्या बाहेर पडू लागला. तेवढ्यात वसुदेव पुन्हा एकदा मागे वळला आणि कृष्ण व बलराम यांच्या जवळ आला. वसुदेवाने कृष्ण व बलराम यांना अत्यंत प्रेमाने आपल्या पोटाशी धरले. वसुदेवाचे नेत्र अश्रूंनी भरून आले असता कृष्ण व बलराम यांचेही नेत्र पाणावले. त्यांनी वाकून वसुदेवाच्या पदांना स्पर्श केला आणि त्याला हात जोडून नमस्कार केला. कृष्ण व बलराम यांचा प्रेमाने निरोप घेऊन अत्यंत जड अंतःकरणाने वसुदेवाची पावले पर्णकुटीच्या बाहेर पडली. एकेक पाऊल सावकाशपणे टाकीत वसुदेव हळूहळू आपल्या रथाच्या दिशेने चालू लागला.

इकडे सांदिपनींनी कृष्ण व बलराम यांची ओळख आपल्या पत्नीला करून दिली आणि त्या उभयतांना आपल्या पत्नीच्या स्वाधीन केले. कृष्ण व बलराम यांनी सांदिपनींच्या पत्नीला वाकून नमस्कार केला असता त्या माऊलीचा वात्सल्यभाव दाटून आला. तिने त्या उभयतांना आपल्या कुशीतच घेतले आणि त्यांच्या मस्तकाचे अवघ्राण केले. आपल्या पत्नीच्या मनीची व्यथा सांदिपनी ऋषी जाणून होते. गेली अनेक वर्षे ती त्यांच्या पुत्राच्या वियोगाचे दुःख सहन करीत होती. अगदी लहान वयातच त्यांचा पुत्र नदीच्या प्रवाहात बुडून वाहून गेला होता आणि मृत्यूमुखी पडला होता. तेव्हापासूनचा साठून व दाटून राहिलेला सांदिपनींच्या पत्नीच्या ठायीचा वात्सल्यभाव, कृष्णाला पहाताक्षणीच आज अनेक वर्षांनंतर प्रथमच मोकळा झाला होता. त्याने जेवढे मोकळे व बरे तिला वाटले, तेवढेच मोकळे सांदिपनींनाही झाले. त्यांनीही आपल्या नेत्रांतील दाटलेल्या अश्रूंना मोकळेपणे वाहू दिले. ''

***

सांदिपनी ऋषींच्या आश्रमातील झालेल्या कृष्णाच्या आगमनाचे वर्णन करता करता अचानकपणे तो प्रसंग भावनिकतेकडे वळला आणि मग साहजिकच नारदही थोडासा भावपूर्ण झालाच. नारदाच्या नकळतच त्याचे बोलणे थांबले. नारदाची ही अवस्था लक्ष्मीला मात्र निश्चितच कळली आणि म्हणून तीही थोडावेळ काही न बोलता मुद्दामच स्वस्थ बसून राहिली. परंतु नारद लगेचच सावरला आणि भानावर आला. ते पाहून लक्ष्मीलाही बरे वाटले आणि नारद पुढे काही बोलण्याच्या आधी लक्ष्मीनेच बोलावयास सुरुवात केली.

''हे नारदा, 'कृष्णचरित्र म्हणजे भावपूर्णता' असेच मला जाणवते. कृष्णामुळे कितीतरी जणांच्या ठिकाणच्या प्रेमाच्या विविध भावना जाग्या झाल्या आणि ते भावनिक झाले. कितीतरी जणांच्या ठिकाणच्या प्रेमभावेनेचे रूपांतर प्रेमभावात झाले आणि ते सबळ झाले. कृष्णचरित्राचे हेच तर विशेषत्व आहे, नाही का? परंतु सांदिपनी ऋषींच्या पत्नीच्या ठिकाणी जागा झालेला वात्सल्यभाव मला विशेषच आनंदित करीत आहे. कारण शेवटी स्त्रीच्या ठिकाणी निसर्गतःच असलेला वात्सल्यभाव हेच स्त्रीचे विशेषत्व आहे ना? तेच तिचे बलस्थान आहे ना? पुत्रवियोगाच्या दुःखाने अंतःकरणात व्यथित असलेल्या बिचाऱ्या सांदिपनींच्या पत्नीच्या ठिकाणी, कृष्णभेटीत वात्सल्यभाव दाटून आल्यामुळे तिला किती मोकळे व बरे वाटले असेल याची कल्पना इतर कोणालाही करता येणे शक्यच नाही. एक स्त्री म्हणून केवळ मीच ते जाणू शकते. ''

लक्ष्मीच्या बोलण्यावर किंचितसे हसून नारद म्हणाला, ‘‘हे लक्ष्मी, तुझे म्हणणे खरे आहे, परंतु पूर्णपणे खरे नाही. वात्सल्यभाव हे प्रेमभावाचे एक विशेष व खास अंग आहे यात शंकाच नाही. परंतु तो भाव केवळ स्त्रियांच्याच ठिकाणी असतो, हे तुझे म्हणणे मात्र सर्वार्थाने विचार केला असता खरे नाही असेच तुझ्याही लक्षात येईल. संतती ही मातेच्या पोटी जन्माला येते. सुरुवातीला मातेच्याच दुधावर बालकांचे पोषण होत असते आणि मातेच्याच अंगाखांद्यावर व कुशीत त्या बालकांची वाढ होत असते. म्हणून मातेच्या ठिकाणचा वात्सल्यभाव प्रगट झालेला सर्वांच्या लक्षात येतो. मातेचे व बालकाचे अतूट असे नाते या वात्सल्यभावातूनच निर्माण होते हे अगदी खरेच आहे. परंतु त्या बालकाचे जन्मबीज हे पित्याकडून मातेच्या गर्भात रुजलेले असते, हेही सत्यच आहे. बालक हे त्या पित्याचाच अंश असते आणि मातेच्या उदरात वाढून मगच जन्माला येते. तेव्हा त्या गर्भाचे मूळ व त्याची जन्मापूर्वीची वाढ हे दोन्हीही त्या जन्माला आलेल्या बालकाच्या दृष्टीने सारखेच महत्त्वाचे असते. साहजिकच पित्याच्या ठिकाणीसुद्धा जन्माला आलेल्या व वाढणाऱ्या बालकाविषयी तोच वात्सल्यभाव असतो, जो मातेच्या ठिकाणी असतो. फक्त मातेचा वात्सल्यभाव तिच्या भावनात्मकतेमुळे लगेचच लक्षात येतो, तर पित्याचा वात्सल्यभाव लक्षात येण्यास वेळ लागतो. कारण सर्वसाधारणपणे वात्सल्यभाव हा विशिष्ट कृतीकडेच निर्देश करून ओळखला जातो. परंतु पित्याच्या ठिकाणी आपल्या अपत्याविषयी तोच आपलेपणा व तोच प्रेमभाव असतो, जो मातेच्या ठिकाणी असतो.

हे लक्ष्मी, तुला एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट सांगतो, की मातापित्यांच्या ठिकाणी असलेल्या वात्सल्यभावाप्रमाणेच गुरूंच्याही ठिकाणी आपल्या शिष्यांविषयी वात्सल्यभावच असतो आणि तोच भाव खरा श्रेष्ठ व बलवान असतो. कारण तो भाव सद्‌गुरूंच्या विशुद्ध व कोमल अंतःकरणाच्याठायी स्फुरून निर्माण झालेला असतो. मातेचा वात्सल्यभाव हा तिच्या पोटी जन्मलेल्या अपत्यांपुरता मर्यादित असतो. पण महात्म्यांच्या ठिकाणी असलेला वात्सल्यभाव हा सर्वच जीवांविषयी असतो. कारण सर्व जीव हे एकीएक त्या परमेश्वराचीच लेकरे आहेत असाच त्यांचा भाव असतो आणि तसाच अनुभवही ते नित्य त्यांच्या अंतःकरणात घेत असतात. पण असे काही जीव जेव्हा त्या महात्म्यांना शिष्यभावाने शरण येतात, तेव्हा त्यांच्या अंतःकरणातील वात्सल्यभाव त्या शिष्यांच्या निमित्ताने प्रगट होतो.

हे लक्ष्मी, एक गोष्ट तुझ्या लक्षात आली का? सांदिपनींच्या पत्नीच्या ठिकाणी कृष्णाच्या भेटीत जो वात्सल्यभाव जागृत झाला, तो तिच्या पुत्राच्या स्मरणाने झाला. म्हणजे खरे तर, कृष्णाच्या निमित्ताने तिच्या ठिकाणी प्रगटलेला वात्सल्यभाव हा तिच्या मृत्यू पावलेल्या पुत्रासाठी होता. पुत्राविषयीच्या गतस्मृतींनी तिचे मन पुन्हा भरून आले. त्यासाठी कृष्ण निमित्त झाला एवढेच! तिने बाह्यांगाने कृष्णाला जवळ केले खरे, परंतु तिच्या मनात मात्र तिच्या पुत्राचेच रूप होते. सांदिपनींच्या अंतःकरणाची अवस्था मात्र

वेगळीच होती. कृष्णाला पाहिल्यावर किंवा कृष्णाला जवळ केल्यावर त्यांच्याठायी निर्माण झालेला वात्सल्यभाव हा केवळ कृष्णाविषयीचा व फक्त कृष्णासाठीच होता.

हे लक्ष्मी, सत्पुरुषांच्याठायी निर्माण होणाऱ्या वात्सल्यभावाचे सर्वात महत्त्वाचे विशेषत्व म्हणजे तो भाव त्यांच्या अंतःकरणातील प्रेमस्वरूप अवस्थेतून स्फुरलेला असतो. त्यांच्या प्रेमस्वरूपाचे ते एक अंग असते. त्यामुळेच तो भाव केवढा तरी सबळ व सक्षम असतो. मातेच्या ठिकाणचा आपल्या बालकाविषयीचा वात्सल्यभाव हा केवळ भावनात्मकच आणि म्हणून दुर्बलच असतो. आपल्या अपत्याला सबळ करण्याची आणि त्याचे जीवन घडवण्याची क्षमता, त्या भावनात्मकतेमध्ये अभावानेच असते. परंतु सद्गुरू मात्र आपल्या शिष्याची पूर्ण जबाबदारी स्वीकारतात. आपल्या शिष्याला केवळ बौद्धिक ज्ञान किंवा उपासनेचा कर्ममार्गच न सांगता, त्याच्या ठिकाणी भक्तिभाव निर्माण करून, त्याच्या अंतःकरणाची पूर्ण शुद्धीही करतात आणि शिष्याच्या ठिकाणचे आत्मस्वरूप जागृत करतात. म्हणूनच सद्गुरूंच्या ठिकाणी असलेला शिष्याविषयीचा वात्सल्यभाव हा सर्वश्रेष्ठ आहे, कारण तो त्यांच्या ईश्वरी अनुभवाचे अंग आहे.

या नारायणाने त्याच्याठिकाणी निर्माण झालेल्या सृष्टीतील सर्व जीवांकडे ज्या वात्सल्यदृष्टीने पहावे ना, त्याच वात्सल्यदृष्टीने सद्गुरू आपल्या शिष्यांच्याकडे पहात असतात. कारण शिष्य म्हणून स्वीकार करून त्यांना जणू एक नवीन जन्मच सद्गुरूंनी दिलेला असतो. त्या शिष्यांना त्यांच्या खऱ्या अस्तित्वाची ओळख करून देऊन, त्याचा अनुभव घेण्यासाठीच हा नवीन जन्म लाभलेला असतो. या नवीन जन्मातच त्या शिष्यांचे जीवन कृतार्थ होते आणि म्हणूनच ते शिष्य आपल्या सद्गुरूंविषयी जीवनभर कृतज्ञ होऊन रहातात. ''

नारदाचे बोलणे ऐकताना थोडीशी अवाक् झालेली लक्ष्मी मग थोडेसे हसून नारदाला म्हणाली, ''अरे नारदा, तुझ्या स्वानुभवाच्या बोलण्यापुढे कोणाचीही अर्धवट समज वा बोलणे टिकूच शकत नाही, हेच खरे आहे आणि तेच बरे आहे ना! कारण त्यामुळेच अपुऱ्या ज्ञानाच्या व अपुऱ्या समजुतीच्या खुशीत रहाणाऱ्या माझ्यासारख्यांना जाग येते आणि जाणही येते. पूर्ण सत्य कळू शकण्याची शक्यताही त्याचमुळे निर्माण होते. आताचेच बघ ना! वात्सल्यभाव हा केवळ स्त्रियांच्याच ठिकाणी असतो अशी समजूत माझ्या ठिकाणी स्त्रीस्वभावानुसार झालेली होती. परंतु नारदा, तू मात्र तुझ्या स्वभावानुसार अत्यंत स्पष्टपणे बोलून माझ्या अज्ञानाला काही वावच ठेवला नाहीस आणि हेच तर तुझे माझ्यावरील मोठे उपकार आहेत. वात्सल्यभाव ही काही स्त्रियांचीच मक्तेदारी नसून, तसा भाव स्त्री व पुरुष या दोघांच्याही ठिकाणी असू शकतो, हे तुझे सांगणे योग्यच वाटते. अर्थात् हे तू काही केवळ पुरुष म्हणून बोलत नाहीस हेही खरेच आहे.

हे नारदा, परंतु महात्म्यांच्या ठिकाणी असलेला वात्सल्यभावच पूर्ण व म्हणूनच खरा असतो, हे जे तू सांगितलेस ते मात्र सत्य आहे. कारण त्या भावाचे मूळ त्यांच्या अंतःकरणातील ईश्वरी अनुभवामध्ये असते आणि त्याच ईश्वरी प्रेमदृष्टीने ते महात्मे सर्वच जीवांकडे पहात असतात. पण त्यांना शरण आलेल्या शिष्यांकरिताच तो ईश्वरी प्रेमाचा वात्सल्यभाव प्रगट होतो इतकेच. मुख्य म्हणजे त्या वात्सल्यभावामध्ये ईश्वरी अनुभव आणून देण्याचा संकल्प व सामर्थ्य असते हे महत्त्वाचे. होय ना?

हे नारदा, परंतु मला एक गोष्टीचे जरा नवल वाटत आहे आणि त्याचे नीट आकलनही होत नाही म्हणून मी तुला विचारते. सांदिपनी ऋषींच्या ठिकाणी कृष्णाच्या अत्यंत पराक्रमी अशा पूर्वचरित्राविषयी जराही उत्सुकता किंवा आस्थाही कशी काय नव्हती? कृष्ण हा नारायणाचा अवतार आहे हे सांदिपनींनाही निश्चितच विदित असणार. नाही म्हटले तरी कृष्णाचे इतरांपेक्षा वेगळेपण हे होतेच ना! मग तसा विचार सांदिपनींच्या ठिकाणी मुळीच आला नाही का? नारदा, माझ्या मनातील या विचारांचा गुंता होण्याच्या आधीच तू मला त्यातून मोकळे कर बघू. नाहीतर मग माझ्या मनाचे श्रवणाकडे पूर्ण लक्ष लागायचेच नाही. ''

लक्ष्मीच्या बोलण्यावर नारदाने कौतुकाने मान डोलावली आणि तो म्हणाला, ''हे लक्ष्मी, तुझा प्रश्न हा योग्यच आहे. कोणाच्याही मनात असा प्रश्न निर्माण होणे अगदी साहजिकच आहे. कारण सर्वसामान्यांच्या दृष्टीने विचार केला तर कृष्णाचे चरित्र हे त्यांच्यासाठी सर्वश्रेष्ठच होते आणि ते तसे होतेही, यात जराही शंका नाही. परंतु त्या चरित्राच्या मुळाशी असलेले परमात्मतत्त्व मात्र एकीएकच आहे. त्यामुळे त्या तत्त्वाच्या ठायी श्रेष्ठ वा कनिष्ठ असा भेद संभवतच नाही. कारण परमात्मतत्त्व हे मूलतः अभेदच आहे आणि त्या परमात्म्याशी ऐक्य पावणे हाच अनुभव सर्वश्रेष्ठ आहे. सांदिपनी आत्मस्वरूपाच्या स्वानुभवाने परमात्म्याशी ऐक्य पावलेले होते आणि त्या सर्वश्रेष्ठ अवस्थेचा अनुभव घेत होते.

हे लक्ष्मी, 'अवतरणे म्हणजे खाली उतरणे' या शब्दाच्या साध्या सरलार्थाने जर आपण पाहिले, तर सर्वच जीव जे नारायणाचेच अंश आहेत, ते या सृष्टीत अवतीर्णच झालेले आहेत. परंतु अज्ञानामुळे त्या जीवांना त्याची जाणीव नाही एवढेच. त्यामुळे तत्त्वतः ते जीव नारायणाचे अंश आहेत, परंतु अनुभवाने मात्र नाहीत. त्यामुळेच त्या सामान्य जीवांकडून ईश्वरी कार्य घडू शकत नाही. मात्र जेव्हा त्यापैकी काही जीवांच्या ठिकाणी 'आपण ईश्वराचे अंश आहोत' अशी जाणीव निर्माण होते आणि तसा ते अनुभवही घेतात, तेव्हा ते जीव सामान्य रहातच नाहीत. ईश्वरी अनुभवाने सहजपणे जगले जाणारे त्यांचे जीवन हेही मग ईश्वरी कार्याचेच एक अंग होऊन रहाते. या कार्यात बाह्यांगाने जरी

भिन्नत्व दिसले व तसे ते असलेही, तरी त्यातील तत्त्व हे एकीएकच व म्हणूनच अभेद असते. त्याच दृष्टीने पाहिले तर सांदिपनी व कृष्ण यांचे कार्य बाह्यांगाने वेगळे असले तरी त्याठायीचे ईश्वरी अधिष्ठान हे एकीएकच होते. म्हणूनच त्यांच्याकडून ईश्वराचेच कार्य घडत होते. त्याची तुलनाच होऊ शकत नसल्यामुळे तेथे श्रेष्ठ वा कनिष्ठ असा प्रश्नच संभवत नाही. ते उभयता आपापल्या अनुभवाने व भावाने युक्त होते.

हे लक्ष्मी, सांदिपनींच्या चरणांशी अनेकजण शिष्य म्हणून शरण आलेले होते. त्यापैकी प्रत्येकाचे पूर्वजीवन व संस्कार अगदी वेगळे वेगळे होते. परंतु सांदिपनींनी कृपावंत होऊन त्या सर्वांवरती ईश्वरी अनुभवाचा ध्यास लागण्यासाठी बीजमंत्राचा संस्कार विधियुक्त केला होता आणि त्यांना शिष्यत्व दिले होते. त्या शिष्यांच्यासाठी तो संस्कार म्हणजे त्यांचा नवीन व खरा जन्मच होता. सद्गुरूंच्या सेवेने व भक्तीने आत्मानुभवाचे फळ प्राप्त करून घेऊन आध्यात्मिक जीवन जगण्याची आणि स्वानंदाचा अनुभव घेण्याची ती सुरुवात होती. या नवीन जन्मामध्ये त्यांच्या पूर्वायुष्याला काहीच महत्त्व वा किंमत नव्हती. आपल्या सर्व शिष्यांकडे सांदिपनी सहजतेने सारख्याच वात्सल्याने व स्नेहल दृष्टीने पहात असत. सर्व शिष्यांविषयी सांदिपनींच्याठायी एकच समभाव होता. त्यामध्ये श्रेष्ठ वा कनिष्ठ असा दुजाभाव उद्भवूच शकत नव्हता. अर्थात् सांदिपनी सर्व शिष्यांचे वेगळेपण जाणून होते. तसेच कृष्णाचेही वेगळेपण सांदिपनींच्या लक्षात आलेच. परंतु त्या वेगळेपणाला त्यांनी विशेष महत्त्व न देता, ते वेगळेपण म्हणजे विशेषत्व मानले नाही. हे सांदिपनी ऋषींचेच वेगळेपण व विशेषत्व म्हणावे लागेल. त्यांच्या दृष्टीने शिष्यांच्या भूतकाळापेक्षा त्यांचा भविष्यकाळ हा महत्त्वाचा होता आणि त्यासाठी वर्तमानकाळ हाच खरा होता. कारण वर्तमान हीच वस्तुस्थिती असते.

हे लक्ष्मी, कृष्णाचे सर्वच पूर्वचरित्र अतिशय अद्भूतच होते, यात जराही संदेहच नाही. त्याच्या ठिकाणच्या आत्मशक्तीचाच तो पूर्ण आविष्कार होता हे तर सत्यच आहे. परंतु तरीही कृष्णाला मात्र आपल्या आत्मशक्तीची पूर्ण जाणीव असूनही 'आपल्याकडून आत्मभक्ती घडलेलीच नाही' हा आत्मस्वरूपाच्या दृष्टीने असलेला अपुरेपणा जाणवला. त्यासाठी आत्मानुभवी अशा महात्म्यांचीच भक्ती घडणे आवश्यक आहे हेही कृष्ण जाणून होता. म्हणूनच सांदिपनींच्या चरणी अनन्य भावाने कृष्ण शरण आला होता. सांदिपनींच्या वागण्या-बोलण्यातून प्रगटणारी त्यांच्याठायीची निर्मोही, निरपेक्ष व निःस्पृह अवस्था कृष्णाच्या लक्षात आली. सांदिपनींचे माहात्म्य कृष्णाने पूर्णपणे ओळखले आणि तो सांदिपनींच्या चरणी नतमस्तकच झाला. ''

नारदाच्या बोलण्याने लक्ष्मी एवढी प्रभावित झाली की तिने नारदाला हात जोडून वंदनच केले आणि सहजपणे उद्गारली, ''हे नारदा, तुझी खरोखरीच धन्य आहे. या

नारायणाचे प्रेम, त्याची भक्ती आणि त्याचे यथार्थ ज्ञान याचा जो सुरेख संगम तुझ्याठायी झालेला आहे, तो तर अवर्णनीयच आहे. परंतु त्याच्यामुळेच तू या नारायणाचे माहात्म्य सर्वांगाने व सुयोग्यपणे वर्णन करू शकतोस हे सत्य मात्र मी पूर्णपणे जाणून आहे. म्हणूनच तू सांदिपनी व कृष्ण यांच्या अलौकिक नातेसंबंधाचा मूलभूत पाया व गाभा अगदी यथार्थपणे प्रगट करू शकलास. त्यामुळेच माझ्याठायी कुठल्याही संदिग्धतेला आता वावच उरलेला नाही. माझे मन पूर्णपणे मोकळे होऊन नारायणाच्या सगुण प्रेमाने पुन्हा भरून राहिलेले आहे आणि त्यामुळेच कृष्णचरित्राचे श्रवण करण्यासाठी अत्यंत आतुरही होऊन राहिलेले आहे. तेव्हा सांदिपनी ऋषी व कृष्ण यांच्या संबंधात प्रत्यक्ष काय घडले आणि या नारायणाची सगुण लीला कशी प्रगट झाली, हे मला आता तू त्वरित सांगण्याचे करावेस अशी विनंतीच मी तुला करते. ''

नारायणाच्या सगुण प्रेमकथांचे भक्तिभावाने गायन करण्यास नित्य आतुरच असलेल्या नारदाला लक्ष्मीची विनंती ही तर एक पर्वणीच होती. केवळ निमित्तालाच टेकलेल्या नारदाला तर एक चांगलेच कारण मिळाले आणि मग नारदाची रसवंती वाणी स्त्रवूच लागली.

''हे लक्ष्मी, कृष्णचरित्रातील या प्रसंगाला तू 'नारायणाची लीला' म्हणून संबोधलेस ते अगदी योग्यच आहे. कारण या प्रसंगात केवळ कृष्णाचेच माहात्म्य प्रगट होत नव्हते, तर त्यामध्ये सांदिपनींची थोरवीही तेवढ्याच प्रकर्षाने प्रगट होत होती. म्हणूनच 'सांदिपनी व कृष्ण यांच्या रूपाने एकीएक या नारायणाचीच सगुण लीला प्रगट होत होती' हे म्हणणे यथार्थच आहे. कारण सगुण असल्यामुळे त्यांच्यात रूप, गुण व स्वभाव यांचे भिन्नत्व होते आणि तरीही त्यांच्या ठिकाणी निर्गुण स्वरूपाचे अभेदत्व होते. असे सगुण व निर्गुण दोन्ही मिळूनच तर या नारायणाचे अस्तित्व आहे. असो.

हे लक्ष्मी, सांदिपनींच्या सांगण्यानुसार त्यांच्या पत्नीने कृष्ण व बलराम यांच्या रहाण्याची व्यवस्था आश्रमातील इतर शिष्यांबरोबरच केली. आश्रमाच्या विस्तीर्ण व रम्य परिसरात शिष्यांसाठी छोट्या छोट्या पर्णकुट्या बांधलेल्या होत्या. एकेका पर्णकुटीत तीन किंवा चार शिष्य रहात असत. अशाच एका पर्णकुटीत कृष्ण व बलराम यांचे एकत्रित वास्तव्य सुरू झाले. त्याच पर्णकुटीत त्यांच्याबरोबर आणखीन एकजण रहात होता. त्याचे नाव 'सुदामा' होते. वयाने कृष्णापेक्षा थोडासा मोठा असूनही कृश व काटकुळा असल्यामुळे तो दिसायला जरा लहानसरच दिसत असे. सुदाम्याने कृष्ण व बलराम यांचे आपलेपणाने स्वागत करून त्यांची सर्व चौकशीही केली. परिचय झाल्यावर आणि कृष्ण व बलराम हे राजपुत्र आहेत हे कळल्यावर सुदाम्याच्या ठिकाणी आधी थोडासा संकोचच निर्माण झाला. परंतु कृष्णाच्या हसून बोलण्याने व मोकळेपणाच्या वागण्याने सुदाम्याचेही

मन मोकळे झाले आणि त्याचा चेहराही फुलला. कृष्णाशी गट्टी जमायला मग सुदाम्याला जराही वेळ लागला नाही. त्याचाही मूळ स्वभाव थोडासा गमतीशीर असल्यामुळे कृष्णाचा सहवास त्याला अतिशय प्रिय झाला.

बलरामचे बलदंड शरीर पाहून दुर्बल व अशक्त असलेला सुदामा आधी जरा घाबरलाच होता. परंतु सहवासाने सुदाम्याचा तोही गैरसमज दूर झाला. बलरामाच्या वागण्या-बोलण्यातील फटकळपणासारखा वाटणारा स्पष्टपणा आणि दिलखुलासपणा जेव्हा सुदाम्याच्या लक्षात आला, तेव्हा सुदाम्याच्या मनावरील ताण व भीती दूर झाली. एवढेच नव्हे, तर सुदाम्याला मग बलरामाचा मोठा आधारच जाणवू लागला. परंतु कृष्णाविषयीचे आकर्षण मात्र सुदाम्याच्या ठिकाणी विशेषत्वाने राहिले. एवढेच नव्हे, तर ते वाढतच राहिले. कृष्णाठायी असलेल्या आपलेपणातील वेगळेपण सुदाम्याला जाणवले आणि त्याच्या मनाला ते अत्यंत भावलेही. कृष्णाकडे सतत पहात रहावे, कृष्णाचे मोकळे हास्य स्वीकारण्यास नेहमी आतुर असावे आणि नेहमी कृष्णाच्या बरोबरच वावरावे असेच सुदाम्याला नित्य वाटत असे. तोच ध्यास सुदाम्याला लागला आणि तोच छंद त्याच्या मनाला जडला. सुदाम्याचा हा कृष्णाविषयीचा भाव कृष्णाच्याही लक्षात आला होता आणि कृष्णालाही त्याचा आनंदच होत असे. परंतु कृष्णाचे सर्व व्यवधान होते ते मात्र एकीएक सांदिपनी ऋषींच्याकडेच!

*****

# कृष्णाची सद्‌गुरूभक्ती

हे लक्ष्मी, आश्रमातील सकाळपासूनचा नित्यक्रम सुदाम्याने आपणहूनच जरी कृष्णाला सांगितला, तरी कृष्णाने मात्र आपली दिनचर्या स्वतःच ठरवली आणि ती दिनचर्या ठरवताना कृष्णाच्या दृष्टीसमोर फक्त सांदिपनींचेच जीवन होते. कारण तेच कृष्णासाठी प्रमाण होते. हेच तर शिष्यभावाचे मुख्य लक्षण आहे. कारण सद्‌गुरूंच्या मुखातून नित्य श्रवण करून शिष्याला ते ज्ञान शब्दाने कळेल, अगदी त्याचे ते तोंडपाठही होईल, एवढेच नव्हे, तर एखादा शिष्य ते ज्ञान घडाघडा बोलूनही दाखवेल, परंतु त्याच्या अंतःकरणाचा घडा मात्र रिकामाच राहील. केवळ बाह्य पठणाने किंवा बाह्य साधनाने त्या शब्दज्ञानाचे रूपांतर अनुभवात कधी होणारच नाही. तसे ते होऊच शकत नाही, कारण अनुभवाची अवस्था ही सद्‌गुरूंच्या अंतःकरणातच असते. तेच त्या अनुभवाचे मूलस्थान आहे आणि तेथेच तो अनुभव नित्य स्फुरत असतो. त्या अनुभवाचा काही थोडाच अंश त्यांच्या वाणीतून शब्दावाटे प्रगट होतो. परंतु अज्ञानामुळे शिष्यांना वाटते की सद्‌गुरूंचा सर्व अनुभवच प्रगट झाला आणि म्हणून ते शिष्य त्या शब्दज्ञानाचाच अभ्यास करीत बसतात. पण त्यातून स्वतः अनुभव घेण्याचा ध्यास न लागल्यामुळे त्याची परिणती केवळ शब्दज्ञानाचा अहंकार निर्माण होण्यामध्येच होते आणि स्वानुभवाकडे जाण्याचा मार्गच बंद होतो.

हे लक्ष्मी, अशा शिष्यांमधूनच एखादा सत्‌शिष्य निर्माण होतो, की ज्याच्या लक्षात सद्‌गुरूंच्या अंतःकरणाची अवस्था येते. मग त्याच्या दृष्टीसमोर आपल्या सद्‌गुरूंचे अंतःकरण हे एकच लक्ष्य उरते. सद्‌गुरू मुखातून प्रगटणारे शब्दज्ञान त्या सत्‌शिष्याकडून श्रवण केले जातेच, परंतु त्यामध्ये अडकून न रहाता तो सत्‌शिष्य त्या ज्ञानाचा उपयोग त्याच्या बुद्धीच्याठायी सत्स्वरूप ईश्वराच्या अस्तित्वाचा निश्चय करण्यासाठी करतो. सत्‌शिष्य हेही जाणून असतो की जरी बुद्धीचा निश्चय झाला, तरी ईश्वराच्या अस्तित्वाचा स्वानुभव होण्यासाठी मनामध्ये सद्‌भाव निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे आणि असा सद्‌भाव केवळ सद्‌गुरूंच्या सहवासाने व त्यांच्या सेवेनेच होऊ शकतो. म्हणूनच सद्‌गुरूंशी नित्य जवळीक साधण्यासाठी सत्‌शिष्य आपले सर्व जीवनच सद्‌गुरूंसाठी नित्य उपलब्ध करून ठेवतो. त्याचे वेगळे असे जीवन बाह्यांगानेही रहातच नाही. सद्‌गुरूंच्या बाह्य जीवनानुसारच सत्‌शिष्याचेही बाह्य जीवन ठरत रहाते. तेथे मग त्या सत्‌शिष्याच्या दृष्टीने काही वेगळा विचार वा जीवनाचा दुसरा काही हेतू रहातच नाही. मुख्य म्हणजे

सत्‌शिष्याचा हा भाव सद्‌गुरूही ओळखतात आणि त्यांना तो प्रियही होतो. म्हणूनच कृपावंत होऊन तेही अशा सत्‌शिष्याला आपली जवळीक देऊ करतात.

हे लक्ष्मी, कृष्णाच्या ठिकाणी असा सत्‌शिष्यभाव अगदी प्रथमपासूनच व सहजपणे होता, हेच तर कृष्णाचे वेगळेपण व विशेषत्व होते. त्यामुळेच भल्या पहाटेच कृष्ण जागा होई आणि आपले सर्व आन्हिक कर्म अगदी घाईघाईने उरकूनच घेई. किंबहुना 'सांदिपनींविषयीच्या नित्य व्यवधानातच असल्यामुळे कृष्ण रात्रभर झोप न घेता जागाच राहून फक्त विश्रांती घेतच पहुडलेला असे' असेच म्हणावे लागेल. स्वतःच्या देहानुषंगिक कर्मामध्ये जराही न रमता वा न रेंगाळता, कृष्ण त्वरेने सांदिपनींच्या आश्रमाबाहेर त्यांची प्रातःकर्मे सुरू होण्याच्या आधीच हजर होऊन त्यांची प्रतीक्षा करीत उभा राही. सांदिपनी आश्रमाबाहेर येताच कृष्ण पुढे होऊन त्यांना वाकून नमस्कार करी आणि आपले दोन्ही हात जोडून त्यांचे दर्शन घेई. नंतर प्रेमाने सांदिपनींचा हात धरून त्यांना आश्रमाबाहेर येण्यास कृष्ण साहाय्यभूत होई. त्यानंतर कृष्ण लगबगीने आश्रमाच्या आतील भागात जाऊन सांदिपनींसाठी पात्रातून गरम पाणी घेऊन येई. कृष्ण स्वतः सांदिपनींच्या हातावर पाणी घाली आणि त्यांचे मुखप्रक्षालन झाल्यावर आपल्या हातातील धूतवस्त्र सांदिपनींना देऊ करी. एवढेच नव्हे, तर स्वतः त्या वस्त्राने सांदिपनींचे चरण पुसत असे आणि त्यांच्या खडावा त्यांच्या पायात हळुवारपणे घालीत असे.

हे लक्ष्मी, त्यानंतर सांदिपनी क्षिप्रा नदीवरती स्नानास जाण्यास निघत तेव्हा कृष्णही त्यांचा कमंडलू व त्यांची वस्त्रे हातात धरून त्यांच्याबरोबर निघत असे. वाटेत चालताना क्वचित काही अडथळे येत, तेव्हा कृष्ण त्वरेने पुढे होऊन सांदिपनींचा हात धरी आणि तो अडथळा पार करण्यासाठी सहाय्य करी. सांदिपनी मग प्रेमाने हसून कृष्णाचा हात तसाच धरून ठेवीत आणि कृष्णासह नदीच्या दिशेने चालत रहात. सांदिपनींचे स्नान होईपर्यंत कृष्ण काठावरतीच उभा राही. सांदिपनींचे स्नान होऊन ते बाहेर आल्यावर कृष्ण त्यांना त्यांची धूत वस्त्रे देत असे आणि त्यांचे ओले वस्त्र लगेचच तेथल्या तेथेच धुवून घेत असे. त्यानंतर सांदिपनी त्या नदीच्या काठावरतीच बसून, नेत्र मिटून ध्यानधारणा करीत आणि आत्मानंदात रममाण होत. त्या वेळेस कृष्ण मात्र आपल्या सद्‌गुरूंच्या त्या तेजस्वी मूर्तीकडे अनिमिष नेत्रांनी व भक्तिभावाने अगदी एकटक बघत राही. त्याला वेगळे काही साधन करावे वा कशाचे ध्यान धरावे अशी आवश्यकताच जाणवत नसे.

हे लक्ष्मी, सत्‌शिष्याच्या ठिकाणी असलेल्या आपल्या सद्‌गुरूंविषयीच्या भक्तिभावाचेच ते सुलक्षण आहे. सत्‌शिष्यासाठी सद्‌गुरूंचे अंतःकरण हेच साध्य असते आणि सद्‌गुरूंचे जीवन हेच त्याच्यासाठी साधन असते. या साध्य व साधन यांच्या ऐक्यातूनच सद्‌गुरूंचे स्वरूप व रूप यांची त्यांच्याठायी असलेली ऐक्यता सत्‌शिष्याला

अनुभवता येते. मग तसा अनुभव घेता घेताच तो सत्‌शिष्य आपल्या सद्‌गुरूंचा सद्‌भक्तच होऊन रहातो आणि एक दिवस रूप व स्वरूप यांचे ते ऐक्य त्या सद्‌भक्ताच्याही स्वानुभवाचे होऊन रहाते. अशा सद्‌भक्तांकडूनच सद्‌धर्माचे पालन घडते. त्यामुळेच सद्‌धर्माचे बाह्यांगाने रक्षण घडते आणि सद्‌धर्म सहजपणे प्रगट होतो. असो.

हे लक्ष्मी, सांदिपनींच्याबरोबर आश्रमात परत आल्यावर कृष्ण स्वतःच्या हाताने आश्रमातील गायीचे दूध एका कासंडीमध्ये काढीत असे. कृष्णाच्या केवळ प्रेमळ स्पर्शानेच त्या गायीला वात्सल्यभावाचा केवढातरी पान्हा फुटत असे आणि दुधाच्या धारांनी कासंडी क्षणात् भरून वाहू लागे. ते धारोष्ण दूध एका पात्रातून स्वतः नेऊन, कृष्ण सांदिपनींना प्रेमाने अर्पण करीत असे. दुग्ध प्राशनाने व कृष्णाच्या सेवाभावाने तृप्त झालेल्या सांदिपनींच्या प्रसन्न मुद्रेवरील कृष्णाच्या कौतुकाचे भाव ओसंडून वाहू लागत व ते कृष्णाकडे प्रेमळ नजरेने व हसून पहात. सांदिपनी कधी कधी आपल्या पात्रातील दूध प्रेमाने कृष्णाला देत असत. कृष्णही सांदिपनींचा प्रसाद म्हणून त्या दुधाचा स्वीकार करी आणि ते दूध सेवन करून स्वतःला धन्य समजत असे. काही वेळा तेच सांदिपनी कृष्णाला त्यांच्या पत्नीकडे पाठवून तिच्याकडून दूध मागून घेण्यास सांगत असत. परंतु सांदिपनींच्या या बाह्यांगाने वेगळ्या दिसणाऱ्या कृतींमधील एकच असलेले प्रेम कृष्णालाच जाणवत असे आणि तशी तशी कृती करून कृष्ण सांदिपनींच्या प्रेमाचा अनुभव घेत असे. कृष्णाच्या या भक्तिभावाने सांदिपनी आनंदित होत असत. मग त्यापेक्षा वेगळा आनंद कृष्णाचा तरी काय व कसा असणार?

हे लक्ष्मी, त्यानंतर ब्रह्मज्ञ असे सांदिपनी कृष्णासह आश्रमातील यज्ञशाळेत जात असत. तेथे इतर शिष्य आधीच येऊन उपस्थित झालेले असत. सांदिपनींच्या अधिपत्याखाली मग यज्ञविधीला सुरुवात होई. सुरुवातीला सांदिपनींसह सर्व शिष्य अग्निदेवतेला प्रार्थना करून आवाहन करीत.

‘‘हे अग्निनारायणा, आता आम्ही तुझे यजन व पूजन करीत आहोत. तरी तू आमच्यावर प्रसन्न होऊन आज येथे प्रगट हो. आम्ही तुला अनन्य भावाने शरण आलो आहोत!

हे अग्निदेवा, ब्रह्मापासून सृष्टीरूपाने पंचमहाभूते निर्माण झाली. नव्हे, ब्रह्मच त्या पंचमहाभूतांच्या रूपाने प्रगट झाले. त्या पंचमहाभूतांमध्ये तेजोमय व प्रकाशमय असे तुझे रूप आहे. तूच प्रत्यक्ष ब्रह्म आहेस. तू आमच्यावर प्रसन्न हो व आमचे रक्षण कर!

हे प्रभो, तूच सूर्य व चंद्र यांच्या रूपाने प्रगट आहेस. समुद्राचे पाणी शोषण करून, मेघांच्या रूपाने ते तू या पृथ्वीवर वर्षाव करतोस व सर्व प्रजेला जल व धान्य यांची समृद्धी करून त्यांचे धारण पोषण करतोस, तसे तू आमचेही धारण पोषण कर!

हे अग्निरूपा परमेश्वरा, तू तेजोमय आहेस. आम्ही गायत्री मंत्राने तुझ्याच तेजाचे ध्यान करतो. तू आम्हालाही तुझ्या तेजाने युक्त कर. म्हणजे त्यामुळे आम्ही या संसारात निर्माण होणाऱ्या सर्व संकटातून पार पडून जाऊ व तुझ्या चरणापाशी येऊ. तू प्रकाशमय आहेस. त्यामुळे सर्व अंधकाराचा नाश करतोस, तसाच आमच्या ठिकाणी असलेल्या अज्ञानाचा नाश कर!

हे सद्गुरूस्वरूपा, आम्ही तुला शरण आहोत. आपल्या ज्ञानोपदेशाने आमच्या जीवदशेचा अहंकार व वासना साफ नाहीशा कर. कारण त्याच्यामुळेच आम्ही आत्मस्वरूपाला विसरून या जीवदशेला प्राप्त झालो आहोत. आहुतीच्याद्वारा आमचे कामक्रोधादी विकार तुला आम्ही निवेदन करीत आहोत, त्यांना तू पूर्णपणे जाळून टाक. आमचा आता तूच उद्धार कर व तुझ्या सत्य, ज्ञान व आनंद यांनी युक्त असलेल्या स्वरूपाला ने!

हे ब्रह्मस्वरूपा, तूच या सर्व विश्वाने नटला आहेस. मग आम्ही तुझ्यापासून खरोखर निराळे नाही. तरीपण तुझ्या भक्तीमुळे अंतःकरण भरून आल्यामुळे व तुझे माहात्म्य कळल्यामुळे आज आम्ही तुझे यजन करीत आहोत. वस्तुतः तूच ते आमच्याकडून करवून घेत आहेस. कारण कर्तृत्वाचा अभिमान बाळगण्यासारखे आमच्याकडे काही नाही. आम्हाला स्वतंत्र अस्तित्वच नाही. इतकेही करून या यजनात काही न्यून राहिले तर आम्हाला क्षमा करून तू ते पुरे करून घे!

हे आत्मदेवा, आमच्या शरीरात तुझे वास्तव्य आहे. तूच तुझ्या चैतन्यशक्तीने देहाकडून सर्व कर्मे करवितोस. आम्हाला सर्व आधिव्याधींपासून व पापांपासून मुक्त कर. तुला आमचे सहस्त्रशः प्रणाम आहेत. आम्ही तुला पुन्हा पुन्हा शरण येतो. तू आमच्यावर प्रसन्न हो. देहात प्राण आहे तोपर्यंत आम्ही तन, मन, धनाने तुझीच सेवा करू व कृतार्थ होऊ आणि देहपाताबरोबर तुझ्या स्वरूपात विलीन होऊ!

हरी ओम् तत् सत्! ''

या अग्निस्तुतीनंतर यज्ञकुंडाची पूजा करून अग्नी प्रज्वलित केला जाई आणि अग्नीला हविर्भाग सेवन करण्याची विनंती केली जाई. सर्वात प्रथम सूर्यनारायण, नंतर नवग्रह व विविध देवतांचे मंत्र आणि मृत्युंजय मंत्र म्हणून 'स्वाहा' अशा शब्दोच्चारासह चरू, तूप, चंदन, अनेक वृक्षांच्या समिधा, इत्यादी द्रव्यांच्या आहुत्या अग्नीमध्ये अर्पण

करण्यात येत असत. प्रत्येक मंत्र एकशे आठ वेळा म्हणताना सुरुवातीला ‘ओम्’ हा शब्द आणि अंतिम ‘स्वाहा’ हा शब्द विशेषत्वाने उच्चारला जाई. त्यामुळे त्या शब्दांचे नाद व निनादही विशेषत्वाने त्या यज्ञशाळेत घुमत असत. सर्वात शेवटी सांदिपनींसह सर्व शिष्य उभे रहात. त्यांच्या उजव्या हाताला कृष्ण व डाव्या हाताला बलराम उभा असे. परस्परांचे हात हातात घेऊन सांदिपनींसह सर्व शिष्य यज्ञकुंडाभोवती कडे करून उभे रहात आणि उच्चरवाने ‘त्राही सकल गुरूकुला। रक्ष, रक्ष, रक्ष स्वकुलनंदना। हरी ओम् तत् सत्।’ असे त्रिवार म्हणून सर्व द्रव्यांची पूर्णाहुती अग्नीमध्ये अर्पण करीत. विशेषत्वाने प्रज्वलित झालेल्या अग्निदेवतेला वंदन करून सर्वजण, ‘आपण केलेल्या यज्ञाला अग्निदेवतेने स्वीकारले’ याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करीत. त्यानंतर सर्व शिष्य सांदिपनींचे पूज्यभावाने दर्शन घेऊन त्यांचे आशीर्वाद घेत आणि महाप्रसादाचे सेवन करण्यासाठी भोजनशाळेकडे जाणे करीत.

एक दिवस यज्ञविधीला सुरुवात होण्याआधी कृष्णाने सांदिपनींना नम्रतापूर्वक वंदन केले आणि त्यांची अनुमती घेऊन बोलण्यास सुरुवात केली.

‘‘हे गुरूवर्य, आपण स्वतः नित्य ब्रह्मोपासना करीत असता. पण त्यामध्ये आपण आम्हालाही बाह्यांगाने सहभागी करून घेता ही तर आपली आम्हावरील कृपाच आहे. कारण त्यामुळेच आम्हीही ब्रह्मकर्म करण्यास प्रवृत्त होतो. खरे तर, ब्रह्मस्वरूपाचा अनुभव हा सर्वस्वी तुमचाच आहे. आम्ही शिष्यगण त्या ब्रह्माला तर जाणूही शकत नाही. ‘ब्रह्मस्वरूप हे मनाच्या कल्पनेने वा बुद्धीच्या ज्ञानाने कधीही जाणता येणार नाही, तर त्याचा अनुभव हा केवळ अंतःकरणातच घेणे शक्य आहे’ हे आपले वचन तर त्रिवार सत्यच आहे. परंतु आमच्या अंतःकरणाची अशी स्वानुभवाची अवस्था अजून झालेली नाही. तरीही आम्हाला आपल्या अंतःकरणाची अवस्था मात्र निश्चितपणे जाणवत असते. आमच्यासाठी तर आपणच ‘ब्रह्मस्वरूप’ आहात अशीच आमची दृढ श्रद्धा आहे. आपल्या रूपाने साक्षात् ते ब्रह्मच साकार झालेले आहे असाच आमचा भाव आहे. त्यामुळे आपले पूजन हेच आमचे ‘ब्रह्मपूजन’ आहे आणि आपल्यासाठी सर्व समर्पण हाच आमचा ‘ब्रह्मयज्ञ’ आहे.

हे गुरूवर्य, ब्रह्मस्वरूपाचा नित्य अनुभव घेत असतानाही आपण केवळ कृतज्ञभावानेच बाह्यांगाने ही प्रतीकात्मक यज्ञयागादी कर्मे करीत असता आणि त्यामध्ये आम्हाला सहभागी करून, आम्हालाही ब्रह्मस्वरूपाचा अनुभव घेण्यासाठी उद्युक्त करीत असता. पण आमच्या ठिकाणी केवळ आपल्याविषयीचाच कृतज्ञभाव आहे. आमचा तो कृतज्ञभावही व्यक्त करण्याची संधी आपण आम्हाला द्यावी एवढीच विनंती आम्हाला आपल्या चरणांशी करायची आहे. यज्ञविधीमध्ये आपण जशा अनेक ग्रहांच्या व

देवतांच्यासाठी मंत्र म्हणून आहुत्या देतो, त्याचप्रमाणे आपले माहात्म्य ज्यामध्ये यथार्थपणे वर्णन केलेले आहे, अशा 'गुरूमंत्रा'च्याही आहुत्या या यज्ञामध्ये आपल्याविषयीच्या कृतज्ञभावाने द्याव्यात, असे आम्हाला अंतःकरणपूर्वक वाटत आहे. त्याचप्रमाणे ब्रह्मतेजाने युक्त असलेल्या आपले पूजन व स्तवन हे यज्ञविधीला सुरुवात करण्याच्या अगोदर करावे आणि मगच आपल्या आशीर्वादाने आम्ही यज्ञकर्माला सुरुवात करावी, असाच भाव आमच्या मनोमनी आहे. आमच्या या भावाची पूर्ती करण्याची अनुमती आपण आम्हाला द्यावी अशीच आपल्या चरणी विनम्र प्रार्थना! ''

कृष्णाचे बोलणे थांबले मात्र, त्या ठिकाणी एकच शांतता पसरून राहिली. कृष्णाच्या बोलण्यातील विनम्र भाव जेवढा सर्वांना जाणवला तेवढीच त्याच्या विचारातील स्पष्टता व निश्चयात्मकताही सर्वांच्याच लक्षात आली. सर्व शिष्यगणांच्या मनात कृष्णाविषयी वेगळे वेगळे विचार आले. कोणाला कृष्णाच्या बोलण्याचे कौतुक वाटले, कारण त्यांना कृष्णाकडून संदिपनींविषयीचा प्रगटलेला अत्यंत पूज्यभाव जाणवला. कोणाला कृष्णाने जणू त्यांच्याच मनातील सांदिपनींविषयीचा श्रद्धाभाव प्रगट केला असे जाणवले आणि त्यांनी संमतीदर्शक मान डोलवली, तर कोणाला कृष्णाच्या ठिकाणी असलेला सांदिपनींविषयीचा भक्तिभाव पाहून कृष्णाविषयीच आदर निर्माण झाला. पण काहीजणांना कृष्णाचे बोलणे तेवढेसे मानवले नाही. 'सांदिपनींना जे जेव्हा योग्य व आवश्यक वाटेल ते तेव्हा आपल्याला सांगतीलच. आपण त्यांना आपणहून सूचना करण्याचे काहीच कारण नाही. उलट अशी सूचना आपण त्यांना करणे म्हणजे त्यांचा एक प्रकारे अवमानच आहे' अशा विचाराने काहीजण कृष्णावर थोडेसे नाराजच झाले. परंतु सांदिपनींच्या प्रतिक्रियेची वाट पहात ते सर्वजण स्वस्थच बसून राहिले.

हे लक्ष्मी, कृष्णाच्या बोलण्याचा खरा संतोष वाटला तो सांदिपनींनाच! कृष्णाच्या ठिकाणी असलेला त्यांच्याविषयीचा भक्तिभाव त्यांना जाणवला आणि त्यांना अत्यंत समाधान झाले. कारण शिष्यभावासाठी त्याचे सद्गुरू हे 'माता, पिता, बंधू, सखा' असे सर्वच असतात. सर्व देवतांचे तेज व कार्य त्यांच्याच ठिकाणी शिष्याला दिसत असते. एवढेच नव्हे, तर सत्शिष्यासाठी सद्गुरू हे तर 'साक्षात् परब्रह्मच' असतात. त्यामुळेच सद्गुरूंच्या मुखातून 'ब्रह्मज्ञान' श्रवण करताना सत्शिष्याला ते ज्ञान म्हणजे त्यांचाच अनुभव आहे हे लक्षात येते आणि एकीएक सद्गुरूंचे माहात्म्य जाणवते. या जाणिवेतूनच सत्शिष्याच्या ठिकाणी सद्गुरूंविषयी भक्तिभाव निर्माण होतो. या भक्तिभावामुळेच सद्गुरू हेच त्याचे एकीएक दैवत होऊन रहातात आणि सर्वसमर्पणाचाच भाव त्या सत्शिष्याठायी निर्माण होऊन रहातो. त्यामुळे त्या सत्शिष्याला दुसऱ्या कशाचीही मातब्बरी न वाटता केवळ आपल्या सद्गुरूंचीच थोरवी जाणवते. अशा भक्तिभावाचे महत्त्व व कौतुकही केवळ सद्गुरूच जाणून असतात. कारण हा भक्तिभावच त्या सत्शिष्याला

त्याच्या स्वानुभवाकडे नेणारा असतो याची खात्री सद्गुरूंना असते. म्हणूनच सांदिपनींना कृष्णाच्या बोलण्यातून उत्स्फूर्तपणे व सहजपणे प्रगटलेल्या भक्तिभावाचा आनंद झाला आणि कृष्णाकडे पाहून त्यांनी संमतीदर्शक प्रेमहास्य केले. सांदिपनींच्या अनुमतीचा कृष्णाला आनंद झाला आणि त्याने कृतज्ञतापूर्वक सांदिपनींच्या चरणांवर मस्तक ठेवून त्यांचे दर्शन घेतले.

हे लक्ष्मी, अशा तऱ्हेने कृष्णाने नित्याच्या ब्रह्मकर्मासाठी व उपासनेसाठी आपल्या सद्गुरू सांदिपनींचे प्रत्यक्ष अधिष्ठान ठेवले आणि तेच सत्शिष्याच्या आपल्या सद्गुरूंविषयीच्या असलेल्या भक्तिभावासाठी अत्यंत आवश्यक व म्हणूनच अत्यंत महत्त्वाचेही असते. सद्गुरूंच्या अंतःकरणात त्यांच्या आत्मानुभवामुळे आध्यात्मिक अधिष्ठान सहजपणे असतेच. परंतु सत्शिष्याच्या अंतःकरणात आपल्या आत्मस्वरूप सद्गुरूंची सगुण प्रेमळ मूर्ती असते. त्यांच्यावरील भक्तिभावापोटी बाह्यांगानेही सद्गुरूंचे प्रत्यक्ष अस्तित्व, त्यांची सेवा, त्यांचे पूजन व त्यांचेच गुणगान सत्शिष्यासाठी अत्यावश्यक असते आणि तसा भक्तिभाव त्याच्याकडून आपल्या सद्गुरूंना अर्पण करणे अगदी सहजपणे घडतही असते. असो! हा विषय कितीही बोलला तरी कमीच आहे. कारण या बोलण्याने बोलणे वाढतच रहाते आणि तरीही कितीतरी सांगणे हे शिल्लक रहाते ते रहातेच!

***

हे लक्ष्मी, कृष्णाची सर्व दिनचर्या ही सांदिपनींच्या सर्व जीवनानुसार घडत असे. सांदिपनींचे जीवन हे त्यांचे व्यक्तिगत जीवन व त्यांचे आश्रमातील कार्य असे दोन्ही मिळून होते आणि मुख्य म्हणजे कृष्ण हे जाणून होता. शिष्यभावाचे हे आणखीन एक महत्त्वाचे लक्षण आहे. आपल्या सद्गुरूंचे कार्य व जीवन हे वेगवेगळे नसून ते दोन्ही एकमेकांना पूरकच आहेत, हे सत्शिष्य पूर्णपणे जाणून असतो आणि म्हणूनच भक्तिभावाने त्याच्याकडून सद्गुरूंच्या दोन्ही अंगांची सारखीच सेवा सहजपणे घडत असते. त्यामुळे कृष्णाचेही आश्रमातील सर्व गोष्टींकडे अगदी बारीक लक्ष व देखरेखही असे. आश्रमात कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे हे कृष्णाच्या लगेचच लक्षात येई आणि त्याची पूर्तीही तो लागलीच करीत असे. आश्रमात लागणारी नाना तऱ्हेची कंदमुळे व फळे आणि यज्ञासाठी लागणाऱ्या नाना समिधा कृष्ण स्वतः वनामध्ये जाऊन घेऊन येई. त्यासाठी तो बलरामाचेही साहाय्य घेई. एवढेच नव्हे, तर सुदाम्यालाही आपल्याबरोबर आग्रहपूर्वक घेऊन जाई. खरे तर, सुदामा त्याच्या शारीरिक दुर्बलतेमुळे व थोड्याशा आळसामुळेही कृष्णाबरोबर वनात जाण्याची थोडीशी टाळाटाळ करण्याचा प्रयत्न करी. परंतु कृष्णाच्या आग्रहापुढे त्याचे काहीच चालत नसे. शेवटी जरासा नाइलाजच म्हणून आणि कृष्णाच्या प्रेमाच्या आग्रहाचा आदर करीत, सुदामा कृष्ण व बलराम यांच्यासह वनामध्ये जाण्याचे करीत असे.

अशक्त तब्येतीमुळे सुदाम्याला थोडे चालले तरी दमायला होत असे. एवढेच नव्हे, तर जास्त भार खांद्यावर घेणेही त्याला शक्य होत नसे. मग तो असहाय नजरेने कृष्णाकडे पाही. कृष्णालाही त्याची दया येई आणि त्याचा सर्व भार कृष्ण स्वतःच्या किंवा बलरामाच्या खांद्यावर ठेवत असे. परंतु एक होते, की सुदाम्याला भूक मात्र भरपूर व वारंवार लागत असे. अशा वेळी सुदामा भुकेल्या नजरेने व काकुळतीला येऊन कृष्णाकडे पहात असे. कृष्णाला त्याची कीव येत असे आणि अत्यंत प्रेमाने मग तो सुदाम्याला खाण्यासाठी काही कंदमुळे व फळे, तसेच पिण्यासाठी जल देऊन शांत करीत असे. काही वेळा तर चालता चालता दमलेल्या सुदाम्याला कृष्ण स्वतः आपल्या खांद्यावर उचलून घेत असे. कृष्णाच्या या प्रेमाची जाणीव सुदाम्याला होई आणि त्याचे मनही प्रेमाने भरून येई. परंतु आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी सुदाम्याला शब्दच सापडत नसत. केवळ अत्यंत प्रेमाने कृष्णाकडे पाहूनच सुदामा त्याची कृतज्ञता व्यक्त करी. आश्रमाच्या जवळ आल्यावर मात्र खांद्यावर घेतलेल्या सुदाम्याला खाली ठेवून, कृष्ण थोडी कंदमुळे व फळे त्याच्या खांद्यावर ठेवीत असे. कृष्णाच्या या कृतीने तर सुदाम्याला अधिकच भरून येत असे आणि कृष्णाच्या मनातील हेतू ओळखून हसूही येत असे. 'आपली दुर्बलता व कमीपणा दुसऱ्या कोणाच्याही लक्षात येऊ नये यासाठीच कृष्णाने घेतलेली ही काळजी आहे' हे सुदाम्याला जाणवत असे.

कृष्णाच्या प्रेमाची ही आगळी वेगळी परी पाहून व ओळखून सुदाम्याच्या मनातील कृष्णाविषयीचा प्रेमभाव व कृतज्ञताभाव अधिकच वाढत असे. 'कृष्णासारखा सखा आपल्याला भेटला' या भाग्याची जाणीव सुदाम्याला होई. त्याबद्दल ईश्वराचेच आभार सुदामा मनातल्या मनात मानीत असे आणि आपल्या खांद्यावरील भार सांभाळत सांभाळत हसतमुखाने आश्रमाच्या आवारात प्रवेश करीत असे. सर्व सामान सांदिपनींच्या पत्नीकडे सुपूर्द केल्यावर तिची शाबासकी व कौतुक स्वीकारताना मग सुदाम्याला होणारा आनंद काही विशेषच असे.

हे लक्ष्मी, असेच एकदा भर पावसाळ्याचे दिवस होते आणि पावसाने अगदी जोर धरलेला होता. काही दिवस आश्रमाच्या बाहेर पडणेही कठीण झाले होते. पाऊस थांबल्यावर अचानक सांदिपनींच्या पत्नीच्या लक्षात आले, की आश्रमात सरपण म्हणून वापरला जाणारा लाकूडफाटा संपलेला आहे. आता काय करावे हे तिलाही बराच वेळ सुचेचना. शेवटी तिने कृष्णाला बोलावून घेतले आणि त्याच्या कानावर तिची अडचण घातली. कारण सांदिपनींची पत्नीसुद्धा तिच्या अनुभवाने जाणून होती की सर्व अडचणींवरती कृष्णच उपाय शोधून काढेल. तिलाही कृष्ण हाच हक्काचा व खात्रीचा वाटत होता. कृष्णाच्या वागण्या-बोलण्याने त्याच्याविषयीचा एवढा विश्वास तिच्या मनात निर्माण झालेला होता आणि कृष्णाने तो विश्वास नेहमीच सार्थ ठरवला होता.

सर्व अडचण कृष्णाच्या लक्षात आली. त्याने एक क्षणभरच विचार केला आणि क्षणार्धात तो स्वतः रानामध्ये लाकूडफाटा गोळा करण्यासाठी निघाला. वेळ दुपारची होती आणि म्हणून सांदिपनी आपल्या पर्णकुटीत विश्रांती घेत पहुडले होते. त्यामुळे केवळ गुरुपत्नीचीच अनुमती कृष्णाने घेतली होती. पुढे दुपार टळून संध्याकाळ झाली आणि संध्याकाळ सरून रात्रीचेही आगमन झाले, तरीही कृष्णाचे येणे काही झाले नाही. कृष्णाची अनुपस्थिती तर सांदिपनींना दुपारनंतरच जाणवू लागली. दुपारच्या विश्रांतीनंतर सांदिपनी पर्णकुटीच्या बाहेर आले, तर त्यावेळी नेहमीच बाहेर उभा असणारा कृष्ण तेथे नव्हताच. सांदिपनींनाही जरा नवल वाटले. आणखीन थोडा वेळ गेला तरीही आजूबाजूला कृष्णाचे अस्तित्व सांदिपनींना जाणवेना. कुतूहलाने त्यांनी इतर शिष्यांकडे कृष्णाची चौकशी केली. परंतु कोणालाच त्याचा ठावठिकाणा माहीत नव्हता आणि शोधूनही कोणालाच तो लागेही ना!

सांदिपनींना वाटणाऱ्या आश्चर्याची जागा आता काळजीने घेतली आणि ही गोष्ट जेव्हा त्यांच्या पत्नीच्या लक्षात आली तेव्हा मात्र तिलाही राहवेनाच. तिने स्वतःहून सर्व गोष्ट सांदिपनींच्या कानावर घातली. ती ऐकून सांदिपनी एकदम गंभीरच झाले. कृष्णाच्या सेवाभावाने सांदिपनींचे मनही भरून आले. तरीही आपल्या भावना व्यक्त न करता ते

स्वस्थच बसून राहिले. परंतु तेही थोडा वेळच. कारण जसजसा कृष्णाला येण्यास उशीर होऊ लागला, तसतसे सांदिपनींना स्वस्थ बसणे अशक्य होऊ लागले. त्यांच्या मनाची अस्वस्थता वाढू लागली आणि ते त्यांच्या पर्णकुटीच्या आवारातच येरझाऱ्या घालू लागले. सांदिपनींची ती अस्वस्थता पाहून त्यांच्या पत्नीच्या मनात मात्र थोडीशी अपराधभावना निर्माण झाली आणि तिला अत्यंत वाईट वाटले. 'आपण कृष्णाला उगाचच रानात पाठवले. त्यामुळेच हा काळजीचा प्रसंग निर्माण झाला. सांदिपनींच्या मानसिक काळजीला व अस्वस्थतेला कळत नकळत आपणच जबाबदार आहोत' अशा विचाराने सांदिपनींच्या पत्नीच्या ठायीही अस्वस्थताच निर्माण झाली. परंतु तीही काही न बोलता व न करता स्वस्थच बसून राहिली. कारण त्यापलीकडे काही करणे तिलाही शक्यच नव्हते.

रात्र जशी-जशी वाढू लागली तसे मग सांदिपनींनाही राहवेना आणि काही शिष्यांना आपल्याबरोबर घेऊन ते रानाकडे जाण्यास निघाले. ते आश्रमाच्या बाहेर पडणार तेवढ्यातच खांद्यावर भली मोठी लाकडाची मोळी घेऊन येत असलेला कृष्ण सर्वांच्याच दृष्टीस पडला. कृष्णाची ती मूर्ती पाहून सांदिपनींना तर गहिवरच आला. कृष्णाने आपल्या खांद्यावरील मोळी बाजूला खाली ठेवली आणि हात जोडून सांदिपनींकडे क्षमा याचना केली.

''हे गुरूवर्य, आपण मला क्षमा करावी अशी मी सर्वप्रथम आपल्या चरणी प्रार्थना करतो. आश्रमातील सर्व सरपण संपल्याचे जेव्हा गुरुमातेने मला सांगितले, तेव्हा खरे तर मी आधी आपली अनुमती घेऊन मगच रानात जायला हवे होते. परंतु प्रसंगातील तातडी ओळखून आणि आपण त्यावेळी विश्रांती घेत असल्यामुळे आपणाला जराही त्रास न व्हावा या हेतूनेच केवळ, मी गुरुमातेची अनुज्ञा घेऊनच रानामध्ये जाण्याचे केले. पाऊस बऱ्याच वेळापूर्वी थांबला असला तरी पावसामुळे रानामध्येही पाणीच पाणी झालेले आहे. त्यामुळे वृक्षाच्या सुक्या व कोरड्या फांद्या शोधून काढण्यात आणि त्यांच्या मोळ्या बांधण्यात माझा बराच वेळ गेला. माझ्या उशिरा येण्यामुळे आपल्या ठिकाणी माझ्याविषयी काळजी व विवंचना निर्माण होणे हे आपल्या कोमल व अत्यंत संवेदनशील अंतःकरणामुळे साहजिकच आहे. आपल्या अंतःकरणात आम्हा सर्वांविषयीच्या प्रेमाचे झरे नित्यच वहात असल्याचेच हे लक्षण आहे हे आम्ही जाणून आहोत. ही आपली आमच्यावरील कृपाच आहे. तरीही माझ्यामुळे आपले अंतःकरण व्यथित झाले हा माझ्याकडून घडलेला अक्षम्य अपराधच आहे याची जाणीव मला आहे. म्हणूनच मी अगदी मनःपूर्वक आपली क्षमा मागत आहे. आपण तर ती क्षमा मला आधीच केलेली आहे, हे जरी खरे असले आणि हेच जरी आपल्या क्षमाशील अंतःकरणाचे माहात्म्य असले, तरी आपण माझ्यावर कृपा करावी हीच आपल्या चरणी प्रार्थना. ''

असे म्हणत म्हणतच कृष्णाने सांदिपनींच्या चरणांवर मस्तक ठेवून नमस्कार केला असता, सांदिपनींच्या नेत्रांतही अश्रू आले आणि त्यांनी कृष्णाला प्रेमभरे उठवून आपल्या मिठीत घेतले. कृष्णही सांदिपनींच्या त्या प्रेमालिंगनामध्ये विसावला आणि अत्यंत सुखावलाही. तेवढ्यात सांदिपनींच्या पत्नीनेही कोरड्या वस्त्राने कृष्णाचे भिजलेले सर्व अंग पुसले आणि त्याच्यासाठी आणलेले गरम दूध ती अत्यंत प्रेमाने व आपल्या हातांनी कृष्णाला पाजू लागली. तिच्या नेत्रांत दाटून आलेला वात्सल्यभाव मोकळा होऊन अगदी मुक्तपणे वाहू लागला होता. ''

सांदिपनींच्या आश्रमात घडलेल्या भावपूर्ण प्रसंगाचे वर्णन करताना नारदाचे मनही अगदी साहजिकपणे भारावलेच. त्याची परिणती म्हणजे नारदाचा शब्दौघही विसावला. लक्ष्मीचेही मन भरून आले होतेच, पण भक्तिभावाने श्रवण करीत असल्यामुळे तिचे मन सावधही होते आणि पुढील श्रवणासाठी आतुरही होते. त्यामुळे किंचित काळच थांबून लक्ष्मीने स्वतःहूनच बोलावयास सुरुवात केली.

''हे नारदा, कृष्णचरित्रात भावपूर्ण प्रसंग तर सारखे घडतच असतात. याचे कारण मुळातील कृष्णाचे प्रेमभावपूर्ण अंतःकरण हे जरी निश्चितपणे असले, तरी त्याचबरोबर कृष्णाचा हा प्रेमभाव ज्या एवढ्या सहजतेने प्रगट होतो ना, त्यामुळेच संबंधित व्यक्तीसुद्धा एकदम तेवढ्याच सहजतेने भावपूर्ण होते हे माझ्या पूर्णपणे लक्षात आले आहे. येथे तर प्रसंग प्रत्यक्ष महात्मा सांदिपनींच्याच बाबतीत घडत होता. सांदिपनींविषयीचा भक्तिभाव कृष्णाकडून एवढ्या उत्कटतेने व सहजपणे प्रगट झाला, की आत्मानुभवी असे प्रत्यक्ष सांदिपनीसुद्धा एकदम भावपूर्णच झाले. मग वात्सल्यभावाच्या त्यांच्या पत्नीची अवस्थाही भावपूर्ण झाली यात मला तरी काहीच नवल वाटत नाही. तसे घडणे तर अगदी नैसर्गिकच होते आणि म्हणूनच तसे अगदी सहजपणे घडलेही.

हे नारदा, तुझ्या मुखातून श्रवण करीत असताना कृष्णाकडून घडलेल्या सद्गुरूसेवेचे महत्त्व मला विशेषत्वाने जाणवत आहे. खरे तर, असा सेवाभाव सांदिपनींच्या सर्वच शिष्यांच्याठायी असावयास हवा होता ना? मग तसा किंवा तेवढ्या प्रकर्षाने त्यांच्याकडून तो का बरे प्रगट झाला नाही? तसा सेवाभाव त्या शिष्यांच्याठायी नव्हताच, की तो भाव प्रगट करण्यासाठी त्यांना काही मानसिक वा बाह्यांगाच्या अडचणी येत होत्या? मला तर असे वाटते की कृष्णाच्या व इतर शिष्यांच्या भावामध्ये काहीतरी मूलभूतच फरक असावा. अर्थात् कृष्णाचे वेगळेपण हे निश्चितपणे असणारच. पण ते वेगळेपण निश्चितपणे काय असावे बरे, की ज्यामुळे कृष्णाचा सेवाभाव हा विशेषत्वाचा ठरला?

हे नारदा, आणखीन एक प्रश्न मात्र माझ्या मनात वारंवार येत आहे, की ज्या ज्ञानप्राप्तीसाठी कृष्ण सांदिपनींना शिष्य म्हणून शरण गेला होता, ते ज्ञान मग सांदिपनींनी कृष्णाला केव्हा व कसे दिले? कारण आत्तापर्यंत 'सांदिपनींच्या व कृष्णाच्या आश्रमातील दिनचर्येचे व जीवनाचे' जे वर्णन तू केलेस त्यामध्ये असा काही उल्लेख आलेलाच नाही. अशा ज्ञानार्जनासाठी सांदिपनी व कृष्ण यांची काही वेगळी भेट होत होती की नाही? त्यासाठी त्यांचे काही खास बोलणे वा संवाद हा तर घडत असणारच ना? तेच सर्व श्रवण करण्याची अत्यंत आतुरता माझ्या मनात तुझ्या बोलण्यामुळेच निर्माण झालेली आहे आणि त्याची पूर्तीही आता तुझ्याच बोलण्यामुळे होणार आहे. ''

लक्ष्मीच्या बोलण्याने नारद काही काळ अंतर्मुखच होऊन राहिला. नेत्र मिटून घेतलेल्या अवस्थेत तो कुठल्यातरी गहन विचारात गर्क होऊन राहिल्यासारखेच जाणवत होते. नारदाची ही अंतर्मुखतेची अवस्था लक्ष्मीच्या लक्षात आली आणि ती मग थोडावेळ स्तब्धच बसून राहिली. अंतर्मुख होऊन स्वतःच्याच अंतःकरणात पूर्णपणे बुडून गेलेले नारदाचे मन पुन्हा बहिर्मुख होण्याची आतुरतेने वाट पहात रहाणे एवढेच लक्ष्मीच्या हातात होते आणि तेच तिच्याकडून अगदी सहजपणे घडत होते. असा किती काळ गेला हे माहीत नाही. परंतु लक्ष्मीला मात्र तो काळ केवढातरी जाणवला. काही वेळाने नारदाचे नेत्र किंचितसे उघडल्यासारखे झाले आणि आपल्या अर्धेन्मीलित नेत्रांनी नारद लक्ष्मीकडे बराच वेळ पहातच राहिला. नारदाच्या त्या पाहण्यामध्ये लक्ष्मीविषयीचा केवढा तरी कौतुकभाव भरलेला होता. कारण लक्ष्मीने विचारलेल्या प्रश्नांचे निमित्त होऊन नारदाला आपल्या अंतःकरणातील आनंदाच्या डोहामध्ये खोलवर जाऊन बुडण्याची सुवर्णाची नव्हे, तर जणू अमृताचीच संधी मिळाली होती आणि त्या संधीला साधून, आधीच अमृतसिद्धीला पावलेला नारद नारायणाच्या सगुणचरित्रातील कथामृताची गोडी वर्णन करण्यासाठी पुन्हा सिद्ध झाला होता. त्याचीच परिणती म्हणजे अमृताहुनी गोड असलेल्या कृष्णकथांचे मधुर बोल नारदाच्या मुखातून स्त्रवू लागले.

''हे श्रवणभक्तिपरायण लक्ष्मी, मला तुझे अत्यंत कौतुकच वाटून राहिलेले आहे. कारण श्रवणभक्तीची सर्व लक्षणे तुझ्याठायी सर्वस्वाने व उत्कटतेने मला दिसत आहेत. श्रवणात पूर्ण तन्मयता असूनही मनाची सावधानता, विषय पूर्ण आकलन होऊनही बुद्धीच्या ठिकाणी तो अधिक जाणून घेण्याची अवधानता आणि विषयामध्ये स्वतःला पूर्णपणे झोकून देऊनही पुढील श्रवणाची व्यवधानता, हे श्रवणभक्तीचे सर्व गुण तुझ्याठायी प्रकर्षाने प्रगट झालेले बघून, मला अतिशय आनंद होत आहे आणि मलाही अधिक खोलवर चिंतन करण्यासाठी उद्युक्त करीत आहेत. त्या चिंतनाच्या मंथनातून निर्माण होणाऱ्या अमृतरसामध्ये तर माझे अंतःकरण पूर्णपणे थबथबून गेलेले आहे आणि सगुण कथा गायनासाठी मला अधिकच प्रवृत्त करीत आहे. तुझ्या मनात आलेले दोन्ही प्रश्न अगदी

योग्यच आहेत आणि त्यांची उत्तरे देण्याच्या निमित्ताने मला होणारा आनंदही अगदी आगळा वेगळाच आहे. असो.

हे लक्ष्मी, तुझ्या मनात आलेला सेवाभावाविषयीचा प्रश्न हा तर अत्यंत महत्त्वाचा असाच आहे. सेवाभाव हा कठीण आहे आणि त्यातूनही सद्गुरूंची सेवा ही तर अधिकच गहन आहे. कारण आत्मस्वरूपामध्ये सदैव रत असलेल्या महात्म्यांच्या ठिकाणी आधीच जगाचे व त्यांच्या देहाचे भान कमीच असते. त्यामुळे त्यांचे मन जाणून त्यांची सेवा करणे हे जवळ जवळ अशक्यच होऊन रहाते. त्यांनी आपणहूनच त्यांच्या मनातील काही सांगितले तरच त्यांची थोडीशी तरी सेवा करणे शक्य होते. परंतु तशी शक्यताही अगदी कमीच असते. मात्र सांदिपनी ऋषींसारखे महात्मे जे आपणहून असे कार्यरूपाने प्रगट होतात आणि जनोद्धाराचे कार्य अंगीकारतात, तेव्हाच या सेवेची काहीतरी संधी उपलब्ध होते. त्यामुळेच त्यांच्याकडून स्वानुभवाची ईश्वरभक्ती घडत असतानाच त्यांच्या शिष्यांसाठी आत्मकल्याणाचा मार्ग प्रगट होतो. खरे तर ईश्वरस्वरूप सद्गुरूंच्या प्रत्यक्ष भक्तीनेच शिष्यालाही त्याच्या हृदयात ईश्वर स्वरूपाचा अनुभव अगदी सहजपणे येऊ शकतो. परंतु असा सद्गुरूंविषयीचा भक्तिभाव निर्माण होणेच अत्यंत दुर्मीळ असते. पण आश्रमात राहणाऱ्या शिष्यांना तशी संधी मात्र प्राप्त झालेली असते. ती संधी साधण्याचा हा पराक्रम मात्र ज्याला त्यालाच करावा लागतो.

हे लक्ष्मी, सद्गुरूंची भक्ती हीच सद्भक्ती होय आणि खरे तर, असा भक्तिभाव निर्माण होण्यासाठीच सद्गुरूंनी नित्य उपासना, श्रवण, पठण अशी अनेक साधने शिष्यांना दिलेली असतात. परंतु या बाह्य कर्मांच्या साधनेतच जेव्हा शिष्य अडकून बसतात तेव्हा त्या साधनांचे जे साध्य, म्हणजे सद्गुरूंच्या ठायीचे ईश्वरस्वरूप, त्याकडेच नेमके त्यांचे दुर्लक्ष होते. असे शिष्य बाह्य साधनांचे केवळ ओझे वहात रहातात आणि त्या ओझ्याखाली त्यांच्याकडून अनुभवाच्या दिशेने एकही पाऊल टाकले जात नाही. परंतु त्यांच्याठिकाणी सद्गुरूंविषयीचा कृतज्ञभाव जरूर असतो आणि म्हणून सद्गुरूंच्या कार्याला बाह्यांगाने ते साहाय्य करीत रहातात.

सांदिपनींनी स्वतः आश्रमाची निर्मिती करून भाविकांचा शिष्य म्हणून स्वीकार केला होता. त्यांच्या सर्व शिष्यांच्या ठिकाणीसुद्धा सांदिपनींविषयी कृतज्ञताभाव होताच. कारण सांदिपनींनी आश्रमाची स्थापना केल्यामुळेच त्यांना आत्मकल्याणाची संधी मिळालेली आहे हे ते शिष्य जाणून होते. याच जाणिवेमुळे आश्रमातील सर्व व्यवस्था त्या शिष्यांकडून अगदी चोखपणे राखलीही जात होती. आश्रमातील सर्व कामांची त्यांनी आपापसात वाटणीही केलेली होती आणि त्याबरहुकूम सर्व कामे वेळच्या वेळी व अगदी व्यवस्थितपणे होतही होती. कधीच कुठे काही कमी पडत नसे. याची योग्य ती दखलही

सांदिपनींच्याकडून घेतली जात असे आणि त्याचे कौतुकही सांदिपनी वारंवार व्यक्त करीत असत. परंतु सर्व शिष्य या बाह्य सेवेच्या मर्यादितच राहिले. या मर्यादेचे उल्लंघन करून आपल्या सद्‌गुरूंची व्यक्तिगत जवळीकता साधावी, असे ना कधी त्या शिष्यांना वाटले, ना कधी त्यांना त्याची जरुरी वाटली. सांदिपनींनीसुद्धा आपणहून त्या शिष्यांना कधी तशी जाणीव मुद्दामहून करून दिली नाही. कारण हा सेवाभाव सांगून कळण्यासारखा व करण्यासारखा नाहीच मुळी. तो ज्याला त्यालाच जाणवावा लागतो आणि ज्याच्या त्याच्याकडूनच व्यक्तही व्हावा लागतो.

सद्‌गुरूंच्या ईश्वरस्वरूप अनुभवाची व माहात्म्याची जाणीव ज्याला झाली, त्याला सद्‌गुरूंच्या भक्तीचा ध्यासच लागतो आणि त्या भक्तिभावातूनच व्यक्तिगत सेवेचा भाव त्या शिष्याचा ठिकाणी निर्माण होतो. त्या सेवाभावाची जरुरी त्या सत्‌शिष्याला खरे तर सद्‌गुरूंपेक्षाही जास्तच असते. सद्‌गुरूही सत्‌शिष्याचा सद्‌भाव जाणून त्याच्या व्यक्तिगत सेवेचा मनःपूर्वक स्वीकार करतात. कारण ते ओळखून असतात की त्या सत्‌शिष्यासाठी सेवाभाव हे त्याच्या भक्तिभावाचेच अविभाज्य अंग आहे.

हे लक्ष्मी, सत्‌शिष्याची ही सर्व लक्षणे कृष्णाच्या ठायी सहजपणे होती आणि हेच त्याचे वेगळेपण व विशेषत्व होते. कृष्णाच्या ठिकाणी एकीएक सांदिपनींचाच ध्यास सदैव असे. सांदिपनी म्हणजे त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे आत्मकल्याणाचे कार्य, त्यांचे व्यक्तिगत जीवन आणि त्यांचे अंतःकरण. हे सर्व मिळूनच सांदिपनींचा ईश्वरी अनुभव आहे हे कृष्ण निश्चयात्मकतेने जाणून होता आणि म्हणून तोच व तसाच ध्यासही कृष्णाच्या ठायी अगदी सहजतेने होता. त्या ध्यासाचीच पूर्ती करण्यासाठी कृष्ण नित्य सावध व तत्पर असे. त्या ध्यासापोटीच सांदिपनींचे मन जाणणे कृष्णाला अगदी सहज शक्य होत असे आणि त्यानुसार सांदिपनींची खऱ्या अर्थाने सेवा कृष्णाकडून घडत असे. त्याचीच परिणती म्हणजे सांदिपनीही कृष्णावर नेहमीच संतुष्ट असत आणि तेच तर कृष्णाची भक्तिभावाची सेवा सांदिपनींना पावल्याचे लक्षण होते.

***

हे लक्ष्मी, तू विचारलेला दुसरा प्रश्न तर अधिकच महत्त्वाचा आहे. 'आश्रमातील नित्य दिनचर्या व यज्ञयागादी कर्मे करीत असताना सांदिपनी कृष्णाला प्रत्यक्ष असे वेगळे ज्ञान कधी व कसे देत असत' असा तुझ्या मनात जो प्रश्न आला तो अगदी साहजिक व योग्यच आहे. परंतु एक गोष्ट नीटपणे लक्षात ठेव, की बोलण्यातून किंवा संवादातून शब्दाद्वारे प्रगट होणारे ज्ञान कितीही प्रगट झाले, तरी ते कमीच असते आणि ते यथार्थही नसते. कारण ज्ञान ज्या अनुभवातून प्रगट होते तो अनुभव हाच महत्त्वाचा असतो. तो अनुभव तर शब्दातीतच असतो. आत्मानुभवी महात्म्यांकडून तर तो अनुभव श्वासाश्वासाला घेतला जात असतो आणि तसाच तो प्रगटही होत असतो.

अशा आत्मानुभवाच्या सहज अवस्थेत असलेल्या महात्म्यांच्या नित्य सहवासातच, त्यांच्या स्वानुभवात बाह्यांगाने सहभागी होण्याची संधी काही भाग्यवंतांनाच लाभते. परंतु त्या महात्म्यांविषयी ज्यांच्याठायी भक्तिभाव असतो अशांनाच त्या संधीचा लाभ उठवता येतो. महात्म्यांच्या प्रत्येक कृतीतून व उक्तीतून केव्हाही, कधीही, कुठेही व कसेही त्यांचे आत्मस्वरूपच प्रगट होत असते आणि सत्‌शिष्याचा तसा पूर्ण निश्चयच असतो. भक्तिभावाने तो सत्‌शिष्य तसा अनुभव त्या महात्म्यांच्याठायी नित्य पहात असतो आणि त्यांच्याशी ऐक्य पावण्याचा प्रयत्न आर्ततेमुळे त्या शिष्याकडून घडत असतो. सद्‌गुरूंच्या भिन्न भिन्न बाह्य कृतींतून व बोलण्यातून त्यांचे एकीएक विशुद्ध अंतःकरणच सत्‌शिष्याला जाणवत रहाते. त्यांच्या अवस्थेतील व स्वतःच्या अवस्थेतील विभक्तता जाणवूनच सत्‌शिष्याच्या ठिकाणी आर्तता निर्माण झालेली असते, ज्याची पूर्तता केवळ सद्‌गुरूंच्या अंतःकरणाशी ऐक्य पावल्यानेच होऊ शकणार असते.

हे लक्ष्मी, आत्मानुभवाची अवस्था सद्‌गुरू शिष्याला अशी उचलून देऊ शकत नाहीत. कारण ती काही एखादी वस्तू नाही आणि शिष्यही तशी ती घेऊ शकत नाही, तर सद्‌गुरूंच्या सहवासात व संगतीतच सद्‌गुरूंची आत्मस्वरूप अवस्था सत्‌शिष्याच्या ठिकाणी हळूहळू उतरत रहाते. सद्‌गुरूंचा आत्मानुभव सत्‌शिष्याच्या आधी मनात प्रवेश करून तेथे स्थिर होतो आणि चंचल मनालाही स्थिर करतो. नंतर तो आत्मानुभव सत्‌शिष्याच्या मनाच्या पलीकडे जाऊन त्याच्या बुद्धीत प्रवेश करतो आणि बुद्धीला निश्चयात्मक करून तेजस्वी करतो. त्यानंतर तो आत्मानुभव सत्‌शिष्याच्या चित्तात प्रवेश करतो. चित्तातील इतर सर्व व्यवधानांना बाजूला करून चित्तशुद्धी करतो आणि त्या ठिकाणी स्वानुभव घेण्याचा ध्यास व आर्तता निर्माण करतो. चित्ताच्या या शुद्ध अवस्थेमुळेच भक्तिभाव

निर्माण होतो आणि हळूहळू सद्‌गुरूंचा आत्मानुभव हा सत्‌शिष्याचाही स्वानुभव होऊन रहातो.

हे लक्ष्मी, माझे हे सविस्तर सांगणे तुला एखादेवेळेस केवळ शास्त्रीय वाटेल. परंतु एक गोष्ट लक्षात ठेव, की मन, बुद्धी व चित्त हे काही जड पदार्थ नाहीत की ज्याचे वर्णन शास्त्रामध्ये करता येईल. तर या सर्व गोष्टी म्हणजे बाह्यांगाने न दिसणारे, पण तरीही अंतरात जाणवणारे असे एक अजब रसायनच आहे, जे कुठल्याही शास्त्रात बसूच शकत नाही. त्याचे यथार्थ वर्णनही होऊ शकत नाही. पण तरीही या आंतरिक अवस्थेतील संक्रमणाचे शब्दांकन करण्याचा हा माझा प्रयत्न आहे आणि त्याला कारण म्हणजे, जसे ते करणे हे तुझ्या दृष्टीने आवश्यक आहे, तसेच ते माझ्यासाठीही अत्यंत जरुरीचे आहे. कारण आत्मानुभवाच्या ठिकाणी दाटून राहिलेला भाव थोडा तरी मोकळा होण्याचा तोच एक सरळ, सुलभ व खात्रीचा मार्ग आहे. सर्वात मुख्य म्हणजे स्वानुभवाचे ते वर्णन उत्स्फूर्तपणे घडत असते. तेथे कोणतेही पूर्वनियोजित असे सूत्र नसते. म्हणूनच ते वर्णन नित्य नाविन्याचे व आनंददायी असते. असो.

हे लक्ष्मी, कृष्णाकडून घडणारा सांदिपनींचा सहवास हा त्यांचे ईश्वरी माहात्म्य पूर्णपणे जाणून व अत्यंत भक्तिभावाने घडत असल्यामुळे सांदिपनींच्या ठायीचा आत्मानुभव कृष्णाच्या अगदी सहजपणे लक्षात येत होता, त्याला कळत होता आणि जाणवतही होता. सांदिपनींचा तो आत्मानुभव केव्हाही, कधीही व कशाही रूपात जरी प्रगट झाला, तरी त्याद्वारे कृष्णाला सांदिपनींचे ईश्वरस्वरूपच दिसत असे आणि सांदिपनींच्या माहात्म्याची जाणीव कृष्णाच्याठायी अधिकच वृद्धिंगत होत असे. त्या संबंधात सांदिपनींना काही प्रश्न विचारून त्यांच्या अंतःकरणाची अवस्था समजून घ्यावी असे कृष्णालाही कधी वाटले नाही आणि आपली अवस्था कृष्णाला मुद्दामहून समजावून सांगावी अशी आवश्यकता सांदिपनींनाही कधी वाटली नाही. सांदिपनी व कृष्ण या उभयतांची केवळ मनेच नव्हे, तर त्यांची अंतःकरणेच जुळली असल्याचे ते लक्षण होते. सद्‌गुरू-शिष्य या अत्यंत पवित्र नात्यातील व संबंधातील ती परमोच्च अशी ऐक्यरूप अवस्था होती आणि कृष्णाच्या सद्‌गुरूभक्तीचेच ते फलरूप होते.

हे लक्ष्मी, असे जरी असले तरी आत्मचिंतनात सदैव मग्न असलेल्या सांदिपनींकडून कित्येक वेळा अगदी सहजपणे त्यांचे आत्मचिंतन शब्दरूपाने प्रगट होत असे. भक्तिभावाने सदैव सांदिपनींच्या सहवासात असलेल्या कृष्णाकडून ते चिंतन तेवढ्याच सहजतेने ग्रहण केले जाई आणि कृष्णाच्या अंतःकरणात ते उतरून साठूनही रहात असे. ताकाच्या मंथनातून वर आलेल्या नवनीताप्रमाणे शुद्ध व मुलायम असलेले सांदिपनींचे आत्मचिंतन, कृष्णाच्या अंतःकरणाला पूर्णपणे व्यापून रहाण्यासाठी मग जराही वेळ लागत नसे.

सांदिपनी व कृष्ण यांच्या परस्परांच्या सहवासातील एकांताची वेळ प्रामुख्याने व निश्चितपणे एकतर भल्या पहाटेची आणि दुसरी म्हणजे रात्रीची होती.

सुप्रभाती लवकर उठून क्षिप्रा नदीवर स्नानासाठी जाणाऱ्या सांदिपनींसंगे कृष्ण सेवाभावाने अगदी तत्परतेने जात असे, हे मी तुला मागे सांगितलेच आहे. त्यावेळी नारायणाचे सृष्टीरूप पाहून सांदिपनींचे अंतःकरणच मोकळे होत असे. ते मोकळे झालेले अंतःकरण नारायणाच्या माहात्म्याने व प्रेमाने भरून येई आणि त्यांच्याकडून त्यांच्या आनंदानुभवाचे अनेक आविष्कार साकार होत. अनेक विषय त्यांच्याकडून उत्स्फूर्तपणे प्रगट होत असत आणि त्याद्वारे नारायणाच्या व्यापक स्वरूपाशी ऐक्य पावलेले सांदिपनींचे अंतःकरण मोकळे होत असे. ते मोकळे झालेले अंतःकरण भरून घेण्यासाठी भक्तिभावाने कृष्णाचे अंतःकरण तर नित्यच आतुर व तत्पर असे.

असेच एकदा कृष्णाबरोबर स्नानाच्या निमित्ताने क्षिप्रेच्या काठावर आले असता क्षिप्रेचा प्रवाह पाहून सांदिपनी अचानक स्तब्ध झाले आणि क्षिप्रेचा वेगाने खळाळणारा प्रवाह पाहून सहजपणे उद्गारले,

‘‘सागराच्या भेटीसाठी आतुरलेल्या या क्षिप्रा नदीचा आवेग पाहून खरोखरीच तिची अत्यंत महतीच जाणवते. सागराशी मीलन पावणे या एकमेव ध्येयाने प्रेरित झालेल्या या क्षिप्रेचे सततचे वाहणे हेच तिचे जणू जीवन आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सागराशी ऐक्य पावूनही तिचे वाहणे अखंडपणे चालूच आहे. खरोखरी, त्या परमात्म्याशी ऐक्य पावलेल्या भक्तांचेही जीवन असेच असते, नाही का? परमात्म्याच्या एकमेव अस्तित्वाची जाणीव निर्माण झाल्यानंतर, त्याच्याच प्रेमाने त्याच्याशी ऐक्य पावण्यासाठी आर्त झालेल्या भक्तांचा जीवनप्रवाहही, भक्तिभावाने असाच आवेगाने व सखोलतेने वाहतच असतो आणि परमात्मसागराशी एकरूप होऊनही, त्या भक्तांचा जीवनप्रवाह त्याच प्रेमाने अखंडपणे वाहत राहून परमानंदाचा अनुभव घेतच रहातो. ’’

सांदिपनींकडून सहजपणे प्रगटलेल्या या वचनातील भावार्थ कृष्णाच्या लगेचच लक्षात आला. कारण त्याचे मन सांदिपनींवरील प्रेमाने अत्यंत संवेदनाक्षम झालेले होते. त्यामुळे सांदिपनींच्या वचनातील गूढार्थ कृष्णाला तात्काळ जाणवला आणि त्यातील भावही त्याच्या मनाला स्पर्श करून राहिला. सांदिपनींच्या अंतःकरणातील अंतर्नादातून सहजपणे स्फुरलेली ती स्वानुभवाची वचने कृष्णाच्याही अंतःकरणाचा ठाव घेऊन राहिली.

एकदा आश्रमाच्या परिसरातच सांदिपनी मुक्तपणे विहार करीत होते. कृष्णही साहजिकच त्यांच्यासंगे होता. परमेश्वराच्या सृष्टीरूपाकडे अत्यंत प्रेमळ नजरेने पहात असताना, त्या सृष्टीचे मूळ असलेल्या परमेश्वराविषयीचे प्रेम सांदिपनींच्या अंतःकरणात

उचंबळू लागले. फुलांनी बहरलेले व फळभाराने वाकलेले वृक्ष पाहून सांदिपनींना परमेश्वराच्या सृष्टीरूपी लीलेचे विशेष कौतुक जाणवू लागले आणि त्यांच्या भावपूर्ण अवस्थेतून प्रेमळ शब्दौघ सहजपणे वाहू लागला.

''खरोखरी, या वृक्षाच्या रूपाने त्या परमेश्वराचेच माहात्म्य प्रगट आहे. स्वतः सूर्याचा ताप सहन करून सर्वांना शांत करणारी अशी सावली देणारे, फुलांच्या रूपाने सर्वांच्या मनाला सुखावणारा असा सुगंध पसरवणारे आणि फळरूपाने सर्वांना अत्यंत मधुर असा रस देऊ करणारे हे अनेक वृक्ष आपल्याला दिसत आहेत खरे, परंतु ज्या बीजातून एवढा वृक्षसंभार निर्माण झाला त्या बीजाचेच माहात्म्य खरे आहे. या सृष्टीरूपी वृक्षाचेही अगदी तसेच आहे. परमेश्वराच्या संकल्परूपी बीजातून निर्माण झालेल्या या महान संकल्पवृक्षाचे मूळ मात्र वरती, म्हणजे परमेश्वराच्या ठायी आहे आणि त्याच्या शाखा खालच्या बाजूला अनेक अंगांनी पसरलेल्या आहेत. त्याच्या मूळापासूनचा प्रेमरस ज्यांनी सेवन केला आणि जे स्वतःच प्रेमरसमय झाले, असे अनेक महात्मे म्हणजेच या परमेश्वराच्या संकल्पवृक्षाला आलेली सुमधुर व रसपूर्ण अशी फळे आहेत. जसे बीजातून निर्माण झालेल्या फळामध्येही त्या वृक्षाचीच बीजे असतात आणि त्या बीजांतूनही मग अनेक वृक्ष निर्माण होतात, तसेच सृष्टीच्या मूळ संकल्पाचे बीज ज्यांच्याठायी आहे, अशा फलरूप महात्म्यांच्या ठायीच्या संकल्पातूनही असे अनेक भक्तरूपी वृक्ष निर्माण होतात. ते वृक्षही प्रेमाच्या पानांनी मोहरून येतात, भक्तीच्या फुलांनी बहरून येतात आणि स्वानुभवाच्या फळांनी संभारून येतात. ''

सांदिपनींच्या अंतःकरणातील परमेश्वरी प्रेमाचा शब्दरूपाने वाहणारा प्रवाह जेवढ्या सहजपणे व अचानक प्रगट झाला, तेवढ्याच सहजतेने तो थांबलाही आणि एकदम नीरव शांतता सर्वत्र पसरून राहिली. कृष्णही अत्यंत भारावलेल्या मनाने श्रवण करता करता भावपूर्ण झाला होता आणि एकाग्र नजरेने सांदिपनींच्या मुखाकडे पहातच राहिला होता. सांदिपनींच्या प्रसन्न मुखावरील शुद्ध, सात्त्विक भाव व आत्मतेज यांचा झालेला संगम पाहून कृष्णानेही दोन्ही हात जोडून सांदिपनींच्या चरणांवर आपले मस्तक ठेवले आणि त्यांचे दर्शन घेतले. थोडेसे भानावर आलेल्या सांदिपनींनीही अत्यंत प्रेमळ नजरेने कृष्णाकडे पाहिले आणि त्याच्या मस्तकावर आपला कृपाहस्त ठेवला.

हे लक्ष्मी, कधी व्यापक, निळ्या रंगाच्या भासणाऱ्या आकाशाकडे पाहून सांदिपनींना, परमात्म्याच्या निर्गुण, निराकार, निर्लेप व सर्वाला व्यापून असणाऱ्या परमात्मस्वरूपाचे स्मरण होई आणि त्याच व्यापकतेचा अनुभव अंतःकरणात आणून देणाऱ्या आत्मानुभवाची जाणीव त्यांच्याकडून तृप्तभावाने व आनंदाने प्रगट होत असे. कधी त्याच आकाशात आपल्या प्रकाशाने तळपणाऱ्या व सृष्टीला उजळवून टाकणाऱ्या

तेजोनिधी अशा सूर्याला पाहून सांदिपनी अंतर्मुख होत आणि त्यांना त्या सूर्यालाही प्रकाशित करणाऱ्या परमात्मतेजाचे स्मरण होई. त्यावेळेस मग सांदिपनींकडून, 'मानवी देहाला व मनाला कार्यरत करणाऱ्या आत्मतेजाचे व चैतन्यशक्तीचे माहात्म्य सहजोद्गारातून प्रगट होत असे. तर कधी त्याच आकाशात अंधकारमय रात्रीतही आपल्या शीतल व मधुर चांदण्याने प्रकाशणाऱ्या चंद्राला पाहून सांदिपनींच्या अंतःकरणातील परमात्मप्रेम दाटून येई आणि 'मनाला सदैव उल्हसित व उत्साही ठेवणाऱ्या' आत्मप्रेमाची महती त्यांच्याकडून वर्णिली जाई. काही वेळेला जेव्हा त्याच आकाशात मेघांची दाटी होई आणि त्यातून सर्वांना शांतवणाऱ्या व जीवनदायी अशा जलधारांची सतत व मुसळधार बरसात सुरू होई, तेव्हा तर सांदिपनी अतिशय आनंदनिर्भर होत असत. त्यावेळेस त्यांच्याकडून 'दाटून राहिलेल्या आत्मप्रेमाला मोकळे करणाऱ्या आणि आनंदानुभव आणून देणाऱ्या' अशा भक्तीची थोरवी प्रगट होत असे. एवढेच नव्हे, तर भक्तिभावाने त्यांच्याकडून गायनच घडत असे.

हे लक्ष्मी, अशा तऱ्हेने सांदिपनींच्या एकीएक आत्मानुभवाची सहजपणे प्रगटणारी अनेक अंगे त्यांच्या सहवासात कृष्णाला जाणवत असत आणि भक्तिभावाने भरलेल्या कृष्णाच्या अंतःकरणात अलगदपणे उतरून, त्याच्या अंतःकरणाचा पूर्णपणे ठाव घेत असत. 'ही सर्व सृष्टी परमेश्वराचीच आहे' या दृष्टीने त्या सृष्टीकडे पहाणाऱ्या सांदिपनींची दृष्टी ही परमेश्वराचीच दृष्टी आहे, याच दृष्टीने तो परमेश्वरही आपल्या सृष्टीकडे निश्चितपणे पहात असणार, असा सांदिपनींविषयीचा दृढ भक्तिभाव कृष्णाचा होता. म्हणूनच सांदिपनींच्या अंतःकरणातील सर्व भाव कृष्णाच्याही अंतःकरणात निर्माण होत असत आणि सांदिपनींच्या अनुभवातील आनंदात कृष्णही अगदी सहजपणे व तात्काळ समरस होऊन ऐक्य पावत असे.

हे लक्ष्मी, कृष्णाच्याठायी सांदिपनींविषयीचा भक्तिभाव एवढा पराकोटीचा होता, की त्याच्या ठिकाणी सतत त्यांचाच ध्यास असे आणि तोच त्याच्या वागण्यातून सातत्याने व सहजपणे प्रगट होत असे. सूर्यास्तानंतर रात्रीच्या काळोखात आणि शांत व स्तब्ध वातावरणात आश्रमातील सर्वजण विश्रांती घेऊन हळुहळू निद्राधीन होऊ लागत. अशावेळी कृष्ण मात्र सांदिपनींच्या जवळ राहून त्यांचे चरण हळुवारपणे चुरीत असे. कृष्णाच्या प्रेमळ स्पर्शाने व भक्तिभावाच्या सेवेने सांदिपनी अत्यंत संतुष्ट होत असत आणि मग त्यांचेही अंतःकरण सहजपणे मोकळे होत राही. त्यांच्या अंतःकरणातील नानाविध भाव शब्दरूप घेऊन साकार होत असत. कधी ते स्वतःच्या पूर्व जीवनातील काही प्रसंगांचा उल्लेख करीत असत, तर कधी स्वतःच्या सद्गुरूंच्या सहवासात घडलेले प्रसंग सांगून आपल्या सद्गुरूंचे माहात्म्य अगदी भक्तिभावाने वर्णन करून सांगत असत. कधी कधी सांदिपनी स्वतःच्या व्यक्तिगत जीवनाविषयीही बोलत असत. त्यांच्या पत्नीची त्यांना केवळ

बाह्यांगानेच नव्हे, तर अगदी मनापासून असलेली साथ याचे कौतुक व आनंद ते सांगत असत. 'स्वतःच्या पोटच्या मुलाचा अकाली व अपघाती झालेला मृत्यू, त्यावेळेस उभयतांची झालेली शोकाकुल अवस्था आणि त्यावेळेस त्यांनी आत्मबळाच्या जोरावर पत्नीला दिलेला मानसिक आधार व बळ' याचे वर्णन करीत असताना सांदिपनी स्वतःसह कृष्णालाही भावपूर्ण करून ठेवीत असत.

काहीवेळेला सांदिपनी आश्रमातील नित्यक्रम व शिष्यांचे साधन याविषयीसुद्धा मोकळेपणाने बोलत असत. नेमाने सर्व कर्मे व साधने घडत असताना त्यातून जाणवणारा प्रेमाचा अभावही त्यांना व्यथित करीत असे. भावविरहीत बाह्य कर्मे व अनुभवाशिवायचे होणारे शब्दज्ञान यात गुंतलेल्या व रमलेल्या शिष्यांविषयीची काळजीही, सांदिपनींच्या बोलण्यातून बऱ्याच वेळा अगदी सहजपणे प्रगट होत असे. परंतु त्याचबरोबर कृष्णाच्या भक्तिभावाने होणारे समाधान व आनंद हेही सांदिपनींकडून प्रकर्षाने प्रगट होत असे. सांदिपनींची संतुष्टता व प्रसन्नता त्यांच्याकडून कृष्णाच्या मस्तकावर वारंवार कौतुकाने थोपटून नेहमीच व्यक्त होत असे.

हे लक्ष्मी, काही वेळा तर सांदिपनी तेच तेच प्रसंग किंवा तेच तेच विषय पुन्हा पुन्हा सांगत असत. परंतु प्रत्येक वेळेस त्यांचा बोलण्याचा सूर व उत्साह तसाच कायम असे आणि तरीही प्रत्येक वेळेस तोच प्रसंग व तोच विषय वेगवेगळ्या अंगाने प्रगट होत असे. भक्तिभावाने श्रवण करणाऱ्या कृष्णाच्याठायी नेहमीच्या अनुभवाने याची पूर्ण खात्री असे. काही वेळेला सांदिपनी त्या एकाच प्रसंगातील घटना वेगळ्या क्रमाने सांगत किंवा बोलता बोलता मध्येच अचानकपणे बोलायचे थांबत असत. पण अशा वेळी कृष्णाच्या मनात जराही असे येत नसे, की बहुतेक सांदिपनींना गोष्टी नीट आठवत नसाव्यात. त्यामुळे त्यांना त्या गोष्टींचे योग्य स्मरण करून द्यावे असेही कृष्णाला कधीही वाटतच नसे. पुढील प्रसंगाचा तपशील ऐकण्यापेक्षा सांदिपनींच्या अंतःकरणातून प्रगटणारी भावपूर्णता अनुभवण्यासाठीच कृष्ण स्वस्थ राहून अधिक आतुर होऊन राहिलेला असे. कारण त्या भावपूर्णतेतच स्वानुभवाचे सातत्य आणि आविष्काराचे नावीन्य सामावलेले आहे याची पूर्ण जाणीव कृष्णाच्याठायी होती. ही जाणीवच कृष्णाच्याठायी असलेल्या सांदिपनींविषयीच्या भक्तिभावाचे लक्षण होते आणि त्या भावामुळेच सांदिपनी कृष्णावर सदैव प्रसन्न असत. अशा तऱ्हेने कृष्णाकडूनही नित नावीन्याने व मोकळेपणाने श्रवण घडत असे. त्या त्या वेळच्या सांदिपनींच्या भावाशी पूर्णपणे समरस होऊन कृष्ण सांदिपनींच्या आनंदाचा अनुभवही पूर्णपणे घेत असे आणि सांदिपनींनाही त्यांचा अनुभव पूर्णपणे घेऊ देत असे. ''

नारदाच्या मुखातून प्रगटणारे कृष्णाच्या सद्‌गुरूभक्तीचे वर्णन श्रवण करता करता, लक्ष्मीला वाटत असलेले नवल व कौतुक तिच्या मुखावर पूर्णपणे विलसून अगदी ओसंडून वहात होते. परंतु त्याचा शब्दोच्चार करणे मात्र मोठ्या प्रयासाने तिने बराच काळ थोपवून ठेवले होते. शेवटी लक्ष्मीचाही नाइलाजच झाला आणि तिनेही न राहवून मध्येच बोलावयास सुरुवात केलीच.

''हे नारदा, मी मध्येच बोलते आहे म्हणून आधी मी तुझी क्षमाच मागते. पण मी तरी काय करू? अत्यंत दुर्मीळ व दुर्लभ असा भक्तिभाव जो कृष्णाकडून त्याचे सद्‌गुरू सांदिपनी यांच्याविषयी अगदी सहजपणे प्रगट होत होता, त्याचे वर्णन ऐकता ऐकता माझे मन कृष्णप्रेमाने व भक्तिमाहात्म्याने एवढे भरून येऊ लागले ना, की मला स्वस्थ रहाणे अगदी अशक्यच झाले. खरे तर, हे भक्तिमाहात्म्य तुझ्याच स्वानुभवातून प्रगट होत होते हेही मी जाणून आहे. तुझ्या स्वानंदातूनच तर हे कृष्णचरित्राचे भक्तिगायन घडत आहे. पण त्यासाठी तू सांदिपनी व कृष्ण यांच्यात घडलेले भावपूर्ण प्रसंग जेव्हा साकार केलेस ना, तेव्हा त्यातील प्रेमरूप व भक्तीरंग पाहून माझे मन अगदी लुब्ध होऊन राहिले. सद्‌गुरूभक्तीचे खरे माहात्म्य कृष्णानेच अनुभवले आणि तेच त्याच्याकडून सहजपणे व यथार्थपणे प्रगट झाले हे अगदी खरेच आहे. सद्‌गुरू व सत्‌शिष्य हे नाते भक्तिभावाचे संबंध अनुभवण्यासाठीच निर्माण झालेले असते, हे अबाधित सत्यच सांदिपनी व कृष्ण यांच्या संबंधाद्वारे प्रगट झाले. त्याचबरोबर कृष्णाच्या जीवनातील प्रत्येक नात्यामध्ये कृष्णाचे संबंध हे आदर्शवत्‌ व प्रमाणभूत होते, हे कृष्णचरित्रातील मूलभूत सत्यही पुन्हा एकदा सिद्ध झाले. होय ना? ''

लक्ष्मीच्या बोलण्याने संतुष्ट झालेल्या नारदाच्या मुखातून एकदम सहजोद्‌गार निघाले, ''बरोबर! लक्ष्मी, अगदी बरोबर! ! तुला तर नेमके वर्म उमगले. कृष्णचरित्रातील खरे वैशिष्ट्य तुला उमजले आणि त्याचे मूळ होते ते कृष्णाच्या अंतःकरणाच्या अवस्थेमध्येच. त्या अवस्थेमुळेच तर त्याच्या जीवनातील प्रत्येक नात्यामध्ये कृष्णाच्या बाजूने त्याचे संबंध प्रामाणिक, प्रांजळ, पारदर्शक आणि उत्कट प्रेमाचे होते. मग सद्‌गुरू व सत्‌शिष्य अशा अत्यंत पवित्र नात्यासंबंधातील त्याचा उत्कट भक्तिभाव हा अगदी साहजिकच आहे. कृष्णाच्या या भक्तिभावानेच संतुष्ट असलेल्या सांदिपनींचे अंतःकरणही मग कृष्णाच्या सहवासात सहजपणे प्रगट होत राही आणि त्यांच्या स्वानुभवाठायी दाटून राहिलेली भावपूर्णताही पूर्णपणे मोकळी होत असे. दुधाने दाटून भरलेला गाईचा पान्हा किंवा प्रेमवात्सल्याने भरलेल्या मातेचा पान्हा, हा तर आपल्या वत्साच्या केवळ स्मरणानेही ओसंडून वहात असतो. पण प्रत्यक्ष आपल्या वत्साच्या भेटीत, वत्साला उराशी धरताना तो पान्हा जेव्हा अनेक धारांनी वाहून त्या वत्साला तृप्त करतो, तेव्हाच त्या वात्सल्यभावाची

खऱ्या अर्थाने पूर्ती झाल्याचे समाधान मातेच्या मनाला लाभते. सद्गुरूमाऊलीचाही अगदी तसाच भाव व अनुभव असतो.

ईश्वरी प्रेमाने सदैव भरून वाहणाऱ्या त्यांच्या अंतःकरणातील ते प्रेम बाहेर वाहण्यासाठीही नित्य आसुसलेले असते. काही वेळेला ते अनावर होऊन एकदम व अचानक सागराला आलेल्या भरतीप्रमाणे बाह्यांगाने प्रगट होऊन वाहू लागते. त्यावेळेस योगायोगाने व भाग्याने जे कोणी त्या महात्म्यांच्या सहवासात असतात, त्यांना त्या प्रेमाचा सहज लाभ होतो. त्यातूनही ज्यांना त्या प्रेमाचे माहात्म्य आकलन होऊन ते त्या प्रेमाचा स्वीकार करतात आणि तृप्त होतात, त्यांच्यासाठी ते सद्भाग्यच ठरते. परंतु जे कोणी अज्ञानामुळे त्या ईश्वरी प्रेमाचे माहात्म्य न कळल्यामुळे त्या प्रेमाचा अव्हेर करतात, त्यांच्यासारखे दुर्भागी तेच ठरतात.

हे लक्ष्मी, त्याचबरोबर महात्म्यांच्या अंतःकरणातील सागरासारखी नित्य उचंबळणारी प्रेमस्वरूप अवस्था बाह्यांगाने प्रगट होण्यासाठी काहीवेळेला बाह्यांगाचे निमित्तही घडू शकते. असे एकमेव निमित्तकारण म्हणजे व्यक्तिगत, पण भक्तिभावाचे प्रेम होय. महात्म्यांच्या ईश्वरी अनुभवाचा निश्चय ज्याच्या ठिकाणी आहे असा एखादा जर त्यांच्या व्यक्तिगत प्रेमाने त्यांच्या सहवासात आला, तर ते महात्मे त्याला आपली जवळीक देऊ करतात आणि आपले अंतःकरण त्याच्यापाशी प्रगट करण्याची मोकळीकही ते महात्मे सहजपणे घेतात. त्यावेळेस त्या महात्म्यांनी त्या जवळ आलेल्या व्यक्तीवरती पूर्ण विश्वास ठेवलेला असतो आणि त्याचा केवढातरी भरवसाही त्यांनी धरलेला असतो. महात्म्यांच्या त्या विश्वासाला जे जागतात आणि त्या भरवशाला जे पात्र ठरतात त्या भाग्यवंतानाच त्या महात्म्यांचे ईश्वरी प्रेम खऱ्या अर्थाने लाभते. त्यांनाच ते ईश्वरी प्रेम प्राप्त होते आणि ते त्या प्रेमाने सदासर्वकाळ युक्तच होऊन रहातात. त्या प्रेमिकांकडूनच मग त्या महात्म्यांचीच ईश्वरी भावाने भक्ती घडते. तेच भक्त त्या महात्म्यांशी ऐक्य पावूनही पुन्हा वेगळेपणाने भक्तिभावाचा आनंद अनुभवत रहातातच. ''

भक्तिभावाची थोरवी वर्णन करून सांगत असताना नारदही अत्यंत भक्तिभावपूर्ण होऊन राहिला होता आणि त्यामुळेच अंतर्मुखही झालेला होता. साहजिक नारदाच्या वाणीचा वेगही थोडासा मंदावल्यासारखा होता होता, त्याचे बोलणेही शेवटी थांबलेच. पण लक्ष्मी मात्र नारदाचे बोलणे ऐकत असताना अधिकाधिक श्रवणातूर होत होती. त्यामुळे नारदाला पुन्हा बोलते करणे लक्ष्मीच्या दृष्टीने तिच्यासाठी अत्यंत आवश्यकच होते. म्हणून लक्ष्मीनेच नारदाशी बोलण्यास सुरुवात केली.

''हे नारदा, भक्तिभावाचे माहात्म्य आणि ईश्वर व त्याचे भक्त यांच्या एकरूपतेचा आनंद श्रवण करावा, तर तो केवळ तुझ्याच मुखातून! कारण स्वानुभवाच्या त्या स्वानंदात

तू तर नित्यच रमलेला असतोस. परंतु कारणाने असेल किंवा अकारण असेल, जेव्हा तुझ्याकडून त्या भक्तिमाहात्म्याचे आनंदगान घडू लागते, तेव्हा तुझ्याठायी असलेला आत व बाहेर हा भेदही पूर्णपणे लयाला गेलेला असतो, हे मला तर अगदी स्पष्टपणे दिसत असते. तुझ्या स्वानुभवाठायी स्फुरलेली ही भावपूर्णता मला निश्चितपणे जाणवते आणि त्यामुळेच तुझ्या या अवस्थेसंबंधीचे माझे कुतूहल अधिकच वाढते. एवढेच नव्हे, तर तुझी ही अवस्था अनुभवण्याचा माझाही निश्चयच होऊन रहातो. परंतु तसा अनुभव घेण्याचा ध्यास माझ्याठायी कायमचा लागून रहाणे अत्यंत आवश्यक आहे हेही मी पूर्णपणे जाणून आहे आणि म्हणूनच त्यासाठी तुझ्या मुखातून या सगुण प्रेमभक्तीच्या रसमधुर कथा श्रवण करणे मला अत्यंत जरुरीचे आहे. तरच माझ्या ठिकाणी भक्तीच्या ऐक्याचा अनुभव घेण्याची आर्तता निर्माण होईल हे सुद्धा मला नक्की ठाऊक आहे.

हे नारदा, सांदिपनींशी भक्तिभावाने एकरूप असलेला कृष्णच, सदैव स्वानंदात असणाऱ्या सांदिपनींना आनंदित करू शकत होता, याचे रहस्य तर भक्तिभावाच्या माहात्म्यातच दडलेले आहे. परंतु परस्परांशी ऐक्य पावलेल्या सांदिपनी व कृष्ण यांच्यामध्ये बाह्यांगाने वेगळे होण्याचा प्रसंग हा कधीतरी आला असणारच ना? खरे तर, अशी कल्पनाही करणे कठीणच जाते. पण काळाच्या ओघात तर ते अटळही असते. कारण सांदिपनींचे जीवन व कृष्णाचे जीवन हे बाह्यांगाने तर अगदी वेगळेच होते आणि हे ते उभयताही जाणून होतेच. सांदिपनींचे बाह्य जीवन तर अगदी शांत, स्थिर व तृप्तभावाचे झालेले होते, परंतु कृष्णासाठी त्याचे केवढे तरी पुढील जीवन व कार्य होते. त्यासंबंधी सांदिपनींनी कृष्णाला काही मार्गदर्शन केले का? की त्यांना तशी आवश्यकताच जाणवली नाही? कारण कृष्णाच्या पूर्वचरित्रानुसार त्याचे पुढील जीवनही समर्थपणे जगण्याचे सामर्थ्य तर कृष्णापाशी होतेच. पण तरीही सांदिपनींनी कृष्णाला काहीतरी सूचना केल्या किंवा त्यांच्याकडून त्यांच्या काही इच्छा प्रगट झाल्या, असे काहीतरी घडले असणे अगदी साहजिक आहे, नाही का? कृष्णाच्या पुढील जीवनाच्या दृष्टीने जसे हे सर्व महत्त्वाचे आहे, तसेच ते जाणून घेणे माझ्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण माझ्या श्रवणभक्तीसाठी मला ते आवश्यक आहे. तेव्हा हे नारदा, कृष्णचरित्रातील हा महत्त्वाचा गाभा तू माझ्यासाठी प्रगट करून मला नीट समजावून सांगावास, हीच प्रार्थना मी तुला करते. ''

लक्ष्मीचे बोलणे ऐकत असतानाच अंतर्मुख झालेला नारद बाह्यांगाने हळूहळू भानावर आला आणि त्याच्या मुखावर लक्ष्मीच्या बोलण्याची प्रतिक्रिया दिसू लागली. लक्ष्मीच्या बोलण्यातील विचारपूर्वकतेचे व चिंतनशीलतेचे नारदाला अत्यंत कौतुक वाटले आणि ते त्याच्या मंदस्मिताद्वारे व्यक्तही झाले. परंतु त्याचबरोबर नारद पुन्हा उत्तेजित व उत्साहितही झाला आणि त्याची धीरगंभीर वाणी पुन्हा प्रगट होऊ लागली.


‘‘हे लक्ष्मी, कृष्णचरित्र श्रवण करताना तुझी झालेली भावपूर्णता ही अगदी साहजिक व योग्यच आहे. पण त्याचबरोबर कृष्णचरित्रातील गुज जाणून घेण्याची अत्यंत आतुरता व आवश्यकता तुला जाणवत आहे हेच महत्त्वाचे आहे. कारण तीच तर सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. ज्याला कृष्णचरित्रातील गुज आकलन झाले, त्यालाच सगुण भक्तिमार्गाचे गुज कळले असेच म्हणावे लागेल. हे गुज कळल्याचा आनंद जेवढा आहे ना, त्याहीपेक्षा आनंद ते गुज अनुभवण्यामध्ये आहे. अर्थात ते गुज उलगडून सांगताना होणारा आनंद हाही तेवढाच असतो, हे तर मी तुला स्वानुभवाने सांगतो आणि आता खरेच तुला ते गुज सांगतो.

हे लक्ष्मी, कृष्ण हा काही सांदिपनींकडे केवळ ज्ञानप्राप्तीसाठी आलेला नव्हता. ‘काही दिवस अभ्यास करून सांदिपनींकडून सर्व ज्ञान जाणून घ्यावे आणि मग पुन्हा मथुरेला आपल्या घरी परतावे’ अशा विचाराने कृष्ण सांदिपनींकडे आलेलाच नव्हता. तर कृष्ण हा सांदिपनींना शिष्य म्हणून अनन्यभावाने शरण आलेला होता आणि सांदिपनींची भक्तिभावाने सेवा करावी, हाच कृष्णाचा एकमेव हेतू होता. या अनन्यभावामुळेच कृष्णाठायीची सर्व कौटुंबिक नाती तर विसरलीच गेली होती. त्यांची स्मृतीसुद्धा कृष्णाच्या ठिकाणी उरलेली नव्हती. आपले माता-पिता किंवा आजोबा यांचीसुद्धा कृष्णाला आठवण राहिलेली नव्हती. मग मथुरेसंबंधी किंवा मथुराजनांविषयी काही विचार कृष्णाच्या मनात येणे तर शक्यच नव्हते. आणखीन एक सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, कृष्ण त्याच्या पुढील जीवनाविषयीही अजिबात विचार करीत नव्हता. तसा विचार करण्याची त्याला जरुरीही वाटत नव्हती आणि तसे काही कारणही त्याला जाणवत नव्हते. आपण आपल्या सद्गुरूंचे केवळ भक्तच आहोत हीच एकमेव जाणीव कृष्णाच्याठायी राहिलेली होती.

खऱ्या सद्भक्ताची हीच तर खरी ओळख असते. आपल्या सद्गुरूंचा सद्भक्त म्हणूनच त्याचे अस्तित्व असते. ‘आपण केवळ आपल्या सद्गुरूंचेच आहोत आणि फक्त त्यांच्यासाठीच आपले जीवन आहे’ एवढाच भाव दृढपणे सद्भक्ताच्याठायी असतो आणि त्याच सद्भावाचा अनुभव तो सद्भक्त, सातत्याने व सहजपणे घेत असतो. सद्गुरूंचे अंतःकरण, सद्गुरूंचे कार्य व सद्गुरूंचे जीवन हेच सद्भक्तासाठी प्रमाणभूत असते आणि या सर्वांगाने सद्गुरूंची सेवा सर्वभावाने करीत रहाणे हाच भाव, हेच कार्य व हेच जीवन सद्भक्ताचेही होऊन राहिलेले असते. याच भक्तिभावामुळे सद्भक्त हा सद्गुरूंच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग होऊन रहातो, सद्गुरूंचेच कार्य त्याच्याकडून घडत राहून तो सद्गुरूंचेच माहात्म्य सर्वत्र व सर्वकाळ गर्जवून ठेवतो आणि सद्गुरूंच्या अंतःकरणाशी एकरूप होऊन रहातो.

*****

# लेखक परिचय - श्रीपरमानंदस्वामी



श्रीपरमानंदस्वामी - श्री.अविनाश मोरेश्वर लिमये यांनी मुंबई विद्यापीठातून M.Sc. with Research ही पदवी घेतली. आय.आय.टी. पवई, मुंबई या सुप्रसिद्ध संस्थेत मेटॅलर्जिकल इंजिनिअरिंग या विभागात ते दीर्घकाळ सेवा करून निवृत्त झाले आहेत.

गृहस्थाश्रमात राहूनच भक्तिमार्ग कसा साधता येतो व सद्गुरु कृपेने ईश्वरप्राप्ती कशी करून घेता येते याचा आदर्श त्यांच्या जीवनाद्वारे प्रत्यक्ष साकार झालेला आहे.

त्यांनी प्रदीर्घ काळ, अखंडपणे व प्रेमभावाने त्यांचे पूज्य पिता व सद्गुरु श्रीअवधूतस्वामी यांची सेवा, भक्ती व त्यांचे कार्य करून तसेच स्वतःची साधना करून सर्वश्रेष्ठ असा आत्मानुभव घेतला.

श्रीअवधूतस्वामी यांच्या महानिर्याणानंतर श्रीपरमानंदस्वामी यांनी तरुण वयातच या दत्तपरंपरेच्या कार्याची धुरा अत्यंत समर्थपणे सांभाळली आणि सर्वसामान्यांना व भक्तांना अचूक मार्गदर्शन केले व आजही करीत आहेत.

श्रीपरमानंदस्वामी यांनी लिहिलेला प्रभूरामाच्या अंतःकरणाच्या अवस्थेचे दर्शन घडविणारा अनुभवसिद्ध ग्रंथ 'हा राम माझा' २००० साली व कृष्ण व राधा यांच्या भक्तिऐक्याचे स्वानुभूतीतून मनोहारी दर्शन घडविणारा ग्रंथ 'कृष्ण सखा माझा' २००४ साली प्रकाशित झाला. तसेच नारद व लक्ष्मी यांच्या संवादातून उलगडलेले कृष्णाच्या अंतरंगातील गूज प्रकटविणारा ग्रंथ 'कृष्ण परमात्मा' २००८ मध्ये प्रकाशित झाला. या ग्रंथास मराठी साहित्य परिषद, पुणे यांचा 'मृत्युंजय' पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच दत्तात्रेयांच्या अवतार मालिकेतील चरित्रांचे रहस्य प्रकट करणारा ग्रंथ 'दत्त हाचि अवधूत' २०१० साली प्रकाशित झाला असून, श्रीपरमानंदस्वामी यांच्या भक्तिकाव्यांचा संग्रह 'आनंदाचे डोही' २०११ मध्ये प्रकाशित झाला आहे. 'दत्तात्रेय वामन भिडे - एक शोध आनंदाचा' ही आध्यात्मिक कादंबरी २०१४ साली प्रकाशित झाली, तर त्याच आध्यात्मिक कादंबरीचा पुढील भाग म्हणजे 'दत्तात्रेय वामन भिडे - एक प्रवास आनंदाचा' हा २०१५ मध्ये प्रकाशित झाला आहे. त्यापुढील भागाचे लेखन श्रीपरमानंदस्वामी यांचेकडून घडतच आहे.

कृष्णपरमात्मा

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी पुस्तक वाचायला कुठे जायची गरज नाहीतुमच्या . मोबाईलवर आता हजार मराठी ईपुस्तके आहेत.

मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून या नंबर ला तुमचे नांव व गांव Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app.

https://play. google. com/store/apps/details? id=com. esahity. www. esahitybooks

या लिंकवर उपलब्ध आहे. ते download करा.

हे सर्व मोफ़त आहे. No terms. No Conditions.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य